
म. ग्रं. सं. ठाणे.
विषय, ९८९





REFBK-0025221

# थेम्स ते नाईल

प्रा. ना.ल. वैद्य

संदर्भ मुंप्रवास
८८
२५२२९
३०।९।२।८६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :–खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

25 JAN 1987
8 FEB 1987
22 FEB 1987
15 MAR 1987
19 APR 1987
3 JU.. 1987
15 JUL 1987
1 JAN 1988
15 JUL 1995

(क्र. मा. पद्दा)
५०००–११–८६

# थेम्स ते नाईल

प्रा. ना. ल. वैद्य

REFBK-0025221

हीरक प्रकाशन

प्रकाशिका :

सौ. सीमंतिनी सहस्रबुद्धे
हीरक प्रकाशन
'कला निवास'
हनुमान पथ,
धरमपेठ, नागपूर–४४० ०१०.

प्रथमावृत्ती :

७ सेप्टेंबर, १९८६ (गणेश चतुर्थी)

© सौ. यमुना वैद्य

मुद्रक

श्री विजय वढे
श्री विनायक प्रिंटिंग प्रेस,
रामदासपेठ, नागपूर.

मूल्य : २५ रुपये

हीरक प्रकाशन क्रमांक २१

यमुनेस

# ऋण निर्देश

त्रिखंडाच्या माझ्या भ्रमतीत आणि वास्तव्यात ज्या शहरानी मला विशेष आकर्षित केले, त्याच्याबद्दल मी लिहावे ही कल्पना हीरक प्रकाशनचे उत्साही व विद्वान संचालक प्रा सुधीर सहस्रबुद्धे यानी मला सुचविली व माझ्याकडून त्यांनी " थेम्स ते नाईल " हे पुस्तक लिहवून घेतले. याबद्दल मी त्याचा अतिशय आभारी आहे

हीरक प्रकाशन अखिल महाराष्ट्रात दर्जेदार साहित्याची प्रकाशन संस्था म्हणून अग्रभागी तळपेल याची मला खात्री आहे.

मुखपृष्ठ अत्यंत सूचक, आकर्षक व कलापूर्ण केल्याबद्दल प्रा. प्रकाश कावळे यांचाही मी फार आभारी आहे.

८२, मालवीय नगर,
भोपाळ.
दि. १५/८/८६

ना. ल वैद्य

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# लंडन

हीथ्रो विमानतळावर आम्हाला घ्यायला जावई सुधीर आणि मुलगी सौ. चित्रा आले होते. जूनचा महिना होता, म्हणजे इंग्लंडमधील उन्हाळ्याचा मध्य सृष्टिसौंदर्याची लयलूट, शक्य तितक्या कमी कपड्यात वावरणारे तरूण स्त्री पुरूष, प्रसन्न वातावरण, आणि भरपूर उन्हाचे सौख्य-ही माझी कल्पना-पण, इंग्लंड मधली हवा ही भारतातल्या जुन्या संस्थानिकांच्या लहरीसारखी-सगळे अनिश्चित-आम्ही विमानातून बाहेर आलो तेव्हा आकाश ढगाळलेले आणि थोडेसे पावसाचे तुषारही इंग्लंड-मध्ये पाऊस साधारणपणे बाराही महिने असतो. उन्हाळ्यात तर विशेषच म्हणूनच, उन्हाळ्यात खेळल्या जाणाऱ्या क्रिकेट मॅचेसच्या वेळी पाऊस पडून निराशा पदरी पडते आपल्या भारतीय खेळाडूंना पावसात खेळायची सवय नसल्याने, इंग्लंडमध्ये त्यांची चांगलीच घसरगुंडी उडते, त्यावर क्रिकेटमहर्षि प्रो देवधरांनी एकदा सूचना केल्याचे मला आठवते की भारतीय खेळाडूंना थोड्या पावसात खेळायची सवय लावावी

माझ्या पत्नीला मी लंडन बद्दल खूपच सांगितले होते शिवाय, माझ्या कल्पने प्रमाणे, जगातल्या प्रत्येक व्यक्तीला लंडनबद्दल कुतूहल असते व लंडन पाहण्याची उत्सुकता असते या शहराने इतिहास घडविला आहे व घडवित आहे जुना इतिहास तुमच्या डोळ्यासमोर उभी करणारे स्मारके इथे आहेत या सर्वां बद्दल तुम्ही इतिहासातून वाचीत आला असता, व या गोष्टी प्रत्यक्ष पाहण्याची तुम्हाला इच्छा असते, किंवा असणे साहाजिक आहे.

माझ्या पत्नीला मात्र लंडनच्या भूमीवर पाय ठेवल्यानंतर काही विशेष आनंद झाल्यासारखे दिसले नाही—उन्हाळ्यात आकाश ढगाळलेले, पावसाचे तुषार आणि गारठा ! शी !—तिने विचारले, ' चित्रा, सुधीर दिसत नाही ?—'

मी हसून म्हणालो, ' हा काय मुंबईचा विमानतळ वाटला तुला ?— इथे कडेकोट बंदोबस्त असतो, आणि, व्हिजीटर्ससाठी जागा असते, भल— ---- [illegible] इथे गाइ देत नाहीत !—'

पासपोर्ट चेकिंगसाठी अत्यंत कुशलतेने काळा—गोरा भेद केल्याचे सहज लक्षात येते—मी ज्या खिडकीपाशी गेलो त्याच्या मागे आपल्या भारतातला काळूरामच बसलेला होता त्याच्या उच्चारावरून तो बंगाली वाटत होता. अर्थात, इंग्लंडमध्ये स्थायिक झालेला. आमचे दोघाचे पासपोर्ट, व्हिसा, इ सर्व व्यवस्थित होते माझ्या जावयाचा पत्ता, त्याचे नोटरीकडून मिळालेले प्रतिज्ञा पत्र, इ इ सर्व त्याने तपासले व सहा महिन्याचा अवधी आमच्या पासपोर्टवर ठोकला. हे सर्व करीत असता समोरचे भारतीय ' क्षुद्र ' आहेत,आपण तर जवळ जवळ इंग्रजच आहोत अशा उच्च भूमिकेवरून आमच्याशी तो बोलत होता, वागत होता. ' वेलकम ' नाही,

' वुईश यू अ हॅपी स्टे नाही ! हे काळूराम [illegible]

भावना !

१९७६ मधील जून महिन्यातील लंडनने आमचे हे असे स्वागत केले ! खराब हवा आणि ' अन्‌वॉण्टेड ' ची भावना—

विमानतळावरून घरी जात असता,सुधीरने मला मोटारीत विचारले ' तात्या, १९५३ साली प्रथम तुम्ही लंडनला आला होता, तेव्हा व आज, गेल्या तेवीस वर्षात लंडनमध्ये तुम्हाला काही फरक आढळला का ?-'

मी म्हणालो, ' याच एकदम उत्तर देणं थोडं अवघड आहे पण एक गोष्ट मात्र बदलली नाही, ती म्हणजे हवा !—'

' आणि बदललेली गोष्ट कोणती !—'

'कदाचित् मी चूक असेन, पण सारख वाटत, आपण इथे नको आहोत–'

यावर सुधीर काही बोलला नाही. चित्रा फक्त येवढच म्हणाली–'हू केअर्स ?–'

१९५३ साली शिक्षणासाठी मी लंडनला आलो होतो आता १९७६ साली पत्नीला घेऊन काही महिने मुलीकडे रहायला आलो होतो तेवीस वर्षात पुष्कळच फरक पडायला हवा–पुणे किती बदलले ! किती झपाट्याने ! मुंबई बदलले ! इंदूर बदलले ! धार, देवास, ग्वाल्हेर, भोपाळ बदलले, नागपूर बदलले ! युनिव्हर्सिटीच्या परीक्षा घेण्यासाठी मी १९५७ १९५८, १९५९ ही तीन वर्षे लागोपाठ नागपूरला आलो होतो, त्यानंतर २५ वर्षांनी नागपूरला एअरफोर्समधला मुलगा तिथे अधिकारी होता त्याचेकडे गेलो–पण नागपूर ओळखता आले नाही ! माणसाची प्रचंड गर्दी ! घाण- केवळ प्रचंड गर्दी व घाण हाच बदल नव्हता, नागपूरचा चेहराच बदलला होता पुणे, इंदूर, ग्वाल्हेर, भोपाळ, याचे चेहरेच बदलले आहेत. प्रत्येक शहराचे, प्रत्येक गावाचे एक व्यक्तित्व असते. ही शहरे व्यक्तित्व हरवून बसली आहेत.

आणि, लंडन ?

लंडनचे व्यक्तित्व हरवलेले नाही. निसर्ग नियमानुसार काही वरवरचे बदल झालेले आढळतात पूर्वी लेकडिस्ट्रीक्टमध्ये इतकी गर्दी नसायची आणि ज्या तळ्याच्या काठाशी खडकावर बसून आपल्या ग्रासमियर गावी वर्ड्स्वर्थने 'डॅफोडिल्स' ही नितांत सुंदर अजरामर कविता लिहिली, तो आता टुरिस्टसना दाखवीत नाहीत १९५३ ते १९५५ या काळात मी दोनदा लेकडिस्ट्रीक्टला गेलो होतो दोन्ही वेळेस, वर्ड्स्वर्थच्या ग्रासमियरला जाऊन, तळ्याला भेट देत असे, व खडकावर बसून पाण्यावर नाचणाऱ्या डॅफोडिल्सच्या फुलाकडे पहात असे आता मला वाटते तिकडे जाऊ देत नाही.

पण, ग्रॅसमियरमधील वर्ड्स्वर्थचे डोव्ह कॉटेज तसेच आहे. तितक्याच आस्थेने, कॉटेजमधील गाईड (ती आम्हाला म्हणाली होती, ती वर्डस्वर्थच्या घराण्यातीलच होती, व हे सांगताना तिला मोठा अभिमान

वाटत होता !) आम्हाला वर्ड्स्वर्थच्या त्याच्या बायकोच्या सर्व वस्तु दाखवित होती वर्ड्स्वर्थचे कपडे, फिरायला जातानाची काठी, हॅट, बूट, त्याचे लिहिण्याचे सामान त्याच्या वेळचे वॉल क्लॉक, (हे अजूनही व्यवस्थित चालते ! कधीच बंद पडलेले नाही !) त्याच्या बायकोचे कपडे, शिवण्याचे सामान सगळ अत्यन्त काळजीपूर्वक जपून ठेवलेले

आणि, लेकडिस्ट्रीक्टमध्ये तीच नीरव शांतता, तेच गंभीर सौंदर्य त्याला गढूळलेले नाही. ऑक्सफर्ड, केम्ब्रिज ही प्राचीन विद्यापीठे, अजून त्याचे विद्येचे माहेर घर हे रुप बदललेले नाही ऑक्स्फर्ड, केम्ब्रिज, या शहराच्या आसपास ६० किलोमीटर्सच्या आवारात इंडस्ट्रीज नाहीत, कारखाने नाहीत, तिथले होस्टेल्स अजूनही पूर्वीप्रमाणेच विद्यार्थ्यांनी भरलेली असतात प्रोफेसर्स लोक अजूनही गाऊन घालतात–लंडनच्या टेम्पल इन्, लिंकन्स इन, ग्रेज इन, (जिथे बॅरिस्टर–ॲट-लॉ चे शिक्षण दिले जाते) पूर्वीच्या इतमामाने विद्यार्थ्यांबरोबर 'डिनर्स' होतात व सगळ्या डिनर्सना जरी नाही, तरी काही डिनर्सना विद्यार्थ्यांना हजर राहावेच लागते अजूनही इंग्लंडची राणी 'डिफेन्डर ऑफ दे फेथ' उपाधी लावते, शपथा लॅटिनमधूनच घेतल्या जातात, धर्मगुरुंचे पोशाख तेच आहेत जे शेंकडो वर्षांपासून चालत आलेले आहेत. न्यायाधीशांचे विग्ज, पोशाख तोच, हाऊस ऑफ कॉमन्समधल्या स्पीकरचा पोशाखही तोच, जो तेराव्या शतकात होता ! स्ट्रॅटफर्ड ऑन ॲव्हन (ॲव्हन ही छोटीशी नदी, तिच्या काठचे स्ट्रॅटफर्ड) गावी शेक्सपियरचे घर पूर्वी प्रमाणेच शाबूत आहे त्याचा सर्व सरंजाम तसाच आहे, लंडनमध्ये डिकन्सची लिहण्याची खोली त्याचेवेळी होती तशीच शाबूत ठेवली आहे चेन्ज ऑफ गार्डस् पूर्वीप्रमाणेच आहे. लंडन टॉवरमध्ये सर्व वस्तु त्या काळात होत्या तशाच जतन केल्या आहेत, एडिम्बरा (स्कॉटलंडची राजधानी) येथील किल्ल्यात क्वीन मेरी तिच्या काळात जशी राहायची, तशीच व्यवस्था, तिचे पलंग, तिचे कपडे, तिला भेटायला गुप्तपणे प्रियकर यायचा तो जिना जसेच्या तसेच ठेवले आहे–अजूनही पब्लीक स्कूल्स भरभराटीत आहेत व ईटन आणि हॅरो पूर्वीच्याच दिमाखात आहेत

लंडन बदलले आहे काय ? लंडनचे हृदय पक्के शाबूत आहे. ' अपान वेस्टमिन्स्टर ब्रिज ' या सुनीतात लंडन शहराचे पहाटेचे वर्णन करताना वर्डस्वर्थने शेवटच्या ओळीत लिहिले आहे, ' ॲन्ड ऑल दॅट माईटी हार्ट इज लायिंग स्टिल ! ' टीकाकारांना ही ओळ फारशी पसंत पडत नाही, कारण त्यायोगे, ' स्टिल 'शब्दाने अशुभ कल्पना स्पर्श करून जाते-छे छे ! लंडनचे ' हार्ट ' स्टिल ' (निस्तब्ध, अचल) नाही ! ते विलक्षण ' ॲक्टिव्ह ' आहे. विलक्षण चैतन्यशील आहे.

१९५३ साली आडिसअबाबा (ईथियोपियाची राजधानी) मधली चांगली नोकरी सोडून मी उच्च शिक्षणासाठी लंडनला निघालो होतो. माझ्याबरोबर आणखी काही भारतीयानी यायचा विचार केला होता. पण आदिस अबाबापासून २५ मैलावरील होलेता या गावी असलेला वेदनायकम् (ख्रिश्चन) हाच फक्त आला. त्याला लीड्सला प्रवेश मिळाला होता. सहा महीन्यानी तो लंडनला मला भेटायला आला. शब्दश रडला. म्हणाला, ' अरे कसली हवा ! कसले जेवण !— आणि सुट्या नाहीत, अभ्यासाचा गचका !— मला इथे राहायचे नाही !— मजजवळ इथियोपियाचा एक वर्षाचा व्हिसा आहे. मी जातो परत तिथेच—' त्याला मी खूप समजावून पाहिले— पण व्यर्थ ! एक माझ्या बरोबरच इथियोपियात आलेले महाराष्ट्रीय गृहस्थ सुद्धा लंडनला आले होते, पण सहा महिन्यात कंटाळून परत आडिसअबाबाला गेले ! (ते माझ्यानंतर लंडनला आले होते. त्यांना बॅरिस्टर व्हायचे होते,पण तसेच परत गेले अडिसअबाबाला. ते पुष्कळ वर्षे होते. भारतात परतल्यावर एका शाळेत मास्तर झाले)—

लंडनमधील आमचे सहा महिन्याचे वास्तव्य संपायला आल्यानंतर पुन्हा सहा महिने वाढवून घ्यायला मुलीने सांगितले होते. त्याप्रमाणे मी आम्हा दोघांचेहि वास्तव्य वाढवून घेतले. पण पत्नी मात्र नाराज. तिला लंडन मुळीच आवडले नाही.

मला मात्र लंडन फार आवडते, अतीशय आवडते. लंडनवर माझे प्रेम आहे. माझ्या ' लंडनची पत्रे ' या पुस्तकाच्या अखेरीस मी लिहिले आहे, ' देवाने मला पुनः जन्माला घातले व मनुष्यदेह दिला तर भारता नंतरची माझी निवड लंडनच राहील—'

मला लंडन फार आवडले. डॉ जॉनसन्चे उद्गार अगदी खरे आहेत. " When a man is tired of London, he is tired of Life, for there is in London all that life can afford " (मनुष्य लंडनला जर कंटाळला तर तो आयुष्यालाच कंटाळला असला पाहिजे, कारण, तुमच्या आयुष्यात तुम्हाला जे जे हवे ते ते लंडनला तुमच्या कुवतीनुसार मिळेल.'

लंडन म्हणजे एक प्रचण्ड विरोधाभास, पण आपली बुनियाद टिकवून आहे. पाया विलक्षण भरभक्कम आहे, खबीर आहे

१९५३ साली प्रथम मी लंडनला गेलो तेव्हा लंडन कौण्टी कौंसिल ही पूर्वी लंडनची म्युनिसीपालिटी होती. १ एप्रिल १९६५ रोजी लंडन कौण्टी कौन्सिल (ज्याला एल.सी सी. म्हणत) नाहीसे होऊन त्याजागी बृहत 'ग्रेटर लंडन कौन्सिल' (जी.एल.सी) निर्माण झाले शिवाय, अजून काही फरक जाणवतात ते म्हणजे नवीन बांधल्या जाणाऱ्या इमारतींचे आर्किटेक्ट, पूर्वी चार मजली इमारती म्हणजे हद्द झाली. अर्थात, हे अजूनही आहे, पण स्कायस्क्रेपर्स ही उभ्या होत आहेत टॉटेन हॅम कोर्टजवळील ५७९ फूट उंचीची नवीन पोस्ट ऑफिस बिल्डिंग हे ठळक उदाहरण सांगता येईल त्या इमारतीच्या टॉप फ्लोअरवर रेस्तॉरां आहे व तिथे चांगले रुचकर जेवण मिळते. या बिल्डिंगमुळे मी प्रथम चक्रावून गेलो होतो, कारण, टॉटेनहॅम कोर्ट स्टेशनावर उतरून सरळ जायचे व उजवीकडे वळले म्हणजे आमची अल्ममेटर, युनिव्हर्सिटी ऑफ लंडन, ती धुंडताना माझा गोंधळ उडाला होता-- तीच गोष्ट सेंट पॉल चर्चला जाताना त्या चर्च भोवती तीन बाजूंनी उंचच उंच प्रचण्ड काचेचा वापर जास्त केलेल्या इमारती आढळल्या. वेस्टमिन्स्टर ॲबेजवळ एक आधुनिक पद्धतीची कॉंक्रीटची जंगी इमारत बांधली जाऊन तिने वेस्टमिन्स्टरला खाली पहायला लावले ! (भारतात मशिदीजवळ मशिदीपेक्षा उंच इमारत बांधण्यात येऊ लागली तर अल्लाके प्यारे सहन करीत नाहीत !') तमसा नदीवरील मिल्बॅंक टॉवर ३२ मजली उंच आहे ! जुन्या वेळच्या लंडनमध्ये धुराडी असलेल्या घरांचे प्राबल्य फार. आता ही घरे तुरळक झालीत. पूर्वी दिवाणखान्यात 'हार्थ', 'फायर प्लेस' असायची व त्यात लाकडे टाकीत व ऊब आणीत सेंट्रल हीटींगने हे आता सारे जवळ जवळ इतिहास जमा झाले आले पूर्वी सकाळी घातलेली कॉलर

सध्याकाळ पावेतो काळी होऊन जायची हिवाळ्यात धुक्यात कोळशाचे कण मिसळून आपल्या कपड्यावर ते साचत, रूमालाने नाक पुसले तर रूमाल काळा व्हायचा , आणि दाट धुक्यात हे कण मिसळल्यावर रस्त्यावर दिसणे अशक्य व्हायचे. बसच्या पुढे भला मोठा कदिल घेऊन चाललेला कडक्टर हे पूर्वीचे दृश्य आता दिसत नाही

लडनमधे जेवणातही पुष्कळ फरक आढळला पूर्वी नूरजहान, ताजमहल, डाक्का अशी तुरळक भारतीय-पाकिस्तानी खाना मिळणारी रेस्तॉरॉ होती आता आशियाई जेवण मिळणारी अहारगृहे एकट्या लडनमध्ये ११०० आहेत व त्यात गोरी गिऱ्हाईके, स्त्री-पुरूष, याची गर्दी असते आणि पोशाखाचे बाबतीतही सैलपणा आढळला तसेच पूर्वी 'काळूराम' इतके दिसत नसत आता आशियाई व आफ्रिकन लोकाची सख्या खूपच वाढली आहे , येवढेच नव्हे तर नोकऱ्यात तर हे आहेतच (बस ड्रायव्हर्स व कडक्टर्स, रूग्णालये, ऑफिसेस, शाळा इ इ.) पण आशियाई लोक धद्यात पुढे आले आहेत इग्लडच्या लहानशा गावात सुद्धा आशियाई माणूस किराणामालाचे दुकान थाटून बसलेला आढळेल. आशियाई व आफ्रिकन, सायप्रय, ग्रीस, चीन या देशातीलही पुष्कळसे लोक आढळतात चिनी माणसे व्यापारात आहेत

काही नवीन कायदेही मला विस्मयकारक वाटले समलिंगी उपभोग होमोसेक्स्युअॅलिटी ला कायद्याने परवानगी आहे पूर्वी बेटिंग व गेमिंग बेकायदेशीर होते पण १९६० साली बेटिंग व गेमिंगच्या कायद्यान्वये हा धदा भरभराटला इग्लीश लोकाना घोड्याचे वेड फार, आणि यावर बेटिंग करणारी एकदर २०,००० च्या आसपास दुकाने इग्लडमधे आहेत. फुटबॉल वर बेटिंग, ग्रेहाऊण्डस्वर बेटिंग, ट्रॅकवर बेटिंग-करोडो पौडाची उलथापालथ दरवर्षी बेटिंगवर होते

आणि हो, नाणी बदलली ! पूर्वी २० शिलींगला एक पौण्ड, २१ शिलींगला एक गिनी, १२ पेन्सना एक शिलींग, असे चलन होते. आता डेसिमल पद्धत अमलात आणली जाऊन १०० पेन्स म्हणजे एक पौंड झाला त्यामुळे नवीन माणसाला फारच सोयीचे झाले आहे.

नोकरलोक बहुधा मिळत नाहीत, आणि मिळालीच तर फार महाग असतात इंग्लंडच्या अगदी आतल्या भागात सुद्धा ही स्थिती आहे. १९७७ च्या उन्हाळयात आमच्या जावयाने आम्हाला त्याच्या मोटारीतून इंग्लंडचा प्रवास घडवून आणला लेकडिस्ट्रिक्टला पुन एकदा, (एकदर तीनदा) भेट दिली सटन ऑनहल् या गावी आमच्या जावयाचा मित्र डॉ अनिखिडी राहात होता त्याला दोन मुलेही होती आम्ही एकदर सात जण व ते चार जण, असे अकराजण होतो २-३ दिवस खूप आनदात गेले. भाडी घासायला व इतर आवराआवर करायला तासाच्या हिशेबाने एक बाई लावली. एका तासाचे शभर रुपये ! – ती मोटारने आली, मोटारने गेली ! –यामुळे 'स्वावलंबन' हे इंग्लंडमधे रुढ होत आहे.

मला आणखी एक फरक विशेष जाणवला, तो म्हणजे इंग्लंडच्या जनतेत काही मूल्यांचे अवमूल्यन झालेले आढळले साम्राज्य नष्ट झाल्याचाही हा परिणाम असावा. पूर्वी अत्यत खालच्या पातळीवरील इंग्रजही म्हणू शकत होता 'मी भारत उपखंडावर राज्य करीत आहे.' आता, ब्रिटन राष्ट्रच तिसऱ्या क्रमांकाचे झाले आहे शिवाय, पूर्वी राजघराणे, चर्च, सनदी नोकरशाही, या संस्थांवर भक्ति व निष्ठा होती. त्या प्रमाणात आता नाही ! एलिझाबेथ राणी व मार्गरेट या बहिणीने एका सामान्य फोटोग्राफरशी लावले होते ! १९५३ ते १९५५ या काळात मी बी बी सी वर पन्नास वेळा तरी बोललो असेन, त्यामुळे (मी हिंदी-मराठी कार्यक्रमात बोलत असे. १९५५ नतर मराठीतले कार्यक्रम बंदच झाले !) मला बी बी सी च्या कामकाजाची थोडीबहुत माहिती आहे स्टाफवर 'ऑक्स्फर्ड ब्ल्यू' च नेमला जायचा त्याचे इंग्रजी उच्चार ऑक्स्फर्ड उच्चारच हवेत ! आता कॉकनीसुद्धा स्टाफवर नेमतील ! – अरिस्टॉक्रसी ढासळत चालली आहे साधा मजूरही आज गाडी आणि टी व्ही विकत घेण्याच्या ऐपतीत आहे– 'श्रीमती' आजकाल परवडत नाही, इतके टॅक्सेस आहेत, यामुळे समाजातील पूर्वीची उच्चनीचता ढिली पडत चालली आहे इंग्रज स्त्रीपुरुष अधिक संख्येने आशियन्सशी लग्न करीत आहेत.

पोशाखात फरक झाला आहे बोलरहॅट व छत्री आता दिसणार नाही. स्त्रियांचा पोशाख विशेषत तरूण स्त्रियांचा, क्रांतिकारकच आहे!

इडिया ऑफिस * १९७, ब्लॅक फ्रायर्स रोड, लडन. या १४ मजली इमारतीत (यात ब्रिटीश साम्राज्याचे जुने रेकॉर्ड, अनेक ग्रथ, हस्तलिखिते, वर्तमान पत्रे, पेन्टिग, नकाशे, इ भाडार आहे) मी आठवडयातून तीन दिवस तरी वाचनासाठी जात असे तिथे कौण्टरवर एक तरूणी बसायची तिचा ब्लाऊज केवळ 'सी थ्रू' नव्हता, तो जाळीचा होता, व ती जाळी चागली रुद होती! आणि तिची दोन्ही वक्ष स्थळे तीन चतुर्थांश दिसत होती. असा पोशाख सर्व तरूणी करतात असे नव्हे, पण असा कामुक्तेला विलक्षण उसळी देणारा पोशाख इडिया ऑफिस लायब्ररीसारख्या ठिकाणी नोकरी करणारी तरूणी करते व ते मान्य केले जाते. ही घटनाच मला क्रातिकारी वाटली. पूर्वी लीस्टर स्क्वेअर आणि पिकॅडिली सर्कस जवळच 'वुईन्ड मिल' हे (ज्याचे ब्रीद वाक्य, 'वुई नेव्हर क्लोज' असे आहे, आणि ऐन २ न्या युद्धाचे धुमश्चक्रीत, बॉम्बवर्षाव होत असताही थिएटर उघडे असे व खेळ चालू असे!) माझ्या कल्पने प्रमाणे एकच थिएटर होते, जिथे विवस्त्र स्त्रिया रगभूमीवर नृत्य करीत. इग्लडचे 'विवस्त्रीकरणा' बाबत एक गमतीदार 'कॉम्प्रोमाईज' आहे. रगभूमीवर तरूणीना सपूर्ण नग्न दाखवायला परवानगी आहे, पण नग्नतेत त्यानी हालचाल करता कामा नये. नग्न तरूणी रगभूमीवर नृत्य करतात, पण त्याचे जवळ खूप मोठे मोरपिसे लावलेले पखे असतात, ते पखे शरीर झाकतात— अजूनही रस्त्यावर वेश्या गिऱ्हाईकाना जाळ्यात ओढण्यासाठी रस्त्यावर भटकत असतात व पोलीस त्याना पकडतही असतो पण 'स्ट्रिप-टीज' खेळात स्टेजवरील तरूणी बहुतेक सर्व कपडे काढीत जाते, आणि असे स्ट्रिप-टीज खेळ पुष्कळ ठिकाणी चालतात 'क्लब' नाव दिले म्हणजे कायद्याच्या कचाटीतून सुटता येते कारण, 'क्लब' कमर्शियल थिएटर सारखा नसतो त्याचे सभासद असतात, प्रवेश शुल्क असते-- व सर्वांनाच सर्रास प्रवेश नसतो, पण, या आवरणाखाली काही क्लब्जमधून ब्ल्यू फिल्म्स दाखविल्या जातात आणि काही महाग, 'एक्स्क्ल्यूझिव्ह' क्लबात स्त्री पुरूषाच्या सभोग क्रीडाही प्रत्यक्ष करून दाखविल्या जातात. पूर्वी चित्रपट पुष्कळ सोवळे असत आता चित्रपटातून नग्न स्त्रीपुरूषाचा (पडद्यावर) युक्त सचार व त्याची सभोग कृत्ये दाखविली जातात—

* १९७, ब्लॅक फ्रायर्स रोड, लडन.

आहेत. या दृष्टीने लंडनचा इतिहास, विशेषत: नगर निगमचा, मोठा उद्बोधक आहे.

१८५५ पर्यंत लंडन शहराला कार्पोरेशनच नव्हती. त्यावर्षी एक काम चलाऊ संस्था निर्माण केली गेली त्या काळात लंडन शहराची स्थिती भयानक होती. शेकडोशे रस्त्याना नावेच नव्हती– (भारतात अनेक शहरात अनेक रस्त्याना नावेच नाहीत ! आणि पुष्कळ शहरात म गांधी, नेहरू, यांची नावे विशेषच ! लहान शहरातून व गावातून तर रस्त्यांना नावे दिली पाहिजेत ही कल्पनाच नाही !–) लंडनला त्या काळात मुख्य ड्रेनेज नव्हते तमसा नदीला एम्बॅन्कमेन्ट नव्हते, त्यामुळे तमसाला पूर आला की गावात पाणी शिरे. गावातील गटाराचे घाण पाणी हाईड पार्कमधल्या सर्पेन्टाईन नदीत जाई. (आज भारतात गंगेच्या पाण्यात किती दूषित द्रव्ये जात आहेत !) (भोपाळला तर पाणी पिण्याचा जो मोठा तलाव व (ज्या तलावातून भोपाळच्या आठ लाख लोकसंख्येला पिण्याचे पाणी दिले जाते), त्यात तलावाच्या किनाऱ्यावरील हमीदीया हॉस्पिटलमधली सगळी घाण जाते, व गावातील गटाराचे पाणीही जात एका गव्हर्नरने म्हटले होते, 'भोपाळची जनता डायलूटेड स्टूल्स पिते !') १८६० साली लंडनला कॉलऱ्याच्या साथीने शेकडोशे लोक मेले.

१८८८–१८८९ साली लंडन कौन्टी कौन्सिल अस्तित्वात आले. या लंडन कौन्टीकौन्सिल (एल् सी सी या नावाने मशहूर) ची सत्ता लंडन शहरावर (फक्त 'सिटी' नावाचा केन्द्रीय भाग सोडून) चाले या एल सी सी त मिडलसेक्स आदि परगणे (कौन्टी) समाविष्ट होते. एल सी सी ची सत्ता ११७ वर्ग मैलापर्यंत होती एल सी सी २८ बरो मध्ये विभागले गेले, प्रत्येक बरोचा एक मेयर, एक कौन्सिल व स्थानिक प्रशासन असे. अर्थात् सर्वांवर एल सी सी चे प्रभुत्व होतेच या एल सी. सी च्या धोरणावर वेब दापत्य (सिड्ने आणि बीट्रीस), बर्नार्ड शॉ आदि फेबियन्सच्या तत्त्वज्ञानाचा व विचाराचा फार पगडा होता. विसाव्या-शतकाच्या दुसऱ्या पचविशीत, १९३३–१९४० पर्यंत, हर्बर्ट मॉरिसन या नेत्याने एल.सी सी वर प्रभुत्व गाजविले आणि आपल्या अथक परिश्र-मानी एल सी सी. चे रूपच पालटले हा हर्बर्ट मॉरिसन अस्सल 'कॉक्नी'

होता. लंडनमध्ये 'कॉकनी' वर्ग फार महत्वाचा साधारणपणे अशिक्षित, हलकी कामे करणारे, विशिष्ट हेल काढून 'अशिष्ट' इंग्रजी बोलणारे (याचे उच्चार बरेच दिवस आपल्याला समजत नाहीत , आणि ज्याला कॉक्नी इंग्रजी समजते, त्याला कुठलेही इंग्रजी उच्चार समजू शकतील , आणि, ज्याला कॉक्नी बोलता येईल, तो तर पक्का मुरलेला लंडनर झाला असे समजावे अर्थात्, 'कॉकनी' बोलणे तसे अवघड आहे ) म्हणजे कॉक्नी असे ढोबळपणे त्याचे वर्णन करता येईल वर्तमानपत्रे विकणे, दूध विकणे, रस्ते झाडणे, कुणाकडे घरातली झाडझूड, धुणे, करणे, वेटर्स चपराशी हे बहुधा यांच्या कामाचे रूप– हर्बर्टचे वडिल साधे कॉन्स्टेबल होते– एका अपघातात हर्बर्टचा एक डोळा गेलेला– पोरवयात त्याने अनेक हलकी कामे केलेली– निरोप्या, दुकानात नोकर, टेलिफोन ऑप-रेटर, इ इ स्वकर्तृत्वाने तो मजूर पक्षाचा सेक्रेटरी झाला-- जनतेचे कल्याण आणि 'आपल्या लंडनची' सर्वांगीण उन्नती, या पलिकडे त्याला अन्य काही माहीत नव्हते लंडनच्या जनतेवर त्याचे विलक्षण प्रेम , आणि लंडनच्या जनतेचा हर्बर्ट अगदी लाडका. त्याला ते प्रेमाने 'आमचा अर्बर्ट' म्हणायचे– आपल्या कर्तबगारीवर त्याने मोठ मोठ्या पदावर काम केले आणि दुसऱ्या महायुद्धानंतर, अॅटली ऐवजी 'आमचा अर्बर्ट' च प्राईम मिनिस्टर व्हायचा , पण त्याचे व्यक्तित्व अधिक वादळी होते, त्यामुळे ती संधि हुकली-- पुढे, त्याच्या कर्तबगारीचा कळस म्हणजे त्याला हाऊस ऑफ लॉर्डस् मध्ये प्रवेश मिळाला राजाने त्याला 'लॉर्ड मॉरिसन ऑफ लॅम्बेथ' केले– आजच्या लंडन मधील पुष्कळशा सुविधाचे श्रेय हर्बर्ट मॉरिसनला आहे-- ज्या प्रमाणे आय सी. एस. वर्वेनी पुण्यात सुधारणा घडवून आणली आणखीही सुधारणा झाल्या असत्या, पण बर्व्यांचीच पुण्याहून उचलबांगडी झाली.

दुसऱ्या महायुद्धानंतर लंडन झपाट्याने वाढू लागले. एल सी.सी. आपल्या परीने कार्यक्षम होती, पण तिच्या कक्षा नव्या प्रश्नाना तोंड देण्यास अपुऱ्या होत्या म्हणून खूप विचाराचा खल झाला व १९६४–१९६५ मध्ये ग्रेटर लंडन कौन्सिल अस्तित्वात आले. पूर्वी चेरिंग क्रॉस स्टेशनापासून पाच मैलाचा रेडियस एल.सी.सी. च्या सत्तेत होता , आता

तो वीस मैल झाला, आणि पूर्वीच्या ११७ वर्ग मैलाऐवजी जी.एल.सी. च्या आधिपत्याखाली ६२० वर्ग मैल इतका मुलूख आला.

हर्बर्ट मॉरिसनची लंडनला सर्वात मोठी देणगी म्हणजे लंडनभोवतालचे 'ग्रीनबेल्ट' लंडनची लोकसंख्या ऐंशी लाखापेक्षा वाढू नये याची पराकाष्ठा जीएलसी करीत असते लोकसंख्या तर वाढत आहे. या वाढणाऱ्या लोकसंख्येला लंडनमधेच समावून घेण्याऐवजी (स्काय स्क्रेपर्स बांधून) लंडनच्या बाहेर त्यांना बसविण्याचे ठरविले, पण यासाठी लंडन-भोवतालच्या 'ग्रीनबेल्ट' वर अतिक्रमण केलेले नाही हा ग्रीनबेल्ट काही ठिकाणी वीस मैलापर्यंत पसरलेला आहे ग्रीनबेल्ट मुळे लंडन-शहराचे आरोग्य सुरक्षित आहे, व त्याला घाण करायचे नाही. जगात असले उदाहरण दुसरे नाही. खुद्द लंडन शहरात मोठमोठाले पार्कस आहेत. लंडनमधल्या लहानमोठ्या पार्कसची एकंदर संख्या १६० आहे हाईड पार्क, हॅम्पस्टेड हीथ, सेंट जॉन्स वुड्, रीजण्ट पार्क, क्यूगार्डन्स, रिचमंड, इ. प्रचंड पार्कस तर आहेतच, पण अनेक वस्त्याशेजारी पार्कस आहेत यात तलाव असतो, त्यात बोटींगही करतात क्रिकेट, फुटबॉल, टेनिस ग्राउण्डस असतात म्हणजे,प्रत्येक पार्क केवढा असला पाहिजे याची कल्पना करता येईल. पुण्याला पूर्वी बंड गार्डन आणि एम्प्रेस गार्डन्स होते. त्यांना आता अवकळा आली आहे. बर्व्यांनी संभाजी पार्क आणि पेशवे उद्यान निर्माण केले, म्हणून थोडीतरी शोभा आली आम्हा भारतीयांना पार्कस उद्याने, याचे महत्वच कळलेले नाही. उद्यानाचे महत्व किती वर्णन करून सांगावे? शहराला 'बॅलन्स' येतो, हवेचे प्रदूषण थांबते मोकळी व ताजी हवा मिळते, लोकांना करमणुकीसाठी बसता येते– मुंबईचा बकालपणा प्रचंड उद्याने त्या शहरात निर्माण केली तर बराचसा कमी होईल– पण, उद्यानाऐवजी आम्ही कारखान्यांना जागा देतो, कारण त्यामुळे पैसा मिळतो– लंडन शहरापासून एक धडा निश्चित शिकता येईल– मनुष्य आणि यंत्र यात त्यांनी मनुष्याच्या सर्वांगीण हिताला प्राधान्य दिले आहे. भारतात दुर्दैवाने 'माणसाचे हित' कुणाच्या लक्षातच येत नाही! शहराची लोकसंख्या वाढत चालली की त्या प्रमाणात उद्याने निर्माण करणे हे आद्य कर्तव्य शासनाचे ठरते. पन्नास वर्षापूर्वी नागपूर शहरात जी उद्याने होती, तेवढीच आजही आहेत व काही उद्यानाची, तर आबाळच

होत आहे. उदा. महाराज बाग– तसेच, नागपूरला सेमिनार हिल्सवर किती सुंदर उद्यान आहे! तिथे शाळा कॉलेज काढायला परवानगीच द्यायला नको होती! लंडन मधील हाईड पार्क, क्यूगार्डन्स, हॅम्पस्टेड हीथ, आदि उद्यानात अशी परवानगी देण्याचे स्वप्नातही येणार नाही!

लंडनमधे लोकसंख्या वाजवी पेक्षा फुगू नये म्हणून ग्रीनबेल्टच्या पलिकडे शहरे बांधायला सुरवात केली. यापासून सुद्धा भारतसरकारने व आमच्या शासनकर्त्यांनी धडा शिकला पाहिजे. ही शहरे म्हणजे लंडनची उपनगरे नव्हेत, की जिथली जनता नोकरीसाठी, उद्योगधंद्यासाठी, रोज 'अप डाऊन' करील! ज्याप्रमाणे मुंबईची पश्चिम रेल्वेवरील बोरिवली-पर्यंतची आणि सेन्ट्रल रेल्वेवरील कल्याण पर्यंतची उपनगरे आहेत! ग्रीन बेल्टजवळील ही शहरे स्वयंपूर्ण आहेत व तेथील रहिवाशांना लंडनला जायची जरुरच पडत नाही! – ही शहरे बांधण्यामागील लोककल्याणाचा सिद्धांत असा की वाढणाऱ्या लोकसंख्येने लंडनमधे येता कामा नये – यासाठी तिथे पण हॉस्पिटल्स, शाळा कॉलेजेस, नाट्यगृहे, चित्रपटगृहे इ. इ. तर आहेतच, पण लघुउद्योगाचे कारखानेही सरकारने सुरु केले. हा प्रयत्न १९४६ साली मजूरसरकारने सुरु केला होता–या नव्या शहरांनी सुद्धा 'फुगू' नये म्हणून ऐंशी हजाराच्या आसपासच त्यांची लोकसंख्या असते. अधिकाधिक दीड लाखाची मर्यादा आहे. या सगळ्या शहरांचे 'पॅटर्न' एकच आहे. बी बी सी वर मी १९५३ साली एकदा या शहरावर बोललो होतो (शहराला भेट देण्याचा जाण्या येण्याचा खर्च बी. बी सी. चा)

जीएलसी. ची भव्य इमारत थेम्सच्या किनारी पार्लमेंट हाऊसेसच्या समोर आहे. एकंदर सात हजार कर्मचारी तिथे काम करतात. जीएलसी. म्हणजे पार्लमेन्टची छोटीशी प्रतिमाच दर तीन वर्षांनी निवडणुका होतात व शंभर कौन्सिलर्स आणि सोळा आल्डरमेन निवडले जातात. कौन्सिलर्स-ची मुदत तीन वर्षांची असते, आल्डरमेनची सहा वर्षांची. जीएलसी चा प्रमुख 'चेअरमन' असतो त्याची निवड आल्डरमेन करतात व त्याची मुदत एक वर्षाची असते. चेअरमनची निवडणूक करताना आल्डरमेन आपापल्या राजकीय पक्षापैकी निवडण्याची कोशीस करतात, परंतु, निवडून आल्यानंतर चेअरमनने कोणत्याही राजकीय चळवळीत भाग

घ्यायचा नाही वा पाठिंबा द्यायचा नाही असा दंडक (अलिखित) असतो; नव्हे, त्यांनी 'अपक्ष' च राहावे अशीच सर्वांची इच्छा असते– ही उज्वल परंपरा मोठ्या आत्मीयतेने, कसोशीने राखली जाते कौन्सिलर्स आणि आल्डरमेन याना पगार अर्थातच नसतो, आणि अत्यंत महत्वाची गोष्ट जी भारतातील म्युनिसिपल, ग्रामपंचायत, कार्पोरेशनच्या निवडून आलेल्या सभासदांनी लक्षात घ्यायला पाहिजे ती म्हणजे, त्याच्यात भ्रष्टाचार नाही. इतक्या वर्षांत कोणत्याही कौन्सिलरवर अथवा आल्डरमेनवर भ्रष्टाचाराचा आरोप प्रकट वा अप्रकट रीतीने झालेला नाही, अथवा वर्तमानपत्रात वाच्यता नाही इंग्लंडमधली वर्तमानपत्रे किती दक्ष व जागरुक आहेत हे सर्वांना माहीतच आहे. कोणताही क्षुल्लकस का होईना, व कितीही मोठ्या व्यक्तीचा का असेना भ्रष्टाचार वर्तमानपत्राच्या तीक्ष्ण नजरेतून सुटणे अशक्य आहे ! या शुद्ध व स्वच्छ चारित्र्यामुळे इंग्लंडमधील एकंदर राजकारण व समाजकारण निर्मळ राहिले आहे भारतात गडगंज पैसा मिळविण्याचे साधन म्हणजे खाजगी शाळा काढणे, तीही इंग्लीश माध्यमाची, व भरमसाठ फी ठेवणे. अशा या खाजगी इंग्लिश माध्यमाच्या काही शाळांना मी भेटी दिल्या आहेत, अनधिकृतरीत्या पाहिल्या आहेत. बऱ्याचशा शाळा राहाण्यासाठी जी घरे असतात, त्यात भारतात– यातील मुलांना खेळायला मैदान नाही, पी. टी करायला मैदान नाही तेव्हा भर रस्त्यावर ही मुले पी टी करतात खेळतात– किती फी ठेवावी यावर बंधन नाही, मास्तर व मास्तरणींना किती पगार द्यायचा याबर बंधन नाही कारण, या शाळा शासनाकडून ग्रॅन्ट घेत नाहीत, त्यामुळे सरकारी वेतन श्रेणी याला लागू नाही. एक उदाहरण देतो. भोपाळला भर रेसिडेन्शियल वस्तीत, एका दुमजली घरात अशी एक शाळा भरते. विद्यार्थी (१९८६ ची ही गोष्ट आहे) ५०० आहेत फी दरमहा चाळीस रुपये शिक्षिकाच कामावर आहेत, कारण पगार दर महा १५० ते २०० रुपये ! पुरुष या पगारात कसा येईल ? विवाहित स्त्रियांचे प्रमाण अधिक. माझ्या एका मित्राची पत्नी या शाळेत रु १५० द. म वर शिक्षिका आहे. वस्तुत या स्त्रीला नोकरी करायची काहीच जरुरी नाही नवऱ्याला दर महा २५००/– मिळतात, आणि कुटुम्ब 'हम दो हमे दो'– मी त्या महिलेस विचारले

असता ती म्हणाली, 'मुलं शाळेत जातात, हे कॉलेजमध्ये जातात मग घरी एकटीने बसून तरी काय करायचं ? बर, शाळाही जवळ आहे! –'

शिक्षणाधिकारी या शाळाकडे लक्ष देत नाहीत का ? – यावर भाष्य न करणं बरे, व त्यासाठी हे स्थळही नव्हे! –

जीएलसी च्या कामाचा पसारा फार मोठा आहे. लंडनच्या विकासासाठी योजनेचा ब्ल्यू प्रिन्ट तयार करण्यापासून १६० पार्कसमधे रात्रीच्या उजेडासाठी बल्ब बसविण्यापर्यन्त! आणि साधारणपणे १५ लाख बल्ब या पार्कसाठी दरवर्षी लागतात जीएलसीचे वार्षिक बजेट कोटयावधी रुपयाचे असते. दहा वर्षांपूर्वी ते ५५० कोटी रुपयाचे होते! कर्मचाऱ्यांची संख्याच एक लाखावर आहे!

जीएलसी ३२ बरोमधे विभाजित आहे जीएलसी आणि बरो यांचे संबंध एकमेकाना पुरक आहेत दोन्ही संस्थात जनतेने निवडलेले प्रतिनिधी असतात,परंतु ते लंडनमधील अनेक संस्था त्यांची सत्ता नाही हे लंडनच नव्हे तर इंग्लंड या गुंतागुंतीच्या (कॉम्प्लेक्स) व्यवस्थेचे निदर्शक आहे. उदा पोर्ट ऑफ लंडन पोर्ट ऑफ लंडनचे वर्चस्व तमसाच्या ९० मैलावर आहे. आणि त्याच्या नियंत्रणाखाली पाच प्रचंड डॉक्स आहेत. तसेच हर्बर्ट मॉरिसनने संस्थापित केलेली लंडन ट्रॉन्सपोर्ट सिस्टिम बसेस आणि टयूब्स (अंडरग्राऊण्ड रेल्वे) द्वारा लक्षावधी लोक प्रवास करतात आणि यांचे जाळे जवळ जवळ २००० वर्ग मैल आहे–मेट्रॉपॉलिटन वॉटर बोर्ड (५७० वर्ग मैलातील जनतेला पाणी पुरविले जाते), २३५ वर्ग मैलाच्या या टापूतील पोस्ट ऑफिसेस, चार इलेक्ट्रिक बोर्डस, तीन गॅस बोर्डस यावर जीएलसी वा बरोची सत्ता नाही लंडनमधील हॉस्पिटल्सवर चार रीजनल मेट्रॉपॉलिटन हॉस्पिटलबोर्डस सत्ता आहे पार्क आणि उद्याने यावर सत्ता नाही हाईडपार्क रीजण्टपार्क हे मिनिस्ट्री ऑफ् पब्लीक बिल्डिंग्ज ॲन्ड वर्क्सच्या आधिपात्याखाली आहेत. जगातील मोठा व अत्यंत प्रेक्षणीय 'झू' ची देखभाल एक खाजगी संस्था करते

बरोज हे स्वायत्त आहेत व जीएलसी त्यांच्या कारभारात हस्तक्षेप करु शकत नाही बरोजचे कर्मचारीच दोन लाख आहेत अर्थात जीएलसी व बरो यांचे सहकार्य असते व दोघात सलोखा असतो प्रत्येक बरोला एक 'मेयर' असतो, आल्डरमेन, कौन्सिलर्स आणि एक टाऊन क्लार्क असतो टाऊन

क्लार्क हा मुख्य प्रशासकीय अधिकारी (म्युनिसीपल कमिशनर किंवा चीफ् अॅडमिनिस्ट्रेटर) असतो. टाऊन क्लार्कची नियुक्ती बरो कौन्सिल करते आणि याला पगार मिळतो—मेयर, कौन्सिलर्स आल्डरमेन याना अर्थातच पगार नसतो मेयरचे पद म्हणजे 'भूषण' समजले जाते सत्ता थोडीशीच, व मुदत एक वर्षाची कौन्सिलर्स आणि आल्डरमेन याची मुदत तीन वर्षांची असते.

जीएलसीचे मुख्य कार्य म्हणजे शहरातील रस्ते चागले ठेवणे, अग्नि-प्रतिबध व शमन, अॅम्ब्युलन्स सर्व्हिस, मोटारीसारख्या वाहनाना परवाना देणे, पुरावर नियत्रण, इनर लडनमधील शिक्षण आणि योजना हे आहे. बरो कौन्सिलकडे सूतिकागृहे व बालसगोपन, स्थानिय सॅनिटेशन, शहरातील घाण साफ करणे, कसाईखाने, वाहतूक, ग्रथालये, हवेत धुराचा प्रकोप न होऊ देणे, अपग व वृद्ध याची देखभाल करणे, इ इ. कार्ये असतात.

लडन शहरातील पोलिसावर जीएलसी किंवा बेरोजची सत्ता नाही. 'सिटी' या नावाचा लडन शहरात एक स्वतत्र भाग आहे (याविषयी पुढे अधिक लिहिले आहे) त्याचे एक स्वतत्र पोलिस दल आहे, अन्यथा पोलिस खाते स्थानिक स्वराज्य सस्थेपासून स्वतत्र आहे. जग ज्याला स्कॉटलन्ड यार्ड म्हणून ओळखते. असा मेट्रॉपॉलिटन पोलीस डिस्ट्रिक्ट विभाग आहे, आणि हा विभाग केंद्र सरकारच्या गृहखात्याच्या नियत्रणाखाली असतो, व गृहखात्यालाच जबाबदार असतो.

मेट्रॉपालिटन पोलीस डिस्ट्रिक्टच्या आधिपत्याखाली ७५० वर्ग मैलाचा टापू आह, आणि जवळ जवळ २००० चा स्टाफ आहे याचा सी. आय. डी. विभाग राष्ट्रीय पातळीवर कार्य करतो येवढेच नव्हे तर राष्ट्र-कुलातील (कॉमनवेल्थ) कोणत्याही सदस्य राष्ट्राला जरुर तेव्हा मदत करतो व इटरपोलशी घनिष्ट सबध राखून आहे 'यार्ड'चे कार्य जगप्रसिद्धच आहे

स्कॉटलड यार्डची मुख्य कचेरी पूर्वी तमसा नदीच्या किनारी, व्हिक्टोरिया एम्बॅन्कमेन्टवर, होती पार्लमेन्ट जवळच आहे. ही इमारत म्हणजे पूर्वी स्कॉटलन्ड राजाचे "ऑपेरा हाऊस" होते. (म्हणून स्कॉटलन्ड यार्ड म्हणतात) यानतर व्हिक्टोरिया स्ट्रीटवर स्कायस्क्रेपर इमारत बाधली व त्यात मुख्य कचेरी व पुष्कळसे ऑफिसेस गेले—या नवीन इमा-

रतीला पूर्वीची 'शान' किंवा ग्रॅन्जर नाही. जुन्या ऑफिसातून नदीवरील दृश्ये, बिगबेन, वेस्टमिन्स्टर अबे सहज दिसत आता फक्त रस्ते आणि त्यावरील वर्दळ– मेट्रोपॉलिटन पोलीस डिस्ट्रिक्टचे वार्षिक अंदाजपत्रक जवळ जवळ पन्नास कोटी पौंडाचे, (अंदाजे नऊशे कोटी रुपयाचे) असते. यापैकी अर्धा पैसा सरकार देते व अर्धा स्थानीय कराच्या रुपाने वसुल केला जातो. मानवी स्वभावातील दुर्बलतेची झलक सोडल्यास लंडन पोलिस खात्यात भ्रष्टाचार नाही–लंडनची प्रचंड लोकसंख्या, अनेक राष्ट्रातून आलेले लोक,निरनिराळ्या वर्णांचे,धर्मांचे लोक, हे लक्षात घेता, लंडन शहरात गुन्हे फार कमी होतात– (जातीय किंवा वर्णद्वेषाचे दंगे ही बाब वेगळी) १९५३ त १९५५ मध्ये मी लंडनला असता रात्री अप-रात्री एकटे हिंडण्यात जास्त धोका नव्हता, त्याचप्रमाणे १९७७ साली सुद्धा मला वाटत नाही कित्येका वेळा,ब्रिटीश म्यूझियममधे काम करणारे माझे महाराष्ट्रीय मित्र श्री कुळकर्णी यांचे बरोबर मी संध्याकाळ घालवित असे (हे आजन्म ब्रह्मचारी आणि ब्रिटीश म्युझियम जवळच एक खोली भाड्यानें घेऊन राहातात) आणि जेवण वगैरे करुन रात्रीच्या ट्यूबने घरी परत येत असे. येताना मला ट्यूब बदलावी पण लागायची आणि ईस्ट फिचली स्टेशनावर रात्री ११ वाजता मी पोचत असे, तिथून माझ्या जावयाचे घर एक किलोमीटर होते व ते मी पायीच जात असे. रस्त्याने उंचच उंच बॉबी फक्त दिसायचा–मला कधी भीती वाटली नाही अमेरिकेत संध्याकाळनंतर घराबाहेर पडणे धोक्याचे आहे हे सर्वा–नाच माहीत आहे-खुनासारखें गुन्हेही लोकसंख्येच्या मानानें अल्प आहेंत अर्थात "हिंसात्मक गुंडाई" वाढत आहे-घरफोडीचे गुन्हेंही वाढत आहेंत-विसाव्या शतकाच्या अंतिम चरणातील प्रत्येक राष्ट्रानेच ही "उपलब्धि" प्राप्त केलेली आहे अफू, गांजा चरस आदि मादक पदार्थांचे सेवन वाढत आहे पण याचे "चोरीचे" गुन्हे कमी आहेत कारण शासनाने एक सुपीक युक्ति त्यासाठी शोधून काढला. डॉक्टरच्या सर्टिफिकेटवर हे अमली पदार्थ राजरोस विकत घेता येतात– आणि, या मादक पदार्थांचे सेवन वाढले असले तरी ज्याला "ॲडिक्ट" (व्यसनाधीन) म्हणतात, अशाची संख्या एकदर अत्यल्प आहे. पोलीसांना हे लोक माहीत आहेत, व यात गुन्हेगार कोणीच नाही असे सर्वसाधारणपणे म्हणता येईल.

लडनचा "बॉबी" नि.शस्त्र असतो हे सर्वांना माहीतच आहे,व याचे फार आश्चर्य जगातील अन्य राष्ट्राना वाटते. पोलीसाना शस्त्रे द्यावीत अशी मागणी काही वेळेस नागरिकानी पण केली आहे. पण विचारपूर्वक यार्ड अधिकारी व शासन यानी तसे केले नाही पहिली गोष्ट म्हणजे, पोलीसानी पिस्तुल वाळगल तर गुन्हेगार अधिक परिणामकारक शस्त्रे बाळगतील, आणि ते अधिक हानिकारक होईल .. दुसरी गोष्ट, जनतेचे पोलीसाना स्वेच्छापूर्वक व जिव्हाळ्याचे सहकार्य असेल तरच हितावह ठरते व इग्लडची परपरा तीच आहे पोलीसाना शस्त्रे दिली तर जनतेचा विश्वास व सहकार्य ते गमावून बसतील – हे दोन्ही मुद्दे चिंतनीय आहेत अन्य राष्ट्रानी धडा शिकायला हवा. "द सिटी" लडनमधे अनेक विरोधाभास आहेत – हे विरोधाभास म्हणजे, जेव्हाजेव्हा काही सघर्ष, काही समस्या, काही आपत्ती किंवा काही काळानुसार बदल करण्याचा आवश्यकता निर्माण होते, तेव्हा तेव्हा, जुन्याचा सपूर्णपणे त्याग न करता, जुन्यानव्याचे मिश्रण करायचे ही एक प्रवृत्ती इग्लडमधे दिसून येते इग्लडची राज्यपद्धती, इग्लडची शिक्षणपद्धती, इग्लंडचे चर्च, ही याची ठळक उदाहरणे होत लंडन शहरातील एक लहानसे "पोटशहर", "द सिटी" हे आणखी एक उदाहरण–

"द सिटी" लडनशहराच्या जवळजवळ केंद्रस्थानी आहे – त्याचा विस्तार किती ? केवळ १ ०३ वर्ग मैल. दिवसा "द सिटी" ची लोकसंख्या पाच लाख असते, आणि रात्री केवळ पाच हजाराच्या आसपास – कारण, रात्रीच्या मुक्कामाला राहणारे नागरिक अत्यल्प– 'द सिटी' म्हणजे व्यापार उद्योगधद्याचे केन्द्र– ऑफिसेस बद झाली की हा भाग निर्मनुष्य !–

अधिकृतरित्या, 'द सिटी' चा लंडनच्या अन्य भागाशी काही सबध नाही. याचे प्रशासन 'कार्पोरेशन ऑफ् द सिटी ऑफ् लंडन' तर्फे चालते, आणि जी एल सी. पासून पूर्ण स्वतत्र आहे. अर्थात् 'स्वतत्र' म्हणजे वेगळेपणा नव्हे, सहकार्य प्रत्येक ठिकाणी आहे – 'द सिटी' चा लॉर्डमेयर असतो. पुष्कळ लोकांची गैरसमजूत आहे की लार्डमेयर हा सर्व लडन शहराचा मुख्य प्रशासक आहे. परंतु लॉर्ड मेयरची सत्ता १.०३ वर्ग मैल पलिकडे नाही – 'द सिटी' चे स्वत चे पोलीस दल आहे ! या पोलीसाचा गणवेष, त्याना परपरेचा किती अभिमान

आहे याचा नमुना आहे. त्याना रोमन हेल्मेट्स् आहेत, लाल आणि पांढरे आर्मलेटस् आणि चकचकीत पिवळ्या पितळेची बटने असलेला जाडजूड युनिफॉर्म – प्रत्येक पोलीस कमीतकमी ५'–११" असलाच पाहिजे सर्वसाधारण उंची सहा फूट आहे त्याच्या जवळ खिश्यात लहानसा वॉकी टॉकी असतो.

कित्येक शतकापर्यंत द सिटी जगातील आर्थिक नियत्रणाचे केंद्र होते इथेच बॅन्क ऑफ इग्लड (१९४६ साली राष्ट्रीकरण झाले) लॉईड्स बॅन्क, आणि स्टॉक एक्सचेंज आहे. या भागात ब्रिटनमधल्या चार हजार बँकाच्या शाखा आहेत आणि या भागात जगातील जितक्या बँकाच्या शाखा आहेत तितक्या अन्यत्र कुठेही नसतील. विम्याचा धदा इथे तेजीत आहे आणि ब्रिटीश निर्यातीसाठी आर्थिक साहय यांचेकडून मिळते द सिटीचे क्षेत्रफळ ६६७एकर एवढेच आहे.येवढासा भूभाग तमसा॰ वरील चार लडन ब्रिजेसची व्यवस्था पाहतो, कित्येक मैलापर्यत याचे डॉक्स् आहेत, सुप्रसिद्ध फ्लीट स्ट्रीट आणि सेंटपॉलचे चर्च याच्याच अधिपत्याखाली, आणि बिलिग्जगेट, स्पायटल्फील्डस्, स्मिथफील्ड सारखे बाजार याच्याच मालकीचे – द सिटीच्या मालकीची इस्टेटही दूरवर पसरलेली आहे– ईफिगफॉरेस्ट, आणि बकिंगहॅमशायर मधील बर्नहम बीचेस् द सिटीचे याच्यावरील खर्च 'सिटीज कॅश' उर्फ खाजगी पैशातून केला जातो–महत्वाची गोष्ट म्हणजे द सिटीच्या नियत्रणाखाली आर्थिक व्यवहार, व्यापार आणि सुवर्ण या महत्वाच्या गोष्टी आहेत. द सिटीचा आत्मा म्हणज 'पॉवर ऑफ मनी'–

'द सिटी'चे मूळ रोमन काळापासून आहे, आणि आता द सिटीचे क्षेत्रफळ निश्चित केलेले आहे ते रोमन काळापासून आहे असे म्हणतात. शतकानुशतकाचा ब्रिटीश इतिहास म्हणजे द सिटी मधले थैलीवाले आणि राजा व पार्लमेन्ट यातील सत्तास्पर्धेसाठी अलिखित छुपा सघर्षच ! कारण, पैशाखेरीज सत्ता दुबळी असते–आज सुद्धा अशी परपरा आहे की द सिटीत इग्लडच्या राजाला प्रवेश करायचा असल्यास, लॉर्डमेयरची परवानगी घ्यावी लागते. उदा० स्वतत्र्या राणी एलिझबेथला तिच्या लवाजम्यानिशी द सिटीत यायचे असल्यास, स्ट्रॅन्ड भागातील टेम्पल बार या द सिटीच्या सीमा रेषेपाशी थाबते, तिथे लॉर्ड मेयर राणीचे स्वागत

करील (मुळचा 'वार' ख्रिस्टोफर रेनें ने बांधला होता, तो नष्ट झाला, पण सीमारेषा कायम आहे !) त्यानंतर लॉर्ड मेयर राणीला परंपरेप्रमाणें द सिटी च्या चार ऐतिहासिक तलवारींपैकी एक तलवार, तिचे टोक खाली करून, नजर करील, परंपरेप्रमाणे राणी त्या तलवारीचा स्वीकार करून, परंपरेप्रमाणे राणी त्या तलवारीचा स्वीकार करून, परंपरेप्रमाणे ती तलवार पुनश्च लार्डमेयरला परत करील – लॉर्ड मेयर ती तलवार हातात उंच धरून, राणीच्या पुढे अगदी ताठ चालेल. ही तलवार म्हणजे त्याच्या सार्वभौम अधिकाराचे प्रतीक आहे ! या रितीने राणी व लार्ड-मेयर, (म्हणजेच द सिटी ची सत्ता) या दोघांची इभ्रत व दर्जा राखला जातो – लार्डमेयर राणीला लवून कुर्निसात करील, पण सिद्धांत स्पष्ट आहे की राणीला केव्हाही द सिटींत प्रवेश करायचा असल्यास तिला परवानगी मागावी लागते !– आणि हा बहुमोल मानाचा अधिकार दृढतेने जोपासला गेला आहे व पाळला जातो

द सिटीचे प्रशासन इंग्लंडच्या अन्य प्रशासनाप्रमाणे थोडे गुंतागुंती-चेच आहे, कारण मध्ययुगीन परंपरा व नव्या जमान्याची हाक, दोघांचाही मेळ बसला पाहिजे व्यापार आणि शस्त्रे यांचा संगम झाला आहे अर्थात्, हे शस्त्रधारी (पॅनोप्ली) केवळ देखाव्यासाठीच असतात सामंतशाहीचे (जी जगात अन्यत्र क्वचितच आढळेल) हे एक परंपरेचे अभिमान बाळगणारे इंग्रजांच्या स्वभावाचे निदर्शक आहे – प्रशासनाच्या यंत्रणेचा मुख्य आत्मा म्हणजे 'कॉमन हॉल," या कॉमनहॉलचे सदस्य "लिव्हरी कंपन्या" तून निवडलेले असतात. अशा लिव्हरी कंपन्या एकदर ८४ आहेत, आणि प्रत्येक कंपनीचे मूळ मध्ययुगातील "गील्ड (गट किंवा संघ) पासून आहे 'लिव्हरी' म्हणजे एक विशिष्ट गणवेष प्रत्येक गिल्डचे सदस्य अथवा त्यांचे नोकर विशिष्ट गणवेष वापरीत अशा कंपन्यांना "लिव्हरी कंपन्या" म्हणतात प्रत्येक 'गिल्ड' मध्ययुगात आपापल्या सदस्यांचे हित रक्षण करण्याकरिता निर्माण झाले होते या 'गिल्ड'च्या सदस्यांचा एक समान व्यवसाय असे उदा० सोनार, लोहार, शिंपी, मासे पकडणारे व विकणारे, रस्त्यावर कापडाची किरकोळ विक्री करणारे (यांना 'हॅबरडॅशर' म्हणतात), इ इ. या व्यवसायातील लोकांनी आपले गिल्डस् स्थापन केले होते– यांची जसजसी आर्थिक भर-

भराट होत गेली तसतशी याची पत वाढली, समाजात प्रतिष्ठा निर्माण झाली (काही गिल्डसनी शाळा काढल्या होत्या, त्या शाळांना पुढे खूपच प्रतिष्ठा प्राप्त झाली, कारण त्या शाळा 'पब्लिक स्कूल्स' मध्ये परिवर्तित झाल्या, आणि इंग्लडमधे 'पब्लिक स्कूल' ला फारच प्रतिष्ठा आहे ईटन् हॅरो, याची नावे सुप्रसिद्धच आहे, मर्चण्ट टेलर्सचा गिल्ड होता, त्यांनी एक शाळा त्याकाळी, सोळाव्याशतकात काढली त्या शाळेत लॉर्ड क्लाईव्ह, ज्याने भारतात ब्रिटिश साम्राज्याचा पाया घातला हा विद्यार्थी होता, तेव्हा त्या शाळेची त्यावेळची तारीफ काय असावी याची कल्पना येईलच परतू, पुढे ही शाळा फारच नावाजली व आज पब्लिक स्कूल्समधे मानाचे स्थान पटकावून आहे )

पुष्कळशा लिव्हरी कपन्याचे हॉल्स आहेत व त्यात वर्षातून एकदा विलक्षण थाटामाटात मेजवानी दिली जाते या मेजवानीचा थाट अवर्ण-नीय असतो—या मेजवान्याचा हेतू तसा काही नसतो त्याना 'सेरेमोनियल' म्हणता येईल. या लिव्हरी कपन्यापैकी फारच थोडया काही नागरी कामे करतात, येवढेच नव्हे तर त्याच्या मूळ धद्याशी त्याचा आता काही सबध सुद्धा नाही ! उदा० 'हॅबरडॅशर्स'– फुटकळ वपडे विकणाऱ्याचे हे मूळचे गिल्ड, आता त्यातील कोणताही सदस्य हॅबरडॅशर नाही किंवा नवीन येणारा सदस्य हॅबरडॅशर असलाच पाहिजे असे नाही ! काही लिव्हरी कपन्या मात्र आपले मूळ दाखविण्यासाठी, थोडा व्यवहार करतात. उदा० फिशमॉन्गर्स (मासेविके) अजून मासळीच्या व्यापाराच्या काही बाजू साभाळतात

या लिव्हरी कपन्याविषयी खरे म्हणजे एक पुस्तकच लिहायला पाहिजे, इतका याचा इतिहास राष्ट्राच्या विकासाशी, लडनच्या जीवनाशी; साम्राज्यवाढीशी निगडीत आहे ! यातील बारा कपन्या 'ग्रेट' समजल्या जातात. 'दमर्सस्' (१३९३ त स्थापना) ची स्थापना रेशीम, मखमल विकणाऱ्यानी स्थापन केली होती 'द स्किनर्स' (१३२७) 'द साल्टर्स' (१५२८)– सर्वात जुने गिल्ड 'द वीव्हर्स' (११८४), द आर्मरर्स अॅन्ड ब्रेसियर्स, बोयर्स, (धनुष्य बनविणारे व विकणारे), कॉर्डवेनर्स (जोडे बनविणारे), लॉरिमर्स, स्क्रिव्हनर्स, (दस्तऐवज लिहिणारे नोटरी), गोल्ड अॅन्ड सिल्व्हर वायर ड्रॉअर्स, सॅडलर्स (१२७२) ब्रॉडरर्स, गर्डलर्स, फ्लेचर्स

अॅपोथिकरिज– (१६०६) – अॅपोथिकरिज कंपनी अजूनही 'मेडिसिन, सर्जरी, मिड्वाईफरी' या विद्यार्थ्यांच्या परिक्षा घेते व डिप्लोमा देते

पुष्कळशा लिव्हरी कपन्या आता नामशेष झाल्या आहेत. उदा. सिल्कथ्रोअर्स, हॅटबॅन्ड मेकर्स आणि लॉन्ग बो स्ट्रिन्गमेकर्स सर्वात संख्येने मोठी लिव्हरी कपनी, 'द शिप्राईटस्' होय हिचे ५०० सभासद आहेत; सर्वात लहान 'आयर्न मॉन्गर्स' हिचे केवळ ३५ सभासद आहेत एकदर ३३ कपन्याचे हॉल्स आहेत आणि लिव्हरीमेनची सख्या १४००० आहे ऑफिशिअल समारभाचे वेळी या लिव्हरीमेनचे प्रतिनिधी त्याच्या विशिष्ट गणवेशात येतात, तो पाहण्यासारखा असतो.

द सिटी ची मतदार सख्या अल्प आहे, कारण, बहुतेक लोकसख्या बाहेरच राहाते- मतदानाचा हक्क असणारा पुरुष किंवा स्त्री द सिटीचा प्रत्यक्ष रहिवाशी असणे ही प्रमुख अट आहे, किंवा द सिटी मधे एखाद्या जागेचा मालक अथवा भाडेकरी असला पाहिजे, आणि वर्षाला सरकार-ला दहापेक्षा अधिक पौंडाचा प्रॉपर्टी कर भरत असला पाहिजे. निवडणुकी-ला उभे असणारे लिव्हरमेन असणे आवश्यक आहे प्रत्येक गिल्डचे सदस्य लिव्हरीमेन असतात असे नव्हे– उदा द पॅरिश क्लार्क्स आणि वॉटरमेन या गिल्डस्ना लिव्हरी प्रदान केली गेली नाही– उमेदवाराने वैयक्तिक भूमिकेवरुन निवडणूक लढविली पाहिजे, कोणत्याही राजकीय पक्षाचे लेबल लावता कामा नये– २५ वॉर्डसाठी २६ आल्डरमेन आणि १५९ कौन्सिलर्स निवडले जातात काही वार्डस्ची नावे फार गमतीदार आहेत. नमुना पहा– 'चिप', 'फॅरिन्गुन वुईदिन' आणि 'फॅरिन्गुन वुईदाऊट' दोन शेरीफ ('शेरीफ' ची जागा सातव्या शतकापासून अस्तित्वात आहे) निवडले जातात– याची निवड कॉमन हॉलमधे असलेल्या लिव्हरी-मेन कडून प्रत्यक्ष केली जाते. या सर्वांवर 'लॉर्ड मेयर' असतो लॉर्ड मेयरची निवडणूक दरवर्षी होत असते– आल्डरमेन हात उच करून मेयरसाठी दोन नावे सुचवितात केवळ दोनच नावे सुचवायची असतात, आणि इंग्रजीत ज्याला 'जन्टलमन्लीनेस' म्हणतात त्याचे कसोशीने पालन केले जाते. प्रत्येकाला माहीत असते की लॉर्ड मेयरसाठी कोणती नावे सुचवायची असतात, व केवळ तीच नावे सुचविली जातात हा 'जन्टल्मन्लीनेस' या दोघापैकी एकाला निवडायचे असते, व ही निव-डणुक आल्डरमेनच्या कोर्टात गुप्तमतदान पद्धतीने होते. मतपत्रिका सील

केल्या जातात जो निवडणुक हरतो, तो बहुतकरुन पुढल्यावर्षी लॉर्डमेयर म्हणून निवडला जातोच लॉर्डमेयरच्या पदासाठी उमेदवाराने आल्डरमेन असणे व शेरीफ म्हणून काम केलेले असणे अत्यावश्यक आहे- नवीन लॉर्ड मेयर निवडला गेल्यानतर, मावळत्या लॉर्ड मेयरने आपले पद नूतन पदाधिकाऱ्याला द्यायच्या समारभास ' सायलेन्ट चेन्ज ' असे नाव आहे लॉर्ड मेयरचे पद एक वर्षानतर सोडल्यावर, तो पुनश्च आल्डरमेनचे कार्य करू लागतो, आणि या स्थित्यतरास ' हू हॅज पास्ड् द सिव्हिक चेअर ' असे ओळखले जाते मावळता लॉर्डमेयर, पद सोडताना, नव्या मेयरला स्फटिकाचा राजदड देतो आणि एक जुनी पर्स देतो (' शॅटर्ड पर्स ' असे म्हणतात.) या दोन वस्तू पहिल्या एलिझाबेथराणीने द सिटीला बहाल केल्या होत्या

द सिटीच्या लॉर्ड मेयरची निवडणुक, त्याने अधिकार ग्रहण करण, या सर्व सोहळ्यात इतका काही थाटमाट व रूढीप्रियता असते की ते सर्व पाहाताना आपण तेराव्या चौदाव्या शतकात तर नाहीना असे वाटल्या-वाचून राहात नाही, पण, हा सोहळा अत्यत निष्ठेने, भक्तीने, आपुलकीने आणि गभिरतेने पार पाडला जातो- नव्हे लॉर्ड मेयर अधिकारग्रहण करण्यापूर्वी, द सिटीचे मुख्य अधिकारी जाभळसर रेशमी मखमली पाय-घोळ झग्यांत सेन्ट लॉरेन्स ज्युअरीत (हे चर्च रेनने बाधलेले) जाऊन प्रार्थना करतात ही प्रथा डिक् व्हिटीन्गटनपासून पडली हे डिक् व्हिटीन्गटन १३९७ ते १४२३ च्या दरम्यान तिनदा लॉर्ड मेयर होता हा एक विक्रमच आहे! चर्चमधील प्रार्थना आटोपली की अधिकाऱ्याची ही मिरवणुक ' गिल्ड हॉल् ' ला परत येते- गिल्ड हॉल् पधराव्या शतकात बाधला गेला दुसऱ्या महायुद्धात बॉम्बहल्ल्याने गिल्डहॉलचे पुष्कळच नुकसान झाले, पण आता त्याचा मागमूसही दिसत नाही-

यानतर लॉर्डमेयरची नेत्रदीपक मिरवणुक निघते ही ' शोभायात्रा ' म्हणजे लडनमधले एक मोठे आकर्षण असते या समारभाचा मुख्य उद्देश जो पूर्वापार चालत आला आहे, लॉर्ड मेयरच्या निवडणूकीस राजाने समती देणे. राजाचे (' राजा ' न म्हणता ' क्राऊन ' म्हटले जाते) प्रतिनिधित्व लॉर्ड चीफ् जस्टिस करतात- दुसरा उद्देश जनतेवर छाप पडावी हा पण असावा- नवे मेयर स्ट्रॅंडपासून लॉकोर्टस् पर्यन्त एका

सजवलेल्या कोच मधून येतात हा कोच १७५७ मध्ये बनविला गेला आहे, बनविला आणि त्याचे वजन जवळ जवळ चार टन आहे ! हा कोच अत्यंत देखण्या व शृंगारलेल्या सहा घोड्याकडून ओढला जातो ! त्याच्या मागोमाग अनेक झाकी (फ्लोटस्) या मिरवणुकीत रंग भरतात. ही थाटामाटात वैभवशाली मिरवणूक गिल्डहॉलपाशी जाते काही दिवसानंतर या समारंभाची सांगता, मेयरतर्फे गिल्डहॉलमध्ये देण्यात येणाऱ्या शाही खान्यात होते इंग्लंडमध्ये इतक्या थाटामाटात दुसरा कोणताही खाना नसतो असे म्हणतात मेजवानीच्या वेळी प्राईममिनिस्टर हा मुख्य वक्ता असतो. या मेजवानीच्या वेळी राज्यातील बहुतेक सगळे मंत्री–अधिकारी उपस्थित असतात त्याचा पोशाख या मेजवानीला साजेसाच असतो.

यातील विरोधाभास असा की लॉर्डमेयरच्या हातात प्रत्यक्ष सत्ता काहीच नसते पण त्या स्थानाचा दबदबा आणि इभ्रत फार ! दुसरा विरोधाभास म्हणजे द सिटीच्या बाहेर लंडनमध्ये सुद्धा ज्याचा अधिकार चालत नाही, असा लॉर्ड मेयर हा केवळ ‘ द सिटी ’ चा मेयर म्हणून पाहिला जात नाही, त्याला ‘ राष्ट्रीय ’ पुढाऱ्याप्रमाणे पाहिले जाते व वागविले जाते, द सिटी ’ मध्ये राजाऐवजी, प्रत्येक ठिकाणी तो अग्रभागी असतो ! प्राईममिनिस्टरची जागाही त्याचे नंतर ! येवढेच नव्हे तर ‘ क्राऊन ’ व्यतिरिक्त राजघराण्यातील इतर व्यक्ती सुद्धा लॉर्डमेयर नंतर येतात ! हा त्याचा रुबाब ' उदा हल्ली राणी एलीझाबेथ ‘क्राऊन’ आहे राणी एलीझाबेथनंतर तिचे यजमान न येता लॉर्डमेयर येतील !

लॉर्ड मेयरला तनखा असा नसतो, पण दरवर्षी लॉर्ड मेयरला अदमासे चार लाख रुपये मिळतात ही रक्कम मोठी वाटते, पण प्रत्यक्षात मात्र ही रक्कम लॉर्ड मेयरला पुरत नाही, कारण स्वागतसमारंभ व मेजवान्या त्याला द्याव्या लागतात, आणि लॉर्ड मेयरला पदरचे पैसे खर्चाला भर घालावे लगतात– तेव्हा सामान्यत सांपत्तिकस्थिती यथातथाच असलेला मनुष्य लॉर्डमेयर बनण्याचे स्वप्न पाहू शकत नाही, आणि म्हणूनच आल्डरमेन सुद्धा बनू इच्छित नाही. कारण, प्रत्येक आल्डरमनचे लक्ष लॉर्डमेयर बनण्याचे असते, व केव्हा तरी तो होतोच !

आणखी एक विरोधाभास पहा– ‘द सिटी’ मध्ये लॉर्ड मेयर हेच मुख्य न्यायाधीश (चीफ् मॅजिस्ट्रेट) असतात! आणि, सेन्टपॉल कॅथेड्रल

विश्वस्त असतात। वर्षातून चार वेळा बकिंगहॅम पॅलेस आणि टॉवर ऑफ् लंडन मधून, 'क्राऊन' ची मोहर असलेला परवल येतो। वस्तुत बकिंगहॅम पॅलेस व टॉवर ऑफ लंडन दोन्हीही द सिटीच्या हद्दीत नाही।

लॉर्डमेयरच्या कामकाजात उच्च अधिकारी असतात त्याची नावे मजेशीर आहेत कारण,ती पूर्वापार चालत आलेली आहेत-या पदाची नावे-सेकण्डरी, रिमेम्ब्रन्सर, स्वोर्ड बे अरर, आणि, कॉमन क्रायर (याचे मराठी अनुवाद "दुय्यम," आठवण करून देणारा, "तलवार बाळगणारा,"आणि सर्वसामान्य ललकारणारा)लॉर्ड मेयरची वैयक्तिक राजकीय मते काही असोत, त्याचे वर्तन अत्यंत कसोशीने राजकारणातीत असले पाहिजे। कोणतेही कार्य राजकीय पक्षाच्या दडपणाखाली करता कामा नये। अत्यन्त नि पक्षपाती राहिले पाहिजे। या -मुळेच लॉर्ड मेयरच्या स्थानाची इभ्रत टिकून आहे व सर्व जनतेत आदर आहे ! लंडनचे हे एक महान वैशिष्टय आहे। सार्वजनिक कार्ये, राजकारण निरपेक्ष, सामूहिक रीत्या एकजुटीने केली जातात जगातील अन्य राष्ट्रानी यापासून बोध घेतला पाहिजे।

लॉर्ड मेयरला रोज एकतरी भाषण कुठल्या तरी प्रसगानिमित्त द्यावे लागते, आणि अनेक सार्वजनिक समारभाना हजर राहावे लागते. दैनदिन ऑफिसचे काम टाऊन क्लार्क (चीफ् अॅडमिनिस्ट्रेटर) करीत असतो.

बाराव्या शतकात लॉर्डमेयरचे पदनिर्माण झाले. तेव्हापासून आज तागायत '७१७ लॉर्ड मेमयर्स झाले आहेत। कोणत्याही लॉर्ड मेयरला पद ग्रहण करताना किती अभिमान वाटत असेल।-देशाविषयी प्रेम व निष्ठा, आपल्या कार्याविषयी आस्था व राजकारणाच्या घाणीचा स्पर्श न होऊ देता जनतेचे कल्याण लक्षात टेवून काम करणे, या सर्व उदात्त गुणांचा प्रकर्ष आपल्याला पहायला मिळतो. ज्या देशातील जनतेला आपल्या उज्वल इतिहासाबद्दल प्रेम आहे व अभिमान आहे व तो तसा असला पाहिजे याविषयी सरकारही प्रयत्न करते,तो देश मजबूत झालाच पाहिजे. त्या देशाची उन्नती झालीच पाहिजे भारतात आपला उज्वल इतिहास विसरायला लावायचा प्रयत्न सरकारी रेक्स्ट पुस्त कातून होत आहे किंवा विकृत स्वरुपात शिकविला जात आहे. सत्य पण उज्वल गोष्टी दडविल्या जात आहेत-मुंबईला कॉंग्रेस शताब्दि सोहळा डिसेंबर १९८५ च्या २६

ते २९ तारखेस पार पडला अध्यक्ष प्रधानमंत्री राजीव गांधी! आपल्या भाषणात स्वातंत्र्यासाठी देहार्पण करणाऱ्याची भल मोठी नामावल त्यांनी वाचली, पण तीत वीर सावरकर, से. बापट, कॉ. डांगे, यांची नावे नव्हती! – १९१० साली वीर सावरकराला पन्नास वर्षांची शिक्षा ठोठावण्यात येऊन, हातापायात लोखंडी बेड्या घालून त्यांना अंदमानचा कारावास घडला! पण, सरकारी टेक्स्ट पुस्तकात वीर सावरकरांचे नाव शाळेतल्या मुलांना वाचायला मिळणार नाही! – राजीव गांधींनी सुभाषचंद्र बोसचा सुद्धा गौरव केला नाही! –

आपल्या इतिहासाचा अभिमान असणे हा काय गुन्हा झाला? देशप्रेम वाढावे कसे? भारतात हल्ली सत्ता आणि संपत्ती प्रेम वाढत आहे, वाढीस लागत आहे! अमेरिकेतील विकृत व हीन संस्कृती, बेताल संगीत, उच्छृंखल पोशाख, उथळ म्हणूनच उमट व्यवहार, बेकायदेशीर• वागण्याची वृत्ती, याच गोष्टी बोकाळत आहेत. शनिवारवाडा इंग्रजांनी उध्वस्त केला असेल, पण अनेक ऐतिहासिक वास्तु भग्न पावत आहेत, तिकडे कुणाचे लक्षच जात नाही! छत्तरपूर शहरापासून दहाबारा मैलावर तलावाच्या काठाशी एक रम्य स्थान आहे तिथे जुना मोडकळीस आलेला महाल आहे जिथे पहिले बाजीराव पेशवे मस्तानीसह राहिले होते–त्या महालाची दुर्दशा आहे! – हे एक उदाहरण सांगितले! काही जुन्या राजवाड्यांचे रुपांतर चैनेच्या हॉटेलात होत आहे! – या पार्श्वभूमीवर इंग्लंडकडे लक्ष दिले म्हणजे केवढा फरक दिसतो इंग्लंडचा पंतप्रधान ज्या घरात राहातो, १० डाऊनिंग स्ट्रीटवर, तिथे १८२० पासून पंतप्रधान राहात आले आहेत. 'द सिटी' च्या लॉर्ड मेयरचे वसतीस्थान जुन्या स्टॉकमार्केटच्या जागी १७४० साली बांधले गेले-प्रत्येक लॉर्ड मेयर आपल्या कारकीर्दीत तिथेच राहातो याच वसतीस्थानात 'न्यायकक्ष' (जस्टिस रुम) आहे जगातले हे एकमेव न्यायालय आहे जे एका खाजगी रहाण्याच्या जागेत आहे! 'द सिटी' च्या क्षेत्रात गुन्हा करणाऱ्यांना पकडले जाते व इथे आणले जाते–आठवड्यातून दोनदा न्यायदानासाठी कोर्ट भरते–लॉर्ड मेयर गुन्हेगारांना सहा महिन्यापर्यंत शिक्षा ठोठावू शकतो–लॉर्ड मेयर हा शिक्षित असो वा नसो, लॉर्ड मेयर या पदाचा तो अधिकार आहे! हे कार्य लॉर्ड मेयर चोख बजावतो राजकारण निरपेक्षता,

भ्रष्टाचारापासून सर्वस्वी अलिप्त आणि जनतेचे कल्याण या तीन महत्त्वाच्या गोष्टी अनुस्यूत आहेत, व याच कोणत्याही राष्ट्राला वर आणतात ! भारतात सत्तारूढ पक्षाचा (इंदिरा काँग्रेसचा) मेंबर एखाद्या कार्पोरेशनचा मेयर नसल्यास व कार्पोरेशनमधे सत्तारुढ पक्षाचे सदस्य मताधिक्यात नसल्यास, सत्तारूढ पक्ष कार्पोरेशनच्या समाजहिताचा कार्यात सुद्धा कसे अडथळे आणतो याचे विदारक उदाहरण मुंबई कार्पोरेशनचे? सध्या (१९८६) मुंबईच्या कार्पोरेशनमधे शिवसेनाचे सदस्य संख्येने अधिक आहेत व शिवसेना पक्षाचे श्री भुजबळ मेयर आहेत अनधिकृत जागा व्यापलेल्या लोकांना त्या जागावरुन हटविणे,अनधिकृत झोपडपट्ट्या हटविणे, फूटपाथवरील दुकाने हटविणे, मुंबईत लक्षावधी टन घाण साचते ती हटवून मुंबई स्वच्छ, सुंदर करणे, या शिवसेनेच्या कार्यक्रमात इंदिरा कॉंग्रेसचे सभासद सहकार्य तर देत नाहीतच, उलट विघ्ने आणतात ! हटविलेल्या दुकानदाराना, झोपडपट्टीवाल्याना घेऊन मोर्चे काढतात, इ. इ –२६ डिसे २९ डिसे १९८५ रोजी काँग्रेसचा शताब्दि समारंभ मुंबईत घेण्यात आला वर्तमानपत्रातून अव्यवस्था, गोंधळ याची वर्णने आली होती एक लाखावर लोक जमले होते. पाण्याची नीट व्यवस्था नाही, संडासाची नाही, तीनशे कोऱ्या बसेस प्रतिनिधीसाठी खास ! ह्या सोहळयास हजर रहाण्याची जे काँग्रेसवाले रेल्वेने आले त्यापैकी पुष्कळानी अलाहाबाद जबलपूर मार्गावरील सटना स्टेशनावर गोंधळ केला, रेल्वे कर्मचाऱ्याना पिटले असे वृत्त प्रसिद्ध झाले

मुंबईची हल्लीची परिस्थिती लक्षात घेता तिथे हे अधिवेशन घ्यायला नको होते असे मेयर भुजबळाचे मत होते, पण ऐकते कोण?–

१९४२ साली ज्या गोवॅलिया ('गवळी' शब्दाचा अपभ्रंश) टॅन्कवर काँग्रेसचे अधिवेशन ७ व ८ तारखाना भरले होते व त्या अधिवेशनात 'भारत छोडो' आदेश इंग्रजाना देऊन, 'करा या मरा' (डू ऑर डाय) हा संदेश भारतवासीयांना दिला होता, त्याच ठिकाणी हा शताब्दि सोहळा सुरु होता पण दोन दृश्यात अक्षरश: स्वर्ग व नरक असा फरक होता ! त्यावेळी ब्रिटीश राज्य होते, ब्रिटन व जपान हिटलरशी प्राणपणाने लढत होते, अशावेळी सुद्धा ब्रिटीशांनी या अधिवेशनाचे ठिकाणी इतके पोलीस ठेवले नव्हते. यावेळी साडेचार हजार पोलीस होते! दारावर प्रवेश

करणाऱ्याची तपासणी घेता यावी यासाठी मेटल डिटेक्टर होते-येवढा बंदोबस्त असून अधिवेशनात प्रचंड गोंधळ झाला। पोलिसांना लाठीमार करावा लागला आणि शभर माणसे जखमी झाले. कॉंग्रेसचे जे सेवादल होते त्यापैकी काहींना पिक्पॉकेटींगसाठी पकडण्यात आले। माईक नीट चालत नव्हता !– जनतेकडे पाठ फिरवून बसलेले, पैसेवाल्यासाठी पैसेवाल्यानी घेतलेल हे अधिवेशन !–जनतेला काय संदेश देणार ! जनतेच्या मनात देशाविषयी सरकारविषयी प्रेम कसे निर्माण होणार ? भारताचे प्रधान मंत्री व अन्य मंत्री आणि अधिकारी, इंग्लंडच्या अनेक वेळा वाऱ्या करतात. सरकते जिने या खेरीज त्यानी काहीच पाहिले नाही का?

लंडनचे व त्यातील स्कॉटलन्ड यार्ड, द सिटी त्याचे मी विस्तारपूर्वक वर्णन यासाठी केले की देशाचा उत्कर्ष एका एकी होत नसतो त्यासाठी तळमळ, इच्छा, प्रयत्न, निस्वार्थीपणा, शुद्ध आचरण याची फार आवश्यकता आहे हे ध्यानात यावे !

याचा अर्थ लंडनमध्ये वा लंडन वासीय इंग्रजात दोष नाहीत असे नव्हे ! लंडन काही स्वर्ग नव्हे ! तिथेही माणसेच राहातात–लंडनलाही गरीब व श्रीमंत हा भेद आहे खूप आहे, व तो टिकवला जाण्याची इच्छा प्रच्छन्नपणे होत असते. ड्यूक व कॉक्नी हा फरक सामाजिक विषमता विदारकतेनें स्पष्ट करतो ज्या देशावर हल्ली आर्थिक संकट आले आहे अशा देशाची राजधानी लंडन आहे. जुगारावर जो कोट्यावधी पैसा खर्च होतो तो अनाठायी आहे, व राजघराण्यावरील खर्चही अनाठायी वाटतो पण, यातही विरोधाभास आहे अनेक सुशिक्षित इंग्रज स्त्री पुरुषाशी चर्चा करता मला आढळते की त्याचे पक्के मत आहे की 'क्राऊन' हा त्याच्या लोकशाहीचा मध्य बिंदू आहे केंद्र आहे. 'क्राऊन' मुळे त्याची लोकशाही मजबूत आहे !

लंडनची हल्लीची तरुण पिढी पाहिली की त्यातील उथळपणा, भडकपणा, उनाडपणा, या गोष्टी काळजीच्या वाटतात. वर लिहिल्या प्रमाणे समाजात जाणवेल अशी विषमता आहे आणि 'पब्लिकस्कूल टाय' भावना सैल होत असली तरी गेलेली नाही, वर्णद्वेष वाढत आहे आणि हे इंग्रजाना भूषणावह नाही. याची कारण मीमांसा करण्याचे हे स्थळ नव्हे–

हे सगळे खरे असले तरी लंडनमध्ये प्रवेश करणाऱ्याला व राहणाऱ्याला लंडनचे व्यवहार कसे सुरळीतपणे चालल्यासारखे वाटतात! द क्राऊन, पार्लमेन्ट, राष्ट्रीय सरकार, जीएलसी, बरोज, द सिटी, पोलीस, पोस्ट ऑफिस (दिवसातून तीनदा पत्राचा बटवडा होतो), ग्रीनबेल्ट पलीकडे वसलेली शहरे–या सर्व गोष्टी सभ्यता,सुसंस्कृतपणा व चांगुलपणा यांचेच निदर्शक वाटतात. याचे एकच कारण द्यायचे म्हटल्यास 'लोककल्याणाची जाज्वल्य भावना व त्या दृष्टीने सर्वांचे अथक् प्रयत्न!' जुन्याचा अभिमान कायम ठेवून नवीनतेत जन्म घेणारे लंडन शहर चमत्कार नव्हे, तर मानवी प्रयत्नाचे फळ होय! या प्रकरणाचा प्रपंच त्यासाठी केला!–

०   ०

# रोम

रोम मी प्रथम १९५३ साली पाहिले. मी बोटीतून प्रवास करीत होतो एडन ते मार्सेल्स माझे तिकिट होते प्रथम आमची बोट (ही नॉर्वेजियन मालवाहूबोट कार्गो होती, व हिला फक्त फर्स्ट क्लास होता. ही पॅसेन्जर्स फार घेत नाही शिकस्त सात किंवा आठ ही बोट जपानहून निघाली होती व अमेरिकेस जाणार होती आमच्या बोटीत तीन स्विस् एक जर्मन,-एक अमेरिकन व मी. असे फक्त सहा पॅसेन्जर्स होतो.) बोट जीनोआ बंदराला लागली त्याकाळी विमानापेक्षा बोटीने जाणे अधिक स्वस्त होते. सुएझ कालवा त्यावेळी वाहतुकीला मोकळा होता जीनोआ हे इटलीतले एक प्रमुख बदर-तिथे एक दिवसभर बोट थावणार होती. प्रवासात माझी दोस्ती जर्मन उतारू हेर स्ट्रॉस बरोबर झाली होती, तो जिनोआलाच उतारणार होता. त्याचप्रमाणे तीन स्विस उतारू सुद्धा-या तीन स्विस उतारूल दोन तरूणी होत्या आणि एक तरुण होता. तरु-णींच्या वागण्यात छचोरी नव्हती, आणि त्या फार बोलक्याही नव्हत्या-जर्मन हरे स्ट्रॉस साधारण माझ्याच वयाचा व त्याला भारताबद्दल जिज्ञासा होती. अमेरिकन मनुष्याचा अनुभव मला फार वाईट आला. एडनला बोटीत चढल्यानंतर माझा पासपोर्ट व परकी चलन मी जहाजाच्या कॅप्ट-नच्या स्वाधीन केले तसे करणे फार आवश्यक असते लडनहून भारतात परतताना मी पी अॅन्ड ओ या इंग्लिश कपनीच्या कॉर्फ्यू बोटीने आलो होतो. १८ दिवस मुबई पोचायला लागले यावेळी सुद्धा पासपोर्ट व पैसे बोटीवर चालकाच्या स्वाधीन केले होते

जिनोआला मी उतरल्यानतर (शहरात हिंडण्यासाठी) बोटीच्या कॅप्टनकडून खर्चाचे पैसे मागून घेतले. ते त्या अमेरिकन माणसाने पाहिले मला एकटे गाठून त्याने माझ्याकडून दहा पौंड उसने मागितले. मी त्याला भोळेपणी दिले-ते मला कधीच परत मिळाले नाहीत. बोटीवरच त्याने खर्चाचे पैसे दिले नव्हते, व जिनोआला बोट लागल्यानंतर जहा-जाच्या कॅप्टनने अमेरिकन कॉन्सलशी संपर्क स्थापून अमेरिकन उतारूला त्याच्या स्वाधीन केले.

स्ट्रॉसने मला जीनोआ सगळे दाखविले. तिथली भव्य चर्चेस पाहून मी दिङ्मूढ झालो होतो आतापर्यंत मुंबई इतके मोठे शहर मी पाहिले नव्हते आडिस अबाबाल (ईथियोपियाची राजधानी) मी पुष्कळ वर्षे होतो आडिस अबाबा तर लहानच शहर. (आता मोठे झाले असेल.) आडिस अबाबा हे ख्रिश्चन राष्ट्र खरे, पण चर्चेस काही भव्य नव्हती. मला मुंबईतली चर्चेसच भव्य वाटायची. पण, जीनोआतली चर्चेस पाहून मी थक्क झालो. तेव्हा स्ट्रॉस मला म्हणाला, 'तुम्हाला भव्य चर्चेस पाहायची आहेत तर तुम्ही रोमला जा-रोम जरूर पहा-' रोमला कसे जाता येईल, केव्हा जाता येईल या विषयी मी काहीच कल्पना करू शकत नव्हतो , पण दुपारी लंचच्या वेळी बोटीवर आल्यावर कॅप्टन म्हणाला, 'पॅरिसला रेल्वे संप आहे- तुम्ही पॅरिसहून लंडनला जाणार कसे ?' मी म्हणालो, 'संप किती दिवस चालेल ?' कॅप्टन म्हणाला, 'तीन दिवस तरी चालेल-' मी म्हणालो, 'ठीक आहे तोपर्यंत मी इटली पाहून येतो--'

आणि अशा रीतीने मी इटली हिंडलो, व रोमला गेलो. त्यानंतरही रोमला मी एकदोन वेळा जाऊन आलो

रोमलाही एक आगळे व्यक्तित्व आहे त्यात भव्यता आहे गांभीर्य आहे , तुमच्यासमोर अनेक शतकाचा इतिहास एकदम उभा राहातो. रोम पहाण्यालायक आहे राहाण्यालायकही, निदान मला तरी वाटले. कदाचित् जास्त दिवस राहिलो असतो तर माझे मत बदललेही असते.

मात्र रोम परके वाटत नाही लंडन परिचयाचे वाटले, कारण लहानपणापासून इंग्लंडचा इतिहास व साहित्य याना पाठ करावे लागले होते, परंतु ते राज्यकर्ते होते, म्हणून थोडा दरारा, आदर वाटायचा. रोम माझ्या मनावर कोरे होते त्या शहराविषयी अनुकूल वा प्रतिकूल कोणतेच मत आगाऊ बनविलेले नव्हते नवीन शहर पाहण्याची जिज्ञासा तेवढी होती, आणि जीनोआनंतर इटलीतले मी पाहिलेले दुसरे प्रेक्षणीय स्थळ म्हणजे रोम 'मिलान्ते' मला आवडले नाही व व्हेनिस मी रोम नंतर पाहिले.

रोम तुमच्या मनावर विलक्षण परिणाम करते-पण जे मनावर ठसत ते म्हणजे त्याचे एतिहासिक सातत्य ! याला शेकडोशे, नव्हे हजारो वर्षांचा इतिहास आहे ! दालचिनीच्या रंगासारखे हे शहर, जिथल्या रस्त्याचे फलक संगमरवरी दगडात कोरलेले आहेत. कालातीत आहे–बनारसला गेल्यानंतर वाटले तसेच-याच रोम शहरात दोन हजार वर्षां–पूर्वी ज्यू आणि ख्रिश्चन एकच होते-दोन हजार वर्षापूर्वी लंडन व पॅरीस, दोन्ही रोमच्या वसाहती होत्या–रोम हे जगातले एक भारदस्त शहर आहे, प्राचीन आहे खरे, पण राजधानी म्हणून मात्र अर्वाचीन आहे ! हा एक विरोधाभासच आहे- रोम हे दोन राजधान्याचे शहर आहे–इटलीचे व कॅथोलिक चर्चचे ! तशी लोकसंख्या फार अफाट नाही–त्यावेळी २५ लाख होती आता अलिकडे वाढली असेल. रोम ही इट–लीची राजधानी म्हणजे शासनाचे केंद्रच, पण इटली ह्या देशातील लोक आपल्या स्थानिक शहराविषयी फार अभिमानी (जसे बंगाली लोक त्यांना कलकत्या पलिकडे शहर नाही ) मिलान्ते, नेपल्स, ट्यूरिन, व्हेनिस ही शहरे रोमशी फटकून वागतात.

'रोम' चे महत्व यातील 'व्हॅटीकन' मुळे–खर म्हणजे व्हॅटिक–नच इटलीची राजधानी समजायला हरकत नाही इतके ते महत्वाचे आहे व्हॅटिकन जगातल्या रोमन कॅथोलिकाची 'राजधानी' तर आहेच, पण प्रतीकात्मक दृष्टचा साऱ्या ख्रिश्चनाची ! म्हणूनच इटलीचे सरकार व व्हॅटिकन याचे संबंध एकमेकाशी निगडित असतात

रोम शहराविषयी तुमच्या मनात काही प्रश्न निर्माण झाले तर त्याची उत्तरे तात्काळ मिळणार नाहीत , शोधावी लागतील. रोम शह–रातील लोकसंख्या ९९ टक्के रोमन कॅथोलिक खरी, पण त्यातील २५ टक्के कम्युनिस्ट आहेत !– हा विरोधाभास खरा , पण यातील गोम अशी आहे की रोमन कॅथोलिक्स हे कट्टर कॅथोलिकही नाहीत आणि कट्टर कम्युनिस्टही नाहीत !

रोमचे एक वैशिष्ट मनावर ठसते ते म्हणजे,रोमन लोकाना आपला भूतकाळ जिवत वाटतो, केवळ इतिहासाची मृत पाने वाटत नाहीत. रोमन पूर्वी मूर्तीपूजक होते, त्याच्या खुणा जागोजाग दिसतात रोमची

उत्पत्ती रोम्यूलस आणि रेम्यूस पासून झाली.त्याचे अवशेषही आढळतील. तेव्हा मध्ययुगीन काळातील अवशेषाविषयी बोलायलाच नको

रोम विषयी अनेकानी अनेक प्रकारे लिहिले आहे. आतापर्यंत रोम-वर २।। लाख पुस्तके लिहिली गेली आहेत रोम मध्ये जितकी चर्चेस आहेत, आठशे, तितकी कोणत्याच शहरात नसतील. रोमचे आणखी एक वैशिष्ट, म्हणजे त्यात सर्वकषता आहे मुबई सारखा वकालपणा नाही, पण सर्वव्यापकत्व, कुणालाही इथे परके वाटत नाही-रोम एक प्रचण्ड म्यूझियमच म्हणाना, जगातला सर्वात मोठा म्यूझियम ! भारतीयाना इथे महत्व वाटण्याची कारणे अनेक आहेत त्यातील एक असे की दारिद्र आणि सपत्ती शेजारी शेजारीच दिसतील व्हाया सिस्तिनावर असलेल्या एका अलिशान दुकानासमोर (ज्या दुकानात तीस वर्षापूर्वी पाचशे रूपये यार्ड किमतीचे कापड विकले जाई) एक जोगीण भीक मागत होती ! आपल्या भारतीय शासनाप्रमाणे, 'आश्वासने भरपूर, कृतीचे पाहाता येईल' अशी स्थिती इथेही आहे तरीपण, लंडनपेक्षा रोमला लोक राहाणे पसत करतात लडन हे परकियाना आत्मसात करीत नाही. वेगळे लेखते रोम चटकन आत्मसात करते तो इटलियन लोकाचा स्वभावच आहे. गडीमाणस हसून बोलतील, आणि मित्र म्हणजे कुटुबातलीच एक व्यक्ती होते. एखाद्या कुटुबाचा तुम्हीं विश्वास सपादन केला की जन्म-भर तुम्ही त्याचे झालात — जिवनोपयोगी सुखसोयी भरपूर आहेत नॅशनल म्यूझियम मधे गेल्यावर आत तुम्हाला 'बार' दिसेल — लडनच्या कोणत्याही म्यूझियममधे हे असभवनीयच आहे. पुस्तकाच्या दुकानात वाचकासाठी खुर्च्या ठेवलेल्या असतात. नागपूर तर सोडाच, पण मुबई-पुण्याच्या मोठाल्या पुस्तकाच्या दुकानातून सुद्धाही सोय नाही. पुण्याचे इटरनॅशनल येवढे प्रसिद्ध-पण तिथे कोंडमारा होतो तीच गत मुबईची, दिल्लीची — कापडयाच्या दुकानात एखादे दापत्य शिरले, म्हणजे नोकर आदबीने पतिराजाला बसण्यासाठी खुर्चीपुढे करतील. (कारण कपडे निवडण्यात किती वेळ लागेल हे सागता येत नाही !) रोममधले नागरिक कसे आरामशीर वृत्तीचे वाटतात पियाझा देल पोपोलो कॅफेत एका सध्याकाळी एका लठ्ठ इटालियन माणसाला टेबलावर डोके ठेवून चक्क घोरताना मी पाहिले त्याचे समोर बीयरचा ग्लास होता.

अशी उदाहरणे अनेक ठिकाणी दिसायला मिळतील पॅरीसमधे हे शक्य नाही. त्याचबरोबर पॅरिसमधे वा इंसाबूलामधे जशी रस्त्याच्या कडेला कॅफे असतात तशी इथे नाहीत याची अनेक कारणे असू शकतील. बहुसख्य इटालियन लोकाना केवळ 'ॲपरिजिफ' (जेवणापूर्वी जठराग्नी प्रदीप्त व्हावा म्हणून घेण्यात येणारा मद्याचा घुटका) पिऊन बराच वेळ तिष्ठत बसणे पसत नसते त्याना एवढा धीर कुठला? त्याचा आहार मस्त असतो, आणि केवळ एखादा घुटका पिऊन रेंगाळण्यात त्याना मजा वाटत नाही ते भरपूर जेवणासाठीच रेस्तॉरॉंत प्रवेश करतात शिवाय पदपाथावरील रसवंतीगृहात इटालियन कुटुंबाचे लटावरासाठी इतक्या खुर्च्या कुठे ? याचा अर्थ रोमन लोक पिण्याचे शौकीन नाहीत असा मुळीच नव्हे ! ते अगदी मासळी पाणी पिते तसे मद्य पितात रशियन्स-प्रमाणे – इटालियन लोकाची खाण्यातली रुची पाहून रेस्तॉरॉंसुद्धा विविध प्रकारचे आहेत. (आम्ही भारतीय कॅफे, रेस्तॉरॉं, हॉटेल याचा एकच अर्थ समजतो कॅफे म्हणजे भारतातील रस्त्याच्या कडेला असणारी चहाची दुकानें – हे ढोबळ मानाने समजायचे कारण आमच्याकडील रस्त्यावरची चहाची दुकाने अत्यत घाणेरडी असतात अर्थात आपल्याकडे रेस्तॉरॉं, हॉटेलामधूनही अत्यत घाण असते – रेस्तॉरॉं म्हणजे जिथे व्यवस्थेशीर जेवणखाण मिळते. हॉटेल म्हणजे जिथे भोजन व निवास या दोन्हीची सोय आहे. यात अमेरिकेन पदार्थांनीही आक्रमण केले आहे. उदा० हॉट डॉग्ज आणि हॅम्बुर्गर्स – शेवयाचे तीस चाळीस प्रकार असतात. फळे आणि चीज तर अगदी मस्त असते. जेवणानतर जी 'स्वीट डिश' दिली जाते त्याची नावे व प्रकार इटालियन्सचे खास वैशिष्टय – 'मॅसॅदोनिया' हे शहराचे नाव एका चविष्ट, मधुर फळाच्या मिश्रणाला दिलेले आढळले पियाझा नॅव्होना मधल्या 'त्रे स्कालिनी' त चाखलेल्या चॉकोलेटचे बनविलेले 'गेलातो तार्तूफो' कोण विसरू शकेल ? इटालियन ब्रेडतर अन्य युरोपियन शहरापेक्षा निश्चित अधिक रुचकर वाटली एक गमतीचा अनुभव आपल्याला येतो तुम्ही जिन्नसाची ऑर्डर दिली की वेटर्स भराभरा, त्वरेने जिन्नस आणून ठेवतील, पण बिल मिळायला मात्र खोळबून बसावे लागते. रोमन लोक गोडघाशे वाटले, त्याना गोड पदार्थ फार आवडतात. विशेषत: आईसक्रीम आणि चॉकोलेट तर ते खूप खातात;

आणि त्याचे अनेक प्रकार असतात.

आडिस अबाबा शहर टेकड्यांवर वसलेले आहे, सिमला पण टेक-ड्यावर आहे रोम शहर सात टेकड्यावर वसलेले आहे. तेव्हेरे नदीच्या (टायबर नदी) पूर्वेस – टायबर नदी म्हणजे छोटासा घाणेरडा प्रवाह – या सात टेकड्यापैकी सर्वात लहान कॅपितोलाईन केवळ १९४ फूट उंच आहे, व सर्वात लहान टेकडी, एस्क्वीलाईन १०२ फूट उच आहे

रोम म्युनिसीपालटीचे नाव कॉम्यून दी रोमा असे आहे, आणि एस-पी-क्यू-आर (सिनेट अॅन्ड पीपल ऑफ रोम) हे त्याचे चिन्ह (सिम्बल) आहे. या शहरात कारखाने वगैरे उपनगरात आहेत ही कल्पना मुस्तेलिनीची, की रोम शहर पुढे पुढे सरकत जावे. रोमची लोकसख्या मात्र सारखी वाढते आहे दरवर्षी ८०,००० ते १,००,००० यातली शे. ४० लोकसख्या जन्मास आलेल्याची; आणि शे. ६० टक्के बाहेरून आलेल्याची !– मुबईप्रमाणे !– १८७० मधे रोमची लोकसख्या ७५,००० होती, मुसोलिनी १९२२ मधे सत्तारूढ झाला तेव्हा ४,५०,००० होती, दुसऱ्या महायुद्धाचे अखेरीस ती ९,००,००० झाली. १९५० नतर ती ह्याचे दुप्पट झाली १९७० मधे ती २८,००,००० होती, १९८० त आणखी वाढली असेल – याचे दुष्परिणाम म्हणजे घराची टचाई आणि सार्वजनिक सेवेवर (पब्लिक सर्व्हिसेस) विलक्षण ताण – शिक्षणासाठी सोयी कमी एका खोलीत नियमाप्रमाणे एकानेच रहायला पाहिजे, त्याचे पालन आता कसे होणार. पूर्वी दोघासाठी एक टॉयलेट असायचे,आता ७-८ जणासाठी एक टॉयलेट-अर्थात लंडनमधे सुद्धा कित्येक घरातून ६–७ माणसासाठी एकच टॉयलेट असते भारतातील मुख्य शहराप्रमाणे इथेही झोपडपट्ट्या वसू लागल्या आहेत. अर्थात आपल्याकडील झोपडपट्ट्यासारखी दयनीय अवस्था याची नसते, आणि ही वस्ती मध्यमवर्गीय लोकानी केलेली आहे-ख्रिश्चन लोकात 'दहन' केले जात नाही, 'दफन केले जाते. वाढत्या लोकसख्येचा एक विचित्र परिणाम म्हणजे रोमधील मुख्य दफनभूमी 'व्हेरानो' मधे दफनासाठी मृताची रांग लागलेली असते. त्याना औषधी लावून मजबूत व्हॉल्टस्मधे व्हेरॅनोत ठेवले जाते, लंडनच्या 'ऑब्झर्व्हर' च्या ८ जुलै १९६७ च्या अकातील आकड्याप्रमाणे, आठ हजार मृत शरीरे वाट पहात होती !

रोमकडे वाहाणाऱ्या या लोंढयाची अनेक कारणे आहेत. दक्षिण इटलीत बेकारी खूप, आणि दक्षिणेकडील खेडेगावातील जनता उत्तरेकडे प्रस्थान करते; शिवाय, शहरात राहाण्याचे आकर्षण आहेच. मुलांना चांगले शिक्षण शहरांतच मिळते--पुष्कळसे दक्षिणात्य इटालियन्स उत्तम कारागीर आहेत व त्याना कामधंदा पाहाण्याची अडचण पडत नाही--निर्वासिताचा मुख्य लोंढा दुसऱ्या महायुद्धापासून विशेष सुरु झाला. बॉम्ब हल्ल्यापासून बचाव व्हावा. म्हणून रोमकडे लोक धाव घेत (रोमवर दोस्तराष्ट्रांनी सपूर्ण युद्धकाळात फक्त एकदाच, १९४३ सालीच बॉम्बहल्ल केला होता हे लक्षात घेण्यासारखे आहे) फॅझिशम्चा पाडाव झाल्या-वर, लहान शहरातील फॅसिस्ट अधिकारी कातडी वाचविण्यासाठी सर्व मोठ्या शहरांकडे गर्दी करु लागले, व रोमसारखे दुसरे सुरक्षित स्थान कोणते असणार ?--याचा एक फायदा असाही झाला की रोममधे मिश्र लोकसख्या झाली, इटलीच्या निरनिराळ्या भागातून लोक आल्यामुळे राष्ट्रीय एकात्मता निर्माण होऊ शकली--(मुंबईत तसे का होत नाही?')

रोममधे आणखी एक गोष्ट चटकन जाणवते इथे गगनचुंबी इमारती नाहीत! टायबर नदीच्या पाझरण्यामुळे जमीन भुसभुशीत झाली असावी हे एक कारण, दुसरे महत्वाचे कारण, आर्किऑलॉजी ! जमीनीत खूप खोल खणत गेल्यास, जमिनीत गाडल्या गेलेल्या पण आजपर्यन्त न गवव-सलेल्या प्राचीन अवशेषाना धक्का पोहचता कामा नये.

रोम शहरातील पोलीस तीन प्रकारचे आहेत. त्यातील दोन प्रकार म्हणजे सर्वसामान्य कायदा, सुरक्षितता पोलीस व दुसरे वाहतूक पोलीस. ही दोन्ही म्युनिसीपालिटीच्या नियत्रणाखाली असतात. तिसरा प्रकार म्हणे राष्ट्रीय पोलीस, ज्याना 'कॅरॅबिनिएरी' म्हणतात हे कॅरॅबिनिएरी दुसऱ्या महायुद्धात कैदी होऊन हजारोच्या सख्येने भारतात ठेवले होते. (देवळाली, भोपाळ जवळ बैरागढ वगैरे) हे राष्ट्रीय पोलीस नेहमी जोडीने वावरतात त्याचा भडक पोशाख व तलवार त्रयस्थाचे मन आकर्षून घेतात. तसे रोममधे गभीर स्वरूपाचे गुन्हे कमीच-- छोटया मोठ्या चोऱ्या, लूटमार हे गुन्हे मात्र होतात म्युनिसीपालिटीच्या अधिपत्याखाली कोर्ट नसते आपल्या भारतातही नाही. त्यामुळे गुन्हेगार हा राष्ट्राच्या ताब्यातील कोर्टात जातो. हेबियस कॉर्पस नसल्यामळे

गुन्हेगाराना कित्येक महिने बिना चौकशी कोठडीत खितपत पडावे लागते. शिक्षण हे सुद्धा राष्ट्रीय नियंत्रणाखाली आहे म्युनिसीपालटीच्या कक्षेत नव्हे. (काही अपवाद वगळून) इतर पाश्चात्य देशाच्या मानाने रोममध्ये शिक्षणाची आबाळच दिसते. तरूण पिढीत साम्यवाद (शे. १५ टक्के) व डावी विचारसरणी आहे. जन्माने सगळेच रोमन कॅथोलिक असले तरी प्रत्येकाने बाप्तिस्मा घेतलेला असतोच असे नाही बाप्तिस्मा घेतलेल्याचे प्रमाण केवळ ३० टक्के आहे तरूणपिढीत फॅसिझम्चा पुरस्कार करणारे पण आहेत मात्र, बहुतेकाना घटस्फोट मान्य नाही सस्काराचा परिणाम असावा

इथेही नोकराची टचाई खूप आहे लडनमधे 'रामागडी' 'घरेलु नोकर' नाहीच ! – सर्व कामे घरच्या मडळीनी करायची तीच परिस्थिती रोम-मध्ये येत आहे, आणि साहजिकच घरकामाला येणाऱ्याना पैसाही खूप मोजावा लागतो

रोममधे चित्रपट व्यवसाय भरभराटीचा आहे, म्हणुनच रोमला 'हॉलीवुड ऑन द टायबर' म्हणतात इटालियन चित्रपट जगप्रसिद्ध आहेत आपल्या भारतात अनेक वेळा चित्रपट महोत्सवात इटालियन चित्रपटाना बक्षीसे मिळालेली आहेत, लॉरेन, लोलोब्रिगिडा, रोझेलिनी, इ नावे मशहूर आहेत सिनेमा पाहाणे हे इटालियन्सना खूप आवडतेही फ्रास आणि पश्चिम जर्मनी मिळून एका वर्षाचे जें उत्पन्न ते इटलीच्या एका वर्षाच्या उत्पन्नाइतके ! – चित्रपटात पुन्हा अमेरिकन चित्रपटाचे वर्चस्व आहेच. (ज्याप्रमाणे नागपूर, पुणे इथे मराठी सिनेमा फारतर एखादा इग्रजी व बाकी सर्व हिंदी असतात ) पन्नास टक्के अमेरिकन चित्रपट व ४० टक्के इटालियन उरलेले १० टक्के समिश्र चित्रपटनगरी रोमच्या शिवारावर 'चिने चित्ता' इथे वसलेली आहे. तो एक भव्य स्टुडिओ आहे, व इटालियन सरकारच्या मालकीचा आहे. मुसोलिनीने हा स्टुडिओ आपल्या एका मुलाला चित्रपट-निर्माण करण्याची आवड होती, म्हणून बाधला होता– एका वेळेला चार चित्रपटाचे शूटिंग सुरू असते. येवढा तो मोठा आहे अमेरिकेने आपले भाडवल इथे गुतवून चित्रपट काढण्याला सुरवात केली. अमेरिकेच्या मोजमापाप्रमाणे स्टुडिओ अद्यावत

नाही पण, मजुरीचे दर कमी, आणि हवे तेवढे उत्तम कलावत चटकन् मिळू शकतात.

इथल्या पुस्तकाच्या दुकानात गेल्यानंतर पुस्तकाची शीर्षके कळली नाही तरी ग्रथकाराची नावे आपल्याला कळतात, शेक्सपियर, डिकन्स्, ई-एम्-फॉस्टर, मार्क्स, लेनिन, वॉल्टर स्कॉट, बर्ट्रेन्ड रसेल, जॉन मेरिडिथ, अर्नेस्ट हेमिन्वे, अल्डस हक्सो अशी नावे आढळली. अमेरिकन वा रशियन ग्रथकार फारसे आढळले नाहीत– भारतीय ग्रथकार तर एकही नव्हता !

प्रवाशाचे आकर्षण करणाऱ्या अनेक वस्तु व प्रेक्षणीय स्थळे रोममधे आहेत. नॅशनल म्युझियममधला व्हीनस ऑफ सॉरीनचा पुतळा जगातला एक सर्वोत्कृष्ट मानला जातो, मात्र माझ्या मते, बनारसजवळ सतूनाथ इथे बुद्धमदिरात बुद्धाची जी ध्यानस्थ मूर्ती आहे, इतकी सु दर मूर्ती मी जगात कुठेच पाहिली नाही कदाचित मी भारतीय म्हणून मी पक्षपाती असे कोणी म्हटल्यास मजजवळ उत्तर नाही परंतु, भगवान बुद्धाचे सर्व तत्वज्ञान, सर्व जीवितकार्य त्या मूर्तीच्या मुद्रेवर प्रकट झालेले आहेत व हे अत्यत अवघड आहे रोममधे मायकेल एन्जॅलॉची कलाकृती आहे. सिस्टिन चॅपेल, पॅन्थीऑन, द कलोजियम, द फोरम, ही स्थळे प्रवासी पाहाणारच एक आधुनिक आकर्षण करुन घेणारे स्थळ म्हणजे तिथलाआतरराष्ट्रीय विमानतळ. आम्हा भारतीयाना चागल विमानतळ म्हणजे काय हे माहीतच नाही. लडन, पॅरिस, इथले विमानतळही भव्य आहेत, पण तिथे चोवीस तास वर्दळ, आवाज रोमच्या विमानतळावरील शातता पाहून आश्चर्य वाटते, बरे वाढते–दूरध्वनीवर किंचाळणाऱ्या घोषणा नाहीत त्या घोषणा वस्तुत: नीट कुणाला ऐकू येत नाहीत, समजतही नाहीत–मुबईच्या विमानतळावरील घोषणा तर प्रवाशाला गोंधळातच टाकतात–ज्याप्रमाणे रेल्वे प्लॅटफॉर्मवरील घोषणा–व्ही. टी. च्या फलाटावर जेव्हा दूरध्वनीवरुन घोषणा होतात तेव्हा त्या कोणत्या भाषेत हेच प्रथम कळत नाही ! रोम विमान वाहतुकीचा केन्द्र बिन्दु समजायला हरकत नाही. इथून तेल अॅव्हिव्ह केवळ २ तास ५० मिनिटे, मॉस्को ३॥ तास आफ्रिका, मध्यपूर्व, इन्डोनेशिया (विमान कपनीचे नाव गरुड!) टर्कीश, सीलोन, सूडान, लिबिया, युगोस्लाव्ह,

मालेव्ह (हंगेरिया), सीरीयन-अरब, अल्जीरीया-किती देशाची विमाने इथून येतात जातात !

रोमच्या म्युनिसीपालटीपुढे भारतातील कोणत्याही शहरातील म्युनि. प्रमाणे जटिल प्रश्न आहेत ते म्हणजे, घरे, वाहतूक आणि सार्व-जनिक सेवा, वाढत्या लोकसंख्येने पाण्याची समस्या तर बिकटच झाली आहे-रोमची समस्या व रोमचे प्रश्न साऱ्या इटलीचे समजायला हरकत नाही त्यावर उपाय म्हणजे जास्तीत जास्त औद्योगीकरण रोम म्युनि. च्या निवडणुका राजकीय पक्षच लढवितात व राष्ट्रीय प्रश्नाच्या पात-ळीवरून या निवडणुका होतात म्हणजे भारतासारखेच ! भारताप्रमाणे इथेही राजकीय पक्ष पुष्कळ आहेत-मुख्य नऊ राजकीय पक्ष आहेत-आणि गम्मत ही, की इटलीतील मुख्य राजकीय पक्षाप्रमाणे (ख्रिश्चन डेमो-क्रॅटस् आणि कम्युनिस्ट) रोम म्युनितील राजकीय पक्षही राजकीय सत्तेचे प्रतिनिधी असतात--व्हॅटिकन आणि क्रेमलिन ! आणि निवडणुका जरी लोकशाही पद्धतीनेच होतात, तरी निवडणुका संपल्यानंतर राजकीय पक्ष 'लोकांना' विसरतात ! कसे अगदी आपल्या भारतासारखे !

रोम शहरातील वाहतूक म्हणजे शासनाची एक मोठी डोकेदुखी आहे! रस्ते अगदी जाम होतात!-मुंबईला केम्प कॉर्नरला गर्दी कमी असे ! बेपर्वा अधिकारी वर्ग उर्फ नोकरशाही, आळस--चालायचेच या कारणा-बरोबरच, अगदी अरुंद रस्ते. (पुण्यातील शिंदे आळी, तपकीर गल्ली प्रमाणे) हे रस्ते रुंदही करता येत नाहीत ! दुसरे कारण मोटारगाड्यांचा सुळसुळाट ! १९७७ सालाचे आकडे जरा जुनेच वाटतील, पण देतो-दर तीन माणसामागे एक गाडी ! रोज तीनशे नव्या गाड्या निर्माण होतात. रोमन माणसाला गाडी ही काही चैनेची, विलासाची किंवा इभ्रतीची (स्टेटस सिम्बल) गोष्ट नाही ! ज्याप्रमाणे अमेरिकेत नाही ! गाडी हे रोमनमाणसाच्या जीवनाचे एक अविभाज्य अंग आहे, सर्व सामान्य इटालियन माणसाचा मला आडिस अबाबाला असताना खूपच अनुभव आला, कारण आडिस अबाबाला गेलो तेव्हा ईथियोपिया स्वतंत्र होऊन काही वर्षेच लोटली होती, व त्यामुळे आडिस अबाबा शहरात इटालियन स्त्री-पुरूष प्रचंड संख्येने होते. आम्ही राहात होतो त्या काझा पॉप्युलारे भागात तर अधिकांश इटालियन्सच होते-- अनेक वर्षे

मी इटालियन्सचा शेजारी होतो, इटालियन माणसाला तीन गोष्टींची अत्यत जरूरी असते– वाई, बाटली आणि गाडी! – अगदी कवाडखान्यात फेकण्याजोगी गाडी इटालियन माणसाला द्या, तो सतत खटपट करून एक दिवस आपल्या सिनोराला व बम्बीनाना फिरायला आपल्या दुरुस्त केलेल्या गाडीतून घेऊन जाईल ! –

शे ८० टक्के गाड्या 'फियाट' असतात इटालियन लोकांना गाड्या भरधाव चालविण्याची सवयच आहे, आणि ते सहसा 'साईड' देणार नाहीत– ते अतीशय कुशल ड्रायव्हर्स आहेत, अन्यथा लोकसंख्या झपाट्याने कमी झाली असती

या गाड्यानी रोमचे सौंदर्य मात्र नष्ट केले आहे ! रोम मधले 'पियाझा' म्हणजे युरोपातली सौंदर्य, आराम, विश्राती, याची स्थाने ! – पुण्याला पूर्वी बुधवार चौक, आप्पा बळवत चौक, लक्ष्मीरोड वरून हिंड-ताना आनद वाटायचा– आता फूटपाथवरून सुद्धा चालणे मुष्किल झाले आहे ! रोमचे 'पियाझा' म्हणजे सध्याकाळी चार घटका झोकात, मजेत घालविण्याची ठिकाणे ! पण आता डबड्यानी (गाड्या) रस्ते भरून गेलेले असतात ! –

अनत काणकर या सुप्रसिद्ध लेखकाने 'कुठे आहे तो पुणेरी ?' असा एक मार्मिक लेख लिहिला होता–थोडफार 'रोमन' च्या बाबतीतही असा प्रश्न विचारता येईल की 'रोमन' म्हणजे काय ? काय खूण आहे ? कोणते वैशिष्ट आहे ?– 'अधिकृत रोमन' म्हणजे सीझरच्या काळातील. रोम शहराच्या नागरिकाचा वशज ! तो तर आता अस्तित्त्वातच नाही ! अकराव्या शतकापूर्वीची वशावळ कुणाजवळच नाही– अर्थात काही 'पुराण' रोमन स्त्री पुरूष, म्हणजे जुन्या खानदानीतले आणि कारागीर वर्गातले. काही आढळतात आमच्या लॅन्डलेडीजवळ इ. स. १४०० वर्षापासूनची तिची वंशावळ होती. अर्थात् खास रोमन लोकांची काही वैशिष्टे जरूर आहेत व ती त्याना इतर इटालियन्स पासून वेगळे दाख-विते– एक वैशिष्ट जो रोमन नाही त्याचे विषयी तिरस्कार– मग तो रोमपासून केवळ ३५ मैलच दूर का असेना ! दुसरे वैशिष्ट म्हणजे कोणतीही गोष्ट झिडकारून टाकणे रोममधे रहात असलेला एक लिबि-

यन म्हणाला, 'जो उद्धट आहे व जो अज्ञानी पण आहे, तो खुशाल रोमन समजावा !' तिसरे वैशिष्ट म्हणजे एक शिष्टपणाची बेफिकिरी–

मानव वंशशास्त्रज्ञाच्या मताने जगात आफ्रिका खंडातील काही जाती सोडल्या तर 'प्यूअर रेस' (शुद्ध वर्णाच्या, रक्ताच्या जाती) जगात नाहीतच– त्यातल्या त्यात नॉर्डिक कमी अशुद्ध– तेव्हा 'शुद्ध' रोमन अस्तित्वात नाही हे सहज पटायला हवे रोममध्ये निरनिराळ्या जाती तशा आपले अस्तित्व टिकवून आहेत– सिसीलियन्स, कॅलॅब्रियन्स, वगैरे- रोम शहरात दोन रोमन बोलभाषा आहेत, म्हणजे बोलण्याची पद्धती. ज्याप्रमाणे पुण्याला अनेक प्रकारे मराठी बोललेली दिसून येते सातार-कडले मराठे, कोकणी मराठे, आणि ब्राम्हणातही फरक दिसून येईल. नागपूरलाही मराठी भाषा भिन्न प्रकारे बोलली जाते. खानदेश (जळगाव व धुळे जिल्हे) मध्ये अहिराणी भाषा बोलली जाते, पण बोली निराळी, आणि तीच भाषा, पण बोलण्याची पध्दत निराळी रोममध्ये

रोमाना ही शुद्ध रोमन भाषा समजली जाते, आणि दुसरी रोमा-नेस्को ही कमी प्रतीची समजली जाते रोमानेस्को बोलणारे लोक त्रास्ते वेरेला राहतात. त्रास्तेवेरे भाग टायबरच्या पच्छिम किनाऱ्यावर आहे, आणि रोमनाच्या जुनातल्या जुन्या पिढ्या इथे राहातात.

रोमनसरदार (याना जे किताब मिळालेले असतात ते पेपसीकडून) मात्र स्वत ला खरेखुरे रोमन समजतात या सरदारानाही विभागणारी एक अस्पष्ट, थोडीशी अप्रिय रेषा आहे श्वेत सरदार आणि कृष्ण सरदार सेव्हाय राजवटीने १८७० मधे रोम काबीज केले तेव्हा पोपच्या बाजूला जे होते ते 'कृष्ण' समजले जातात अर्थात गेल्या शभर वर्षात गोष्या-काळ्याचे मिश्रण झाले आहेच 'कृष्ण सरदार' म्हणजे व्हॅटिकन खान-दानी सरदार ओर्सिनीस आणि कोलोन्नास ही दोन प्रतिष्ठित घराणी आज वर्षानुवर्षे अधिकृत समारभाचे वेळी पोपच्या बाजूला उभे राहाण्याचा मान राखून आहेत–कृष्ण सरदारात पूर्वी सारखी श्रीमती, वैभव राहिले मात्र नाही-आपल्या भारतात ज्याप्रमाणे पदभ्रष्ट, (इतिहास जमा) जुन्या राजेलोकानी आपल्या राजवाड्यांचे हॉटेलात रुपातर केले किंवा भाड्याने दिले त्याप्रमाणे कृष्ण सरदारानाही करावे लागत आहे परंतु, अजुनही रोमन सरदार आपली पत साभाळून आहेत आणि इंग्लंडमधल्या

सरदाराप्रमाणे त्याची अवनती झालेली नाही-पण काळाचा तडाखा त्याना हीं बसत आहेत जुन्या सरदारानी नोकऱ्या केल्या नाहीत पण त्याची मुलेबाळे, मुलीसुद्धा नोकऱ्या करुन पैसे मिळवितात. त्यांना आपल्या पूर्वजांच्या इतिहासातही रस नाही आपल्या भारतात तरी कुठे आहे हा अभिमान ? ग्वाल्हेरचे शिंदे, इंदूरचे होळकर, धार-देवास चे पवार, नागपूरचे भोसले याच्या आजच्या पिढीला कसला पूर्वजांचा अभिमान ! आपल्या वैभवशाली भूतकाळाबद्दल ज्याना अभिमान नाही ते भविष्य तरी काय सुधारणार ?

——जिथं पोपचं स्वतंत्र राज्य आहे त्याला व्हॅटिकन म्हणतात व्हॅटिकन एक स्वतंत्र 'राष्ट्र' आहे रोममध्ये व्हॅटिकन आहे, पण व्हॅटिकनमध्ये रोम नाही. या व्हॅटिकनविषयी लिहिणे आवश्यक आहे. १९८६ साली पोपने भारताला भेट दिली-एका स्वतंत्र राष्ट्राचे मुख्य म्हणून पोप भारतात आले होते, एका धर्माचे मुख्य गुरु म्हणून नव्हे, असा डांगोरा भारत सरकारने पिटला होता, पण त्यावर विश्वास ठेवणे, कठिण आहे. भारत सरकारचे प्रधानमंत्री राजीव गांधी याना कोणत्या धर्माबद्दल प्रेम आहे हे त्यानी कुठे दर्शविल्याचे माहीत नाही. त्याचे वडील पारशी होते, आई काश्मिरी ब्राह्मण. राजीव गांधीची पत्नी सोनिया ही इटालियन म्हणजे रोमन कॅथोलिक पोपला बोलविण्यात सोनीया गांधीचा कितपत आग्रह होता हे कळायला मार्ग नाही पोपला का बोलावले, राष्ट्रीय हित साधले हे ही कळायला मार्ग नाही ! अमेरिका, रशिया, इंग्लड आदि प्रबळ राष्ट्रांच्या अध्यक्षाना, प्रधानमंत्र्याना बोलावण्यात अनेक उद्दिष्टे असतात, तसले कोणतेही उद्दिष्ट पोपला बोलालावण्यात शक्य नाही. एका स्वतंत्र राष्ट्राचे मुख्य म्हणून पोपला अन्य दुसऱ्या कोणत्या देशानें बोलावल्याचे ऐकिवात नाही.

हा प्रपंच यासाठी केला की पोपला तसे कुठलेही राजकीय महत्व नाही- आणि, प्रस्थापित इटालियन शासनाशी पोपला जुळवून घ्यावे लागते ज्याप्रमाणे रशियातील धर्मगुरुला जुळवून घ्यावे लागते बर्ट्रंन्ड रसेलने म्हणले आहे धर्मसंस्था ही नेहमी प्रतिगामी असते व ती प्रस्थापित राजवटीलाच पाठिंबा देत असते.

व्हॅटिकनचे अंतस्थ राजकारण समजणे अवघड आहे. ते बव्हशी पदासीन पोपवर मुख्यत्वे अवलंबून असते. व्हॅटिकनचा कारभार कोण चालवितो? रोमन लोकाना हा प्रश्न विचारला तर ते हसतीलच– ज्या प्रश्नाला सरळ उत्तर नाही असा प्रश्न आपण कसा विचारला, म्हणून ते हसतात– पण त्याचेही उत्तर आहे. व्हॅटिकनचा कारभार व्हॅटिकन सरकारातील (क्यूरा) रोमन गट आणि कार्डिनल्सचे मडळ

जगातले अत्यत चिमुकले राष्ट्र म्हणजे व्हॅटिकन त्याचे क्षेत्रफळ अवघे १०८ एकर आहे ! आणि लोकसख्या केवळ हजार ! – मूळची (१९२९ मधली) लोकसख्या केवळ ५३२ होती ! व्हॅटिकनचे मुख्य स्मारक म्हणजे सेन्ट पीटर्स चर्च. जगातले सर्वात मोठे चर्च ! – आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे ते कळाहीन आहे ! – अर्थात, पोपची इस्टेट व्हॅटिकनच्या बाहेरही भरपूर आहे. कॅस्तेल गोन्दो मधला ग्रीष्मर्तूमधला राजवाडा इ अनेक ठिकाणी इस्टेट आहे

'व्हॅटिकन' शब्द बहुधा लॅटिनमधल्या व्हेटस (VATES) शब्दावरुन आला असावा व्हेट्स म्हणजे भविष्य सागणारे अनेक शतकापूर्वी ह्या भागात भविष्य वर्तविणाऱ्याची वस्ती फार होती. 'पॉन्टिफ्' चा मूळचा अर्थ 'पूल बाधणारा' १८७० मधे पोपची राजकीय सत्ता झुगारुन देण्यापूर्वी, पोपची सत्ता मध्य इटलीत १७२०० वर्ग मैल एवढया मुलखावर होती, आणि इटलीच्या एकीकरणाला ही सत्ता एक प्रचण्ड अडसर होता. पोप म्हणजे स्वत.चे राज्य असलेला राजाच ! अजूनही पोप राजाच आहे, पण आता त्याची सत्ता भौतिक नसून आध्यात्मिक आहे १८७१ नतर 'होली फादर' ने व्हॅटिकनचा आश्रय घेतला आणि मुसोलिनीने १९२९ त लॅटेरॅन तह करी पर्यन्त इटलीचे सरकार व पेपसी याचे सबध सुरळीत झालेले नव्हते.

जगातील ६५ राष्ट्राच्या एम्बसीज् 'होलीसी' (व्हॅटिकन) मधे आहेत, इटलीस आहेत त्या वेगळ्या– या ६५ राष्ट्रात दोन साम्यवादी राष्ट्रे पण आहेत (क्यूबा आणि पोलड), आणि सात बिगर ख्रिश्चन आहेत युनायटेड अरब रिपब्लिक, चीन (तैवान), जपान, इराण, लेबॉनान, तुर्कस्थान व इन्डोनेशिया ही ती राष्ट्रे होत. ब्रिटन हे कायद्याने

ख्रिश्चन राष्ट्र आहे. तिथला राजा, राणी, चर्च ऑफ इंग्लंडचा प्रमुख म्हणून ब्रिटनतर्फे व्हॅटिकनला प्रोटेस्टटच राजदूत पाठविला जातो हे लक्षात घेण्यासारखे आहे, पूर्वी अमेरिका सुद्धा आपला एक प्रतिनिधी प्रॉटेस्टन्टच, व्हॅटिकनला पाठवित असे. नतर ते बद झाले. इटलीची राजधानी रोममधे अमेरिकेचा राजदूत असतो, पण त्याचा व्हॅटिकनशी अधिकृत सबध काही नाही.

या व्हॅटिकन राष्ट्रासारखे राष्ट्र दुसरेच नसेलच– जगात हे एकुलते एक राष्ट्र आहे जे आपले अदाजपत्रक प्रसिद्ध करीत नाही. पोपला पगार असा नसतोच, पण त्याला हवा तेवढा पैसा तो पेपसी फंडातून काढू शकतो या पेपसी फंडात भली मोठी भर अमेरिकेतल्या कॅथोलिकाकडून पडत असते– पेपसी अत्यत सपत्तीमान आहे, किती संपत्ती आहे याचा अंदाज च कुणाला करता येणार नाही. लतेरॅन तहाच्या वेळी, पोपला नुकसान भरपाई म्हणून इटालीयन सरकारने जवळ जवळ बारा कोटी रुपये दिले होते यात दरवर्षी भरच पडत असते व्हॅटिकन हे अत्यंत सपत्तीमान असण्याची अनेक कारणे आहेत व्हॅटिकनचे लक्षावधि रुपये निरनिराळ्या धंद्यात गुतवलेले आहेत, मालकीची जमीन भरपूर आहे, आणि महत्वाची गोष्ट म्हणजे इटलीयन सरकारला (कारण सगळे भाडवल इटलीत गुतवलेले) एक लिरु (लिरा हे इटालियन नाणे) सुद्धा इन्कम टॅक्स देत नाहीत ! त्याचप्रमाणे पाद्री लोकही कुठलाच टॅक्स देत नाहीत ! इटलीतली बहुतेक चर्चेस ही पोपची मालमत्ता नसून इटलीयन सरकारची आहे. व्हॅटिकन सरकारशी इटली सरकारचे टॅक्सवरुन सतत भाडण सुरु असते– कम्युनिस्ट व इतर डावे पक्ष तर या विषयी सतत आरडा ओरड करीत असतात, पण ख्रिश्चन डेमोक्रॅट पक्ष, जो चर्चचा पक्ष समजला जातो, तो सुद्धा व्हॅटिकनने टॅक्सेस द्यायला पाहिजे अशी मागणी करतो– परतु अजुन पर्यन्त तरी स्थिती तीच आहे.

व्हॅटिकन शहरात तीस रस्ते आणि चौक आहेत त्याना नावे नाहीत. आपल्या भारतात तरी शहरात सर्व रस्त्याना कुठे नावे असतात आणि खेडेगावात तर रस्त्यांना नावे ही खुळचट कल्पनाच समजली जाईल !– या दृष्टीने इग्लड मला नमुनेदार वाटले–वारकासा बोळ का असेना, त्याला नाव आहेच ! एक रेल्वेस्टेशन आहे, ज्याचा उपयोग शहरात

येणारा माल उतरवून घेण्यासाठीच मुख्यत्वे आहे ! कारण त्या रेल्वेने प्रवास कोण करणार ?— टेनिसकोर्टे, किराणा दुकान, 'ल ओसव्हॉतोरे रोमानो' या पेपल वर्तमानाची इमारत आहे, तीन स्मशानभूमी, छोटासा तुरुंग, सुतारकाम, सोनार कामाची दुकाने, एक भव्य ग्रंथालय, स्विस गार्डच्या बराकी, आणि सेन्ट पीटर्स चर्चजवळ छोटेसे बार सुद्धा !–

व्हॅटिकनचे स्वत चे पोस्ट ऑफिस आहे, स्वत ची टाकसाळ व नाणी आहेत (त्या नाण्याची किंमत लिरा इतकीच) आणि खूप जोरदार रेडिओ स्टेशन आहे. या रेडिओ केंद्रातून ३१ भाषातून प्रचारप्रसार केला जातो व्हॅटिकनची अधिकृत भाषा लॅटिन आहे, इटालियन नव्हे ! व्हॅटिकन आपल्या प्रजेला स्वत चे पासपोर्ट देते, इटली सरकारचे नव्हे, आणि स्वत चे राष्ट्रगीत सुद्धा आहे ! व्हॅटिकनमधे चार पोलीस दले आहेत. स्विसगार्डस् द गार्दी ही नोबिले (पेपल सरदाराची एक दिखाऊ तुकडी), द पॅलेटिनगार्डस आणि एक नियमित पोलीस दल–काही काही वेळेस व्हॅटिकन क्षेत्राजवळ चर्चविरुद्ध निदर्शने, घोषणा, इत्यादी होतात; लहानमोठे दंगेही होतात त्यावेळी हे पोलीस दल अपुरे पडते, व रोमच्या पोलिसाचे साहृय घ्यावे लागते-- व्हॅटिकनच्या पोलिस दलात स्विसगार्डस प्रख्यात आहेत, आणि लंडनला ज्या प्रमाणे 'चेंज ऑफ् गार्डस' पाहायला खूप गर्दी जमते, त्याप्रमाणे स्विसगार्डस पाहायलाही गर्दी जमते. या गार्डसच्या पोशाखाचे डिझाईन सुप्रसिद्ध कलाकार मायकल एन्जेलोने बनविले होते. हा पोशाख खूप रंगबीरंगी आणि खरोखरच फार आकर्षक असतो स्विसगार्डस् ची स्वित्झर्लंडमध्येच होते, व त्यानी कॅथोलिक असले पाहिजे हा दंडक आहे व्हॅटिकनच्या सेवेत असतो, त्याचे दुहेरी राष्ट्रीयत्व असते

व्हॅटिकन सरकारविषयी काही लिहिणे फार अवघड आहे, कारण आकडेच उपलब्ध नाहीत पोपची जी सत्ता सत्ता तेवढी जगातल्या कोणत्याही व्यक्तीजवळ नाही व ती सत्ता जगातल्या सर्व कॅथोलिक लोकावर आहे. येशू ख्रिस्ताकडे जायचे म्हणजे व्हाया पोप जायचे ही कॅथोलिकाची श्रद्धा, त्यामुळे जगातले सर्व कॅथोलिक पोपची आज्ञा शिरसावद्य मानतात. ख्रिस्चन धर्मात डायव्होर्स नाही, भारतीय सविधानाप्रमाणे पतीपत्नींना घटस्फोट मिळू शकतो, पण हें संविधान

भारतातले मुसलमान ज्याप्रमाणे मानीत नाहीत आणि म्हणूनच शाहाबानो प्रकरणा (शाहबानो या स्त्रीला नवऱ्याने तलाक दिला, पण पोटगी दिली नाही, म्हणून शाहाबानो सुप्रीम कोर्टात गेली सुप्रीम कोर्टाने शाहाबानोच्या बाजूने निर्णय दिला सुप्रीम कोर्टाच्या न्यायधिशाविरुद्ध गलिच्छ उध्दार पार्लमेन्टमधे एका मुसलमान मन्त्र्याने काढले) विरुध्द भारतीय मुसलमानानी प्रचड आंदोलने केली, दंगेही केले, श्रीनगरला तर तेथील मुसलमानानी हिंदूच्या कत्तली केल्या व त्याना तिथे राहाणे दुरापास्त केले, व भारत सरकार भारतीय मुसलमानाना शरण जाऊन मुसलमानाच्या दडपणानें त्याच्यासाठी निराळा कायदा करावा लागला (६ मे १९७६), त्याप्रमाणे प्रसग उध्दवला तर कॅथोलिकासाठी सुध्दा भारतीय शासनाला त्याच्या धर्माप्रमाणे कायदा करावा लागेल–कॅथोलिकाची निष्ठा ते ज्या देशात राहातात त्या देशाकडे की पोपकडे, ते प्रथम भारतीय की कॅथोलिक, असा प्रश्न न विचारणे बरे–इंग्लंडचा इतिहास सुध्दा प्रॉटेस्टन्ट व कॅथोलिक याच्या झगड्यांनी भरलेला आहे. आजही इंग्लडमधे कॅथोलिक आपल्या लोकासाठी स्वतत्र शाळा चालवितात

वस्तुत. अत्यत दरिद्री व कोणताही थाटमाट नसलेल्या येशु ख्रिस्त त्याचा या जगातील प्रतिनिधी म्हणवून घेणारा हा पोप –पण तो किती श्रीमत ! त्याचेजवळ किती पैसा–त्याचे कपडेच पहा–

व्हॅटिकनचे दोन चेहरे आहेत. एक इटलीसाठी व दुसरा बाकीच्या राष्ट्रासाठी – कारण बहुतेक सगळे पोप १५२३ पासून इटालियनच आहेत. फक्त एक अपवाद, पोलड मधल्या कार्डिनलला पोप निवडले होते – ८७ कार्डिनल मडळापैकी ३२ इटालियन्स असतात. (भारतातही एक कार्डिनल आहे – कार्डिनल ग्रेशस.) 'क्यूरिया'मधे २८ कार्डिनल्स पैकी २१ इटालियन्स आहेत. त्यामुळे जगातल्या कॅथोलिकावर इटलीचे प्रभुत्व आहे ही स्पष्ट गोष्ट आहे.

कार्डिनल्स पोपला निवडतात ही निवडणूक एकमताची असली पाहिजे इथेही आता गटबाजी व देवाण-घेवाणचे राजकारण घुसले आहे. सगळ्याच गोष्टी बाहेर पडत नाही पण ख्रिस्ताचे तत्वज्ञान, त्याच्या शिकवणुकीचे पालन इ. गोष्टी बायबलमध्ये इथियोपियामधील 'काळ्या'

• ख्रिश्चनावर विषारी वायु सोडणाऱ्या मुसोलिनीला पोपचा पाठिंबा होता!

यासाठी व्हॅटिकनला इटालियन सरकारशी मिळते जुळते घ्यावे लागते व इटालियन सरकारलाही पोपचे महत्व जाणून वागावे लागते. दोघातील सबध मोठ्या नाजूक कौशल्याची कसरत असते कॉन्कार्डटिच्या अटीप्रमाणे, इटालियन सरकारचे कर्तव्य केवळ व्हॅटिकनचे रक्षण करणे नाही – पोपचा अपमान हा इटालियन कायद्याखाली गुन्हा गणला गेला आहे व्हॅटिकनचा नेहमी प्रयत्न प्रचलित सरकारवर आपले वर्चस्व ठेवण्याचा असतो- ख्रिश्चन डेमोक्रॅटिक पार्टी व पेपसी याच्यात धोरणाबाबत, कार्यक्रमाबाबत कितपत समानता असते? पेपसीकडून पार्टीला आदेश मिळतात काय ?– हे सागणेसगळे अवघड आहे–सार्वजनिक आणि सामाजिक समारभाचे वेळी कार्डिनल्स व शासनातील वरिष्ठ व्यक्ति याच्या गाठी भेटी होतात, गप्पा होतात– यावेळी कार्डिनल्स पार्टीच्या लोकाना पोपचे काही आदेश देत असतील असे वाटत नाही – परतु देशाच्या अतर्भागात पाद्री आणि पार्टीचे सेक्रेटरी हे उघड उघड एकजुटीने काम करतात व पार्टी प्रमुखावर दडपण आणतात गोवा हा महाराष्ट्रात सामील व्हावा किवा नाही यावर मतदान झाले असता, गोव्याच्या पाद्री लोकानी तेथील (कॅथोलिक) ख्रिश्चनावर आणलेले दडपण प्रसिद्धच आहे, आणि एकजात साऱ्या गोव्यानीज ख्रिश्चनानी महाराष्ट्रात विलीन व्हायचे नाही असे मत दिले – वरवर जरी सर्वसाधारण इटालियन चर्चच्या वर्चस्वाकडे तिरस्काराने पाहातो, तरीपण, आतून त्याना चर्चचे स्वामित्व मजूर असते !

पोपला आपली सत्ता टिकवायची असल्यामुळे त्याला अनेक सोंगे करावी लागतात, आणि, एखादा पोप पुरोगामी वाटत असला (उदा. पोप पॉल सहावा) तरी तो प्रतिगामीच असतो कुटुबनियोजनासाठी कृत्रिम उपाय योजणे, गर्भपात करणे, संतृतीप्रतिबंधक गोळ्या घेणे, घटस्फोट, याच्या विरुद्धच पोप असतात पोपची सत्ता वरवर पहाता सगळे मानतात, परतु, इग्लडचे धर्मगुरु ज्या प्रमाणे प्रसग पडल्यास राजावर किंवा राजघराण्यातील लोकावर दडपण आणू शकतात, त्याप्रमाणे पोपजवळ हिम्मत नाही. सिम्पसनशी लग्न केले म्हणून आठव्या एडवर्डला

राज्यत्याग करावा लागला. घटस्फोटित पुरुषाशी राजकुमारी मार्गरेटला लग्न करू दिले गेले नाही इतकी उघड विरोधी भूमिका पोपाने घेतल्याचे ऐकिवात नाही. पोपच्या शब्दानाही काही राजकीय महत्त्व आहे असे वाटत नाही दरवर्षी नाताळाचे वेळी पोप सदेश देतो, पण कोण मानतो? याचे कारण पोप सस्था ही एक देखाव्याची आहे येशुने आपल्या शिष्याचे पाय धुतले म्हणून पोप महाशय मोठ्या समारभाने एखाद्याचे पाय धुतात-परंतु, सर्व कॅथोलिकाना एकत्र आणणारा दुवा म्हणजे पोप यात शंका नाही, या दृष्टीने पोपचे महत्त्व जागतिक स्वरुपाचे आहे याचसाठी, रोमला गेल्यावर पोपची भेट झाली तर लोक कृतकृत समजतात

० ०

# पॅरिस

—[illegible] पॅरिस ! या माणसाने फ्रेंच राज्यक्रांती घडवून आणली नाही, पण याचे वाचून ती अशक्य झाली असती !” असे उद्गार नेपोलियनने ज्याच्या समाधीजवळ जाऊन काढले, त्या रूसोचे पॅरिस ! व्हॉल्टेअरचे पॅरिस !– ड्रायफस या फ्रेंच ज्यूला, फ्रेंच शासनाने दूर ‘ मृत्यूच्या बेटात शिक्षा भोगायला पाठविले होते, तो ड्रायफस निरपराधी आहे अशी खात्री पटताच, ‘ ला अक्यूजे ’ म्हणून घोषणा करणारा, फ्रेंच शासनाविरुद्ध लढून मृत्यूच्या बेटात शिक्षा भोगत असलेल्या ड्रायफसला सोडवून आणणाऱ्या एमिल झोलाचे पॅरिस ! ‘ स्वातंत्र्य, बंधुत्व, समता’ चा मंत्र जगाला दिलेले पॅरिस ! कला, संस्कृती, साहित्य यांचे माहेर घर असलेले पॅरिस !– अशा पॅरिसचा मोह कुणाला होणार नाही ?–

द्वितीय महायुद्धापुर्वी पॅरिस हे पाश्चात्याना आदर्श होते ! सगळ्या सुंदर, कलात्मक वस्तूचा, सभ्य चालीरीतीचा आदर्श म्हणजे पॅरिस ! ही स्थिती जवळजवळ १९५० पर्यंत टिकली असावी. १९५३ साली मी युरोपात हिंडत असता, मला एक गमतीदार वाक्प्रचार ऐकायला मिळाला ‘ तुम्हाला घोड्याशी बोलायचे आहे, तर जर्मन भाषेत बोला, सुंदर रमणीशी बोलायचे असेल तर फ्रेंच भाषेत बोला !–

आज ज्याप्रमाणे व्यापार व राजनीती याच्या प्रभावामुळे इंग्रजी ही आंतरराष्ट्रीय दळणवळणाची भाषा झाली आहे, त्याप्रमाणे सुसंस्कृतीची शिष्टाचाराची भाषा म्हणजे फ्रेंच भाषा होती ! फ्रेंच न जाणणारा माणूस ‘ गावठी ’ समजला जायचा – रशियात झारशाही असताना, दरबारात फ्रेंच भाषा बोलली जाई ! भारत स्वतंत्र होण्याच्या सुमारास मी ईथियोपियात गेलो होतो– शिकलेली, उच्चस्तरातील ईथियोपियन माणसे आपापसात फ्रेंच मधे बोलत !– असा हा फ्रेंच संस्कृतीचा प्रभाव होता!– अत्यंत सुसंस्कृत मनुष्य अशी भावना होती. फ्रेंच साहीत्य जगात श्रेष्ठ गणले जाई. इंग्लंडने केवळ शेक्सपीयर हा एकच जगद्विख्यात लेखक दिला, पण फ्रांसने डझनावारी शेक्सपियर निर्माण केले असे फ्रेंच अजूनही

समजतात. मनातून ते अजूनही स्वत:ला श्रेष्ठ समजतात. इंग्रजांना बनिये समजतात आणि अमेरिकनांना बालिश, पोरकट, अपरिपक्व समजतात.

अर्थात् दुसऱ्या महायुद्धाने सगळ्यांचाच नक्शा उतरविला, त्याचबरोबर फ्रेंचांचाही ! हिटलरने मॅजिनो लाईनचा धुव्वा उडवून चुटकीसारखे फ्रान्स घेतले आणि पॅरिसची धूळधाण उडविली ही जखम फ्रेंचांच्या हृदयावर आहे, ती पुसली गेली नाही.

तरीही, पॅरिसचे आकर्षण कमी झालेले नाही सुटी लागली किंवा हक्काची रजा मिळाली की लंडनचे युवक-युवती पॅरिसला जातात (जे गेले नसतात ते ) इंग्रजी व्यतिरिक्त आजकाल रशियन, जर्मन काही विद्यार्थी शिकत असले तरी फ्रेंच घेणाऱ्यांची संख्या अधिक आहे. (भारतात चौदा भाषा आहेत. त्यातील एक ही भाषा इंग्रजी विद्यार्थी घेत नाहीत ! ) जगातील भाषापैकी इंग्लंडमधे फ्रेंच बोलणाऱ्यांची संख्या अधिक आहे. फ्रेंच भाषा ऐकायला मधुर आहे, आणि बोलायलाही सोपी आहे फ्रेंच भाषा बोलताना तुम्ही चुकलात तर फ्रेंच मनुष्याच्या प्रतिक्रिया इंग्रज माणसा सारख्या नसतात एखादा ' इंडियन ' इंग्रजी बोलताना थोडस चुकला किंवा उच्चार नीट आले नाहीत तर इंग्रज मनुष्य (तुमच्या ओळखीचा असेल तर) म्हणेल, ' इंडियन इंग्लिश रुढ होऊ पहात आहे.' फ्रेंच मनुष्य तुमचा असा अपमान करणार नाही. ते त्याच्या सभ्यतेशी विसंगत आहे.

फ्रेंच भाषेविषयी मी जरा विस्ताराने लिहिले कारण त्यावरून फ्रेंचांचा स्वभाव थोडाफार कळून येतो. चुकीचे बोला, पण फ्रेंच बोला अशी त्यांची इच्छा असते. जी फ्रेंच माणसे इंग्रजी बोलतात, ती इंग्रजीतल्या कठोर व्यंजनांना मृदु करून बोलतात. 'ट'ऐवजी 'त', 'ड' ऐवजी'द.'

पॅरिसचे येवढे आकर्षण का ? लंडनला आमच्या शेजारी मर्चंण्ट नेव्ही मधले श्री. साठे रहात. त्यांची पत्नी सौ. वीणा दिसायला खूपच सुंदर; आणि प्रसन्न, हसरे डोळे. हे तरूण दांपत्य पॅरिसला गेले असता, रस्त्यात एका फ्रेंच तरूणीने साठ्यांना विचारले, 'अकम्पनियारे?' (येणार का संगतीला ? ) साठे म्हणाले, 'माझी पत्नी माझ्या बरोबर आहे 'तेव्हा नाक आणि खांदे उडवीत ती फ्रेंच तरूणी म्हणाली, 'पॅरिसला येता ते

बायकोला घेऊन ?' (अगदीच अरसिक आहे !)– लंडनच्या पिकॅडिली सर्कसच्या चौफेर जे रस्ते आहेत त्या रस्त्यावर अशा तरूणी अनेक आढ-ळतात , पण त्या असं विचारणार नाहीत. त्या तुम्हाला निराळ्याच तऱ्हेने 'आमन्त्रित' करतील बॅंकॉकला तर याचा सुळसुळाट फार आहे.– तेव्हा, त्यासाठी मुद्दाम पॅरिसला बदनाम करण्याची काही जरूरी नाही !

पॅरिस हे इतर पाश्चात्य शहरापेक्षा वेगळे वाटते, कारण अजुनही पॅरिस एक अखड शहर आहे लडनप्रमाणे ते निरनिराळ्या समुहांचे मिश्रण नाही. वीस प्रशासनीय विभाग (अॅराँ देस् माँ) असलेले पॅरिस नखशिखात एकजीव आहे

१९६८ साली पॅरिसच्या विद्यार्थ्यांनी तत्कालीन 'एस्टॉब्लिशमेन्ट' विरूद्ध बड पुकारले होते ते बड थोडे अभूतपूर्वच होते. सॉरबाँ, नाँतेरे विभागातील युवक लॅटिन क्वार्टर्स भागात जाऊन रस्त्यावर धुमाकूळ घालू लागले मोटारी जाळल्या रस्ते उखडले खिडक्यांची तावदानें फुटली, विद्यार्थ्यांच्या या धुमाकुळीमुळे कारखाने बद ठेवावे लागले, सुप्रसिद्ध रेस्तॉरांनी शटर्स खाली ओढली वर्तमानपत्रे सुद्धा बद करावी लागली– पोलिसाना अश्रुधुराचा व दडुक्याचा उपयोग करावा लागला– विद्यार्थ्यांचे हे बड अभूतपूर्व होते– प्रचलित विश्वविद्यालया विरूद्ध ती निदर्शने होती. अध्यक्ष 'शार्ल्स द गुल्' (चार्ल्स द गॉल् चा एक फ्रेंच युवतीने मला शिकविलेला उच्चार) आणि प्रधानमंत्री जॉर्ज पॉपिन्दोनी कौशल्याने विद्यार्थ्यांचा उद्रेक शात केला. पण जो उद्रेक झाला तो 'फ्रेंच स्वभावा' विरूद्ध होता 'सिटी ऑफ लाईटस्' ची ख्याती फ्रेंच विद्यार्थी मलिन करू पाहात होते. याचा फ्रेंचाना राग होता. जुन्या फ्रेंच राज्याचे देदिप्यमान वैभव अजूनही पॅरिस व व्हर्सायला दिमाखात ठेवतात. फ्रेंच भाषा अवगत असणे, हे सभ्यतेचे लक्षण समजले जाई कला साहित्य यात फ्रेंच वरिष्ठ होते. शिल्पकाम भव्य व प्रेक्षणीय. रमणीचे विभ्रम फ्रेंच माणसानेच जाणावेत व हर्षोत्फुल्ल जीवन पॅरिशियननेच उपभोगावे ! तथाकथित 'गरीव' वस्त्यातून सुद्धा आनंदी असत, समाजातला कोणताही स्तर सुसस्कृतपणाचे किमान जीवन जगत होता व आहे, द्वितीय महा-युद्धानंतर १९६८ च्या अंतर्गत बंडाने पॅरिस विचलित झाले नाही. ते

भक्कम आहे, आपली अस्मिता राखून आहे. आमची भारतीय शहरे आपली अस्मिताच गमावून बसली आहेत. 'आधुनिक तीर्थक्षेत्राच्या' गोंडस नावाखाली एक रोगट, भकास व बकाल संस्कृती निर्माण होत आहे.

पॅरिसने आपले संतुलन कायम राखले आहे, आपली अभिरूची बिघडू दिली नाही, आणि आपला ठामपणा। जगातल्या महान कलाकारांचे, तत्वज्ञान्यांचे, बुद्धिजीवी लोकांचे पॅरिस माहेर घर असे. (आता हे वैशिष्ट दुर्दैवाने लोप पावू लागले आहे) लंडनमधला मनुष्य उगीचच घमेण्डखोर वाटतो, पॅरिशियनच्या बोलण्याचालण्यातच आपले 'वरिष्ठत्व' तो प्रस्थापित करतो. इतरांपासून हा 'वेगळाच' आहे असे तो पटवतो— अजुनही पॅरिशियन लोकांच्या अभिरूची हीन पातळीवर आल्या नाहीत. उत्कृष्ट पेय, उत्कृष्ट साहित्य, सौंदर्यपूर्ण शय्यागार— हे पॅरिशियनच्या अभिरूचीचे पैलू.

एक विरोधाभास वाटेल, पण पॅरिसची लष्करी परंपराही गौरवशाली आहे, आणि शहरात त्या शूर वीरांची स्मारके ठिकठिकाणी आढळतील अनेक रस्त्यांना लष्करात मर्दुमकी गाजविलेल्यांची नावे आहेत—

---

आणि, पॅरिस म्हणजे फ्रान्स !—भारतातील कोणत्याही शहराविषयी आपण तसे म्हणू शकणार नाही ! मुंबई म्हणजे महाराष्ट्र सुद्धा नव्हे, मग संबंध भारत तर दूरच !—

हे सगळ खर असल तरी पूर्वीचे पॅरिस आता तितकेसे राहिले नाही— १९७७ मधे मी दुसऱ्यांदा पॅरिसमधे गेलो असता हा फरक मला जाणवला. मी 'हॉटेल द फ्रान्स' या तीन तारांकित हॉटेलात उतरलो होतो. या हॉटेलचा पत्ता 46, Rue De La Cvoix Nivert, 7015 Paris, असा आहे. इथून नात्र दाम हे सुप्रसिध्द चर्च व नेपोलियनची समाधी जवळ आहे— पचवीस वर्षापूर्वी त्रिरांकित हॉटेल म्हणजे फारच भपकेबाज व विलासी, आज तसे नव्हते, मी लंच बाहेर घेतले. त्याचे साडेतेवीस फ्रॅन्क पडले. रात्री ३० फ्रॅन्क पडले. त्या मानाने जेवण विशेष नव्हते— तसेच पूर्वी जी विलक्षण स्वच्छता, तत्परता दिसायची, तीही दिसली नाही. पूर्वीचा शाम्पेन प्रमाणे उसळणारा उत्साह, ती स्वच्छंदता, कमी वाटली. काही काही बाबतीत तर हे शहर अजून झोपलेलेच आहे काय असे वाटावे !

नवनव्या इमारती क्वचितच दिसतात. एक क्षुल्लक उदाहरण म्हणजे पहिल्या महायुध्दानंतर १९२८ साली पचमं जॉर्ज, हॉटेल बांधले गेले त्यानंतर जवळजवळ चाळीस वर्षापर्यन्त 'हिल्टन' खेरीज दुसरे हॉटेल बांधले गेले नाही. इतर प्रकारच्या नव्या इमारतीही विशेष बांधल्या गेल्या नाहीत एका पॅरिशियनच्या मते, 'पॅरिस सुदर राहिले पाहिजे' हे मुख्य कारण आहे डॉम मोरेसच्या मते न्युयॉर्क सारखे दुसरे घाणेरडे शहर जगात नाही– युनेस्को तर्फे भारतातील लोकसख्येवर त्याने जे पुस्तक लिहिले, त्यात तो म्हणतो की 'न्युयार्क मधे राहाणे मी कधीच पसत करणार नाही' तो म्हणतो, न्युयॉर्कला आकाश दिसतच नाही, इतक्या प्रचण्ड उंच इमारती आहेत– 'स्कायलाईन' अदृश्यच ! – पॅरिशियन्सना असल्या इमारती आवडत नाही– स्काय लाईन दिसलीच पाहिजे, म्हणून, आठनऊ मजल्यापेक्षा जास्त उच इमारती बाधायला परवानगी नाही. लडनला सुद्धा अती उच इमारती फारशा नाहीत गेल्या वीस वर्षात पोस्ट ऑफिस टॉवर सारख्या काही उच इमारती झाल्या आहेत. पण, एकंदर ती प्रवृत्ती कमी– पॅरिसमधेही काही वर्षापासून काही विभागात उच इमारती बाधायला परवानगी दिली गेली आहे, आणि बदल होत आहे याची ही चिन्हे हळुहळू दृग्गोचर होत आहेत. 'पॅरिस सुदर व स्वच्छ ठेवा' या मत्रामुळे खाजगी बाधकामाला फारसे उत्तेजन मिळत नाही व सार्वजनिक बाधकामही थडच असते वीस वर्षात युनेस्कोचे मुख्यालय, मैसन द ला रेडिओ, (यात फ्रेंच आकाशवाणी व दूरदर्शन सम्मीलीत आहेत) आणि मैन मॉंतपारनासे याच नाव घेण्या– सारख्या मोठ्या इमारती बाधल्या गेल्या– हे लक्षात घेता, मुबईला जनतेच्या आरोग्याची यत्किचितही तमा न बाळगता, बान्द्रा बीचवर प्रचण्ड इमारती, नरिमन पॉईंटवर गगनचुबी इमारती बाधायला परवानगी देणाऱ्या सरकारला काय म्हणावे ? पॅरिसच्या 'सीन' (Seine) नदीवर ३२ पूल आहेत. तीस वर्षात 'गॅरिग्लीयानो' हा एकच नवा पूल बाधला गेला आहे. साडपाण्याच्या भूमिगतगटारी, गॅसलाईन, इलेक्ट्रिक कॉन्डयूईटस्, जुनाट झाल्या आहेत. टेलिफोन मिळायला कित्येक महिने लागतात. पॅरिसमधे पिण्याचे पाणी लडन किंवा हालंड वा जर्मनीप्रमाणे, 'शुद्ध' नाही कारण पाण्याचे १८९५ पासून सुधारले गेले नाहीत. म्हणजे

या गोष्टी पॅरिसचे सौंदर्य वाढवीत नाही, पण तेच रस्त्याच्या दुतर्फा झाडी, (Boulevards) मॉस्कोच्या खालोखाल जिचा क्रम लागेल अशी भूमिगत रेल्वे, ('मेट्रो', इंग्लंडमधे भूमिगत रेल्वेला 'ट्यूब' म्हणतात), शहराच्या आसपास (उदा. Rond part dela Detense, नॉनतेरे जवळ) नवीन घराची उभारणी, यावर पैसे खर्च केले जातात

पॅरिसमधला बदल फारसा जाणवत नाही कारण, गेल्या शतकाच्या मध्यात ब्रॅरॉं (सरदार) हाऊसमॉं (Haussmann) च्या पुढारीपणा खाली पॅरिसची जी रचना झाली ती मूलत तशीच आहे. हासमॉन् सतत १७ वर्षे पॅरिसचा प्रिफेक्ट होता. त्याने ऑपेरा, ईटॉइल् साठी योजना आखल्या, रेल्वे स्टेशन्स शहराच्या कोणत्या भागात असावीत ते ठरविले, आणि आज जी पॅरिसमधली बुलवॉर्डची रचना आहे. ती त्याने निर्माण केलेली आहे द पॉन्त अलेक्झान्द्र, आणि द ग्रॉन्द (ग्रॅन्ड) व पतित (पेटिट, लहान) पॅलेसेस या इमारती नतरच्या हौसमॉंच्या कल्पनाप्रमाणेच आहेत १९३७ साली पॅरिसला जे जंगी प्रदर्शन भरले तो पॅले द शैलॉत हॉल (Palais de chaillot) हौसमॉंच्याच आखणीप्रमाणे–त्यानतर, मी ज्याच्या उल्लेख केला आहे त्यापलिकडे फारशा इमारती झाल्या नाहीत

पॅरिसची आणखी एक बाजू पाहू या– त्यावरून पॅरिस आपली सृजनात्मक शक्ती आपला 'जोष' गमावून बसले की काय असे वाटते. (१९६७ मधला विद्यार्थ्यांचा दगा जमेस धरून) पॅरिसची शान म्हणजे नाटचगृहे, ती आता जीर्णशीर्ण वाटू लागली आहेत, त्यात चैतन्य नाही. त्यामानाने लडनची नाटचगृहे, तिथले प्रयोग ताजीतवानी वाटतात. चित्रपटातले नवनवीन प्रयोग (Nouvella vague) ते अपेक्षाभग करणारे ठरले. दूरदर्शन भारतीय दूरदर्शन प्रमाणेच भिकार आहे. चॅनेलसही थोडयाच आहेत पॅरिसमधे नाव घेण्याजोगे फक्त एकच वृत्तपत्र, 'ले मॉंदे' (Le Monde) आहे. त्यामानाने मुबई फारच जागृत आहे. इंग्रजीतली दोन, टाईम्स ऑफ इडिया आणि इडियन एक्स्प्रेस व मराठीतली दोन, लोकशक्ती आणि महाराष्ट्र टाईम्स याचा वाचकवर्ग देशभर पसरलेला आहे. १९२०–२५ च्या सुमारास, पॅरिसमधे जगातले सर्वोत्कृष्ट सहासात चित्रकार रहात होते, त्याची जागा अजून कोणी घेतली नाही. पूर्वी पॅरिस म्हणजे जगातल्या कलावताचे, साहित्यिकाचे, कवीचे, माहेर

घर व आश्रयस्थान होते 'वसुधैव कुटुम्बकम' दृष्टिकोनावरोबरच 'मुक्त' पर्मिसिव्हनेस वृत्तीपण होती– विचार आणि आचार स्वातंत्र्य ! –साहित्य आणि कला याचे अत्याधुनिक प्रयोग (क्यूबिझम, डा–डा, सर्रेरिॲलिझम् ए शिर्ॲलिझम् इ.) इथूनच जन्म पावले अजूनही जागतिक कीर्तीचे, उदा बेकेट, लेखक पॅरिसमधे राहतात– परतु १९२०--३० या दशकात सातासमुद्रापलिकडील साहित्यिक आणि कलावत पॅरिसला येऊन राहात, (हेमिन्वे, फिझरल्ड, जेम्स जॉईस, पिकॅसो, स्ट्रॅव्हिन्स्की, डियाधिलेव्ह इ ) तसे आज दिसत नाहीत.

पूर्वी पॅरीसची जगात किर्ती म्हणजे "काठोकाठ भरू द्या पेला, फेस भराभरा उसळू द्या" या हर्षोत्फुल्ल चैतन्याची होती. आज त्यात बदल झाला आहे मॉनामार्त्र बद झाले. (पुण्याचे किर्लोस्कर थिएटर बंद झाले, इंदूरचे नदलालपुरा थिएटर बद झाले ! कुणाला त्याचा ना खेद ना खत !–) अर्थात अजून बुलवर्ड सेन्ट जर्मेन वर काफे फ्लोर मधे जिवत सळसळीच्या लहरी दिसतात, आणि ड्यू मॅगॉट्स मधे एखाद्या सुदर शनिवारी सध्याकाळी टेबल मिळणे मुष्किल आहे, परतु दॉम (Dome) द रोटन्दे सारखी अरिस्टोक्रॅटिक खानदानी हॉटेलाना आता अवकळा आली आहे, आणि लारू (Larue) सारखी 'मातबर' हॉटेले तर बदच झाली – रिट्झ मधली तीन बार रात्री दहाला बद होतात ही केवढी शोचनीय अवस्था आहे

या स्थितीची कारणे शोधून काढणे अवघड आहे दोन महायुद्धामधे अनेकाच्या आहुती पडल्या त्यात पुन्हा दुसऱ्या महायुद्धात नाझीनी केलेल्या पराभवाचे दारूण शल्य, व मानहानी – तसेच युद्धानतर बसविलेले कर वाढती महागाई आणि त्यामुळे वस्तूच्या किमतीबद्दल बोलायलाच नको, पण जे दूध तिसऱ्या दशकात पचवीस पैसे (त्याकाळाच्या हिशेबाप्रमाणे चार आणे) ते आता सहा रूपये किलो झाले आहे ! मिठासारखी वस्तू रुपयाला किलो ! भाज्या, फळें, याविषयी तर बोलायलाच नको ! त्यातून "शुद्ध" वस्तु मिळणेच दुरारापास्त झाले आहे !– आणखी एक गोष्ट – पॅरीसमधे करवसूली सक्तीने होत असते. (भारताने काहीतरी शिकायला पाहिजे ! ) यामुळे पॅरीस हे फार महागडे शहर झाले आहे ! १९५० च्या आसपास सर्वसामान्य माणसाला आरामात राहण्यासाठी

फार संघर्ष करावा लागायचा नाही, आर्थिक ताण कधी भासला नव्हता– याच बरोबर डी गॉलने आपल्या व्यक्तित्वाने बऱ्याच गोष्टीत परिवर्तन घडवून आणले. डी गॉल हा थोडा फार 'स्पार्टन' प्रवृत्तीचा – त्याने नीतीबंधनें, संयम या सर्व गोष्टींवर भर दिला – एक प्रकारचे दडपणच त्याने आणले. त्यामुळे पुष्कळशा नवनवोन्मेषशालिनी कळ्या करपून गेल्या. पॅरिसचा आत्मा म्हणजे 'स्वच्छंदता', त्यावरच डी गॉलने घाला घातला यामुळे कला, साहित्य, बौद्धिक जीवन यावर परिणाम झाला. पॅरिसच्या 'मुक्त' 'स्वैर' वातावरणाने पॅरिसमधे उतफुल्ल प्रसन्नता, रसरसलेला जोश असे, त्यातील अस्मितेवरच धाड आली ! –

राजकारणात डी गॉलचे स्थान काही असो, तो 'रुक्ष' माणूस असला पाहिजे. पॅरीसच्या आनंदावर त्याने विरजण घातले स्वैर उडणाऱ्या विहगाचे पंखच कापले.

वरील कारणाखेरीज आणखी एक कारण एका पॅरिशियनने सांगितले – 'मोटारी' – तो म्हणाला, मोटार गाडीने सभ्यतेला फाटाच दिला

याहून आणखी एक जबरदस्त कारण म्हणजे यांत्रिक प्रगती पुष्कळशा फ्रेंचाना सर्व क्षेत्रातले औद्योगीकरण, यांत्रिकीकरण मुळीच आवडत नाही अमेरिकन स्वभावाच्या अगदी विरूद्ध हे वैशिष्टच आहे. योजनारहित औद्योगीकरणाने भारत मृतप्रायच झाला. आता 'इन्डिया' मात्र आहे! जिथे गंगा प्रचण्ड गटार बनते, लोणावळ्याची जंगले कापली जाऊन कारखाने निघतात, (अशी किती उदाहरणे द्यावी ?) तिथे 'भारत' कसा जिवंत राहणार ? गांधीजींनी १९४२ साली 'भारत छोडो' ची घोषणा दिली होती. 'भारत' गेलाच ! – पुष्कळशा पॅरिशियन लोकाना 'नाविन्यसाठी नाविन्य' आवडत नाही अर्थात् झपाट्याने बदलणाऱ्या कालमानाप्रमाणे पॅरिशियन लोकानाही आपल्या घरात 'अत्याधुनिक' उपकरणे वापरावीच लागतात, पण मनातून ते प्रसन्न नाहीत 'आपतधर्म' समजतात.

तांत्रिक दृष्ट्या पॅरिस तीन भागात बनलेले आहे व या तीन 'ऑर्गनिझम्स्' मोठ्या गुंतागुंतीच्या व्यवस्थेने एकत्र गुंफले आहे ही गुंफण १९६० पासून अस्तित्वात आली. तत्पूर्वी हौसमानाने १८५८ साली

पॅरिसची जी आखणी केली होती तीच चालू होती – आणि अजूनही नेपोलियनच्या काळात पॅरिस नगर रचनेचा जो प्रशासकीय ढाचा आहे तो तसाच आहे.

पहिला भाग म्हणजे 'पॅरिस इन्त्रा म्यूरा' (Paris Intra Muros) खुद्द पॅरिस! नारळाच्या वरच्या खूप मोठ्या आवरणाखालील खोबर! याला एकदर मोठ्या वेशी (दरवाजे) 'पोर्त आहेत. उदा० Porte Maillot, आणि हा भाग एकवीस प्रशासकीय युनिटसमधे विभागला गेला आहे, आणि याला स्वतःचा मेयर असतो या पॅरिस इन्त्रा म्यूरॉ चे क्षेत्रफळ केवळ ३३.५ वर्गमैल आहे (यात Bois de Boulogne आणि Bois de lincennes सारखी मोठी उद्याने पण आहेत) लोकसख्या तीस लाखाच्या आसपास.

दुसरा भाग म्हणजे बृहन पॅरिस (ज्याला अधिकृतरीत्या पॅरिस अर्बन कॉम्फ्लेक्स' म्हणतात) याचे क्षेत्रफळ ४६३ वर्गमैल आहे, आणि लोकसख्या ७५–७६ लाख – ह्या भागात वस्ती फारच घनदाट आहे असं म्हणतात. टोकियो नतर इतक्या दाट वस्तीचे शहर नाही (एका वर्गमैलाच्या हिशेबाप्रमाणे.)

तिसरा भाग 'द डिस्ट्रिक्ट ऑफ द रीजन ऑफ पॅरिस' – याचे क्षेत्रफळ ४६७० वर्गमैल असून लोकसख्या ९० लाख आहे साधारणपणे सपूर्ण फ्रान्सच्या १७ टक्के - हा तिसरा भाग मोठा व्हायचे कारण म्हणजे यात पूर्वीचे सीन (Seine) सीन - एत् - उई (Seine–et–oise) आणि सीन - एत - मार्न (Seine-et-Marne) हे भाग समाविष्ट केले गेले आहेत. हा तिसरा भाग आठ प्रशासकीय वॉर्डात विभागला गेला आहे, आणि यात सुप्रसिध्द व्हर्साय, फॉन्ताब्ल्यू, सेन्ट जमॉ - एँ - लाये (Sh. Germani en Laye) आणि रॅमबौलेत (Ram boullet) हेही समाविष्ट आहेत.

या पुनर्रचनेस राजकीय हेतु नसला तरी तेराव्या लुईपासून हे अध्याहृत धोरण आहे की पॅरिसची अशी फाळणी झालेली बरी - मुबई कांग्रेस, महाराष्ट्र काग्रेसपासून अलग करण्यात हाच हेतु - मुबईत मराठी माणसे बहुसख्य असू नये यासाठी जे प्रयत्न करण्यात येत आहेत त्याच्या

फार संघर्ष करावा लागायचा नाही, आर्थिक ताण कधी भासला नव्हता—याच बरोबर डी गॉलने आपल्या व्यक्तित्वाने बऱ्याच गोष्टीत परिवर्तन घडवून आणले डी गॉल हा थोडा फार 'स्पार्टन' प्रवृत्तीचा – त्याने नीतीबंधने, संयम या सर्व गोष्टीवर भर दिला – एक प्रकारचे दडपणच त्याने आणले त्यामुळे पुष्कळशा नवनवोन्मेषशालिनी कळ्या करपून गेल्या. पॅरिसचा आत्मा म्हणजे 'स्वच्छंदता', त्यावरच डी गॉलने घाला घातला यामुळे कला, साहित्य, बौद्धिक जीवन यावर परिणाम झाला. पॅरिसच्या 'मुक्त' 'स्वैर' वातावरणाने पॅरिसमध्ये उत्फुल्ल प्रसन्नता, रसरसलेला जोश असे, त्यातील अस्मितेवरच धाड आली ! –

राजकारणात डी गॉलचे स्थान काही असो, तो 'रुक्ष' मांणूस असला पाहिजे पॅरीसच्या आनंदावर त्याने विरजण घातले. स्वैर उडणाऱ्या विहंगाचे पंखच कापले.

वरील कारणाखेरीज आणखी एक कारण एका पॅरिशियनने सांगितले – 'मोटारी' – तो म्हणाला, मोटार गाडीने सभ्यतेला फाटाच दिला

याहून आणखी एक जबरदस्त कारण म्हणजे यांत्रिक प्रगती पुष्कळशा फ्रेंचाना सर्व क्षेत्रातले औद्योगीकरण, यांत्रिकीकरण मुळीच आवडत नाही अमेरिकन स्वभावाच्या अगदी विरूद्ध हे वैशिष्टय आहे योजनारहित औद्योगीकरणाने भारत मृतप्रायच झाला. आता 'इन्डिया' मात्र आहे! जिथे गंगा प्रचण्ड गटार बनते, लोणावळयाची जंगले कापली जाऊन कारखाने निघतात, (अशी किती उदाहरणे द्यावी ?) तिथे 'भारत' कसा जिवंत राहणार ? गांधीजींनी १९४२ साली 'भारत छोडो' ची घोषणा दिली होती. 'भारत' गेलाच ! – पुष्कळशा पॅरिशियन लोकांना 'नावित्यसाठी नाविन्य' आवडत नाही. अर्थात् झपाट्याने बदलणाऱ्या कालमानाप्रमाणे पॅरिशियन लोकांनाही आपल्या घरात 'अत्याधुनिक' उपकरणे वापरावीच लागतात, पण् मनातून ते प्रसन्न नाहीत. 'आपतधर्म' समजतात.

तांत्रिक दृष्टया पॅरिस तीन भागात बनलेले आहे व या तीन 'ऑर्गॅनिझम्स्' मोठया गुंतागुंतीच्या व्यवस्थेने एकत्र गुंफले आहे ही गुंफण १९६० पासून अस्तित्वात आली. तत्पूर्वी हौसमानाने १८५८ साली

पॅरिसची जी आखणी केली होती तीच चालू होती – आणि अजूनही नेपोलियनच्या काळात पॅरिस नगर रचनेचा जो प्रशासकीय ढाचा आहे. तो तसाच आहे

पहिला भाग म्हणजे 'पॅरिस इन्त्रा म्यूरा' (Paris Intra Muros)' खुद्द पॅरिस ! नारळाच्या वरच्या खूप मोठ्या आवरणाखालील खोबर ! याला एकदर मोठ्या वेशी (दरवाजे) 'पोर्ते आहेत उदा० Porte Maillot, आणि हा भाग एकवीस प्रशासकीय युनिटसमधे विभागला गेला आहे, आणि याला स्वतःचा मेयर असतो. या पॅरिस इन्त्रा म्यूरॉ चे क्षेत्रफळ केवळ ३३.५ वर्गमैल आहे (यात Bois de Boulogne आणि Bois de lincennes सारखी मोठी उद्याने पण आहेत) लोकसंख्या तीस लाखाच्या आसपास

दुसरा भाग म्हणजे बृहन पॅरिस (ज्याला अधिकृतरीत्या पॅरिस अर्बन कॉम्प्लेक्स' म्हणतात) याचे क्षेत्रफळ ४६३ वर्गमैल आहे, आणि लोकसंख्या ७५–७६ लाख – ह्या भागात वस्ती फारच घनदाट आहे असं म्हणतात. टोकियो नतर इतक्या दाट वस्तीचे शहर नाही (एका वर्गमैलाच्या हिशेबाप्रमाणे.)

तिसरा भाग 'द डिस्ट्रिक्ट ऑफ द रीजन ऑफ पॅरिस' – याचे क्षेत्रफळ ४६७० वर्गमैल असून लोकसंख्या ९० लाख आहे साधारणपणे सपूर्ण फ्रान्सच्या १७ टक्के - हा तिसरा भाग मोठा व्हायचे कारण म्हणजे यात पूर्वीचे सीन (Seine) सीन - एत् - उई (Seine-et-oise) आणि सीन - एत - मार्न (Seine-et-Marne) हे भाग समाविष्ट केले गेले आहेत हा तिसरा भाग आठ प्रशासकीय वॉर्डात विभागला गेला आहे, आणि यात सुप्रसिध्द व्हर्साय, फॉन्ताब्ल्यू, सेन्ट जर्मां - एँ - लाये (Sh. Germani en Laye) आणि रॅमबौलेत (Ram bouillet) हेही समाविष्ट आहेत.

या पुनर्रचनेस राजकीय हेतु नसला तरी तेराव्या लुईपासून हे अध्याहृत धोरण आहे की पॅरिसची अशी फाळणी झालेली बरी - मुंबई काँग्रेस, महाराष्ट्र काँग्रेसपासून अलग करण्यात हाच हेतु - मुंबईत मराठी माणसे बहुसंख्य असू नये यासाठी जे प्रयत्न करण्यात येत आहेत त्याच्या

मागे असलाच हेतु, कारण मराठी माणूसच दिल्लीशी टक्कर देऊ शकतो, म्हनून त्याच्यात दुफळी असलेली बरी. शिवाजीच्या काळापासून हेच धोरण की मराठी माणसाने एक होऊ नये-फ्रान्स सरकारलाही पॅरिसच्या 'जमावा'ची (जनतेची) भीती वाटत असते पॅरिस आपल्या हातातून निसटता कामा नये, (ज्याप्रमाणे मुबई दिल्लीच्या हातून निसटता कामा नये !) कारण, पॅरिसवर ज्याची सत्ता, त्याची सत्ता साऱ्या फ्रान्सवर ही धारणा फ्रेंच राज्यक्रांतीपासून दृढमल झालेली आहे.

पॅरिसमधे तीन मुख्य अधिकारी आहे. द कौन्सिल म्युनिसीपल, द प्रिफेक्ट ऑफ् द सीन, आणि चीफ ऑफ पोलीस–

म्युनिसीपल कौन्सिलमधे चाळीस सदस्य असतात. व त्याची मुदत सहा वर्षाची असते हे सदस्य लोकानी निवडून दिलेले असतात या कौन्सिलची सभा नियमितपणे भरत असते आणि सभेमधे घरे, शाळा, अग्निशामक खाते, दवाखाने. इ विषयाची चर्चा होते, ठराव पास केले जातात. अर्थात, या कौन्सिलने पास केलेल्या ठरावाची अमलबजावणी करण्याचा अधिकार कौन्सिलला नाही, कारण प्रिफेक्टने किंवा चीफ् ऑफ पोलीसने आपल्या पसतीचे शिक्कामोर्तब ठोकल्या खेरीज ते ठराव निर्जीवच राहातात, व हे दोन्ही अधिकारी राष्ट्रीय सरकार नेमते !

म्युनिसीपल कौन्सिल आपल्या सभासदातून एक अध्यक्ष निवडते, यालाच 'मेयर' म्हणतात याची मुदत एक वर्षाची असते. साधारणपणे तोच मेयर पुन्हा निवडला जात नाही. याला अपवाद फक्त एकदाच घडला होता १९४७ ते १९५१ ही चार वर्षे सतत चार्ल्स द गॉल चा भाऊ पीयेरे द गॉल निवडून आला होता त्या काळात चार्ल्स द गॉलच्या भोवती एक मोठे 'हीरोशिप' चे वलय होते !– म्युनिसीपालटीचा प्रिफेक्ट हा सरकार व कौन्सिल याच्या मधला दुवा असतो पॅरिसचे सुदैव असे की पॅरिसला कर्तव्यनिष्ठ, जनतेच्या कल्याणाची इच्छा बाळगणारे व त्याप्रमाणे अथक् परिश्रम करणारे प्रिफेक्टसची परपरा लाभली– गेल्या दशकात पॅरिसमधे युवकाचा प्रश्न जटिल झाला आहे असे पुष्कळ प्रिफेक्टसचे मत दिसून आले. त्याच प्रमाणे गरिब व श्रीमत यामधली प्रचण्ड दरी बरीच अरुद झाल्याचे आढळुन आले- बँकांचे राष्ट्रीयकरण, रेल्वे, दूरदर्शन व रेडिओ आणि अनेक उद्योगधद्याचे

राष्ट्रीयकरण झाल्यामुळे हा भेद पुष्कळसा आकुंचित झाला असावा-पण मुंबईत हा भेद वाढत आहे, आणि मुंबईतल्या त्या झोपडपट्ट्या !– 'स्वच्छ मुंबईसाठी' मुंबईत मताधिक्याने निवडून आलेले 'शिवसेना' पक्षाचे कार्पोरेटर्स व त्याचा मेयर भुजबळ हे प्रयत्न करित असता सत्तारूढ काँग्रेस पक्षाने अडथळे आणून ते बेत हाणुन पाडले (१९८५–८६) या पार्श्वभूमीवर पॅरिसचे कौतुक करावेसे वाटते !– सरदार उमरावाचे व पुंजीवाल्याचे प्राबल्य कमी होत गेले आणि कामगाराच्या हिताच्या अनेक लक्षणीय योजना अस्तित्वात आहेत.

युवकाच्या प्रश्नाबरोबरच आणखीही एक डोके दुखी पॅरिसमधे आहे- निग्रोंची !– पूर्वी आफ्रीका खण्ड हा इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स, बेल–जीयम, इटली, पोर्तुगाल, हॉलंड या राष्ट्रात सत्तेसाठी विभागला गेला होता. पहिल्या महायुद्धानतर जर्मन गेले. दुसऱ्या महायुद्धानंतर बाकीचे सर्व हळुहळु गेले अर्थात त्यानी आपली पकड पुष्कळ ठिकाणी कायम ठेवली आहे. उदा झिम्बाब्वे आणि दक्षिण आफ्रीकेत तर अल्पसंख्याक गोऱ्याचेच 'क्रुर' आधिपत्य आहे, आणि बिगर गोरी राष्ट्रे संयुक्त राष्ट्र संघटनेत बहुसंख्य असूनही दक्षिण आफ्रीकेच्या विरुद्ध काही करू शकत नाहीत – फ्रेंचाच्या ताब्यात आफ्रीकेतील पुष्कळ देश होते एक मात्र कबूल केले पाहिजे. फ्रेंचानी आपल्या वसाहतीतील लोकावर कधी जुलूम केला नाही व फ्रेंच अमला खाली जनता सुखी होती अनेक निग्रो अरब लोकाशी चर्चा करून हे मत मी बनविले आहे.मुख्य म्हणजे इंग्रजा-प्रमाणे फ्रेंचाचा वर्णद्वेष प्रकट स्वरुपात कधी नव्हता. त्याना आपल्या वसाहतीतील लोक 'काळे फ्रेंच' बनायला हवे होते 'काळे गुलाम' नव्हता !- याचा एक परिणाम असा झाला की वसाहती स्वतंत्र झाल्या-नंतर हे निग्रो-अरब (अरब कमी, ते सीरीया, लेबॉनान इथे अधिक आहेत) पॅरिसमधे येऊ लागले, व त्याची लोकसंख्या पॅरिसमधे बरीच फुगली आहे. परंतु, हे पुन्हा इथे लक्षात घेणे जरूर आहे की इंग्लंडमधे ज्याप्रमाणे 'रेस-रायटस्' (वर्ण विद्वेषातून निर्माण झालेले दंगे) होतात तसे इथे होत नाहीत–(इंग्लंडचे राज्यकर्ते अतीशय चलाख आहेत आशि-याई विरुद्ध निग्रो हा झगडा ते नेहमी ताजा ठेवतात. तो कसा हे विशद करणे म्हणजे फार विस्तार होईल, व त्यासाठी हे स्थळ ही नव्हे वाच-

कानी माझे ' लंडनची पत्रे ' या पुस्तकातील ६५ ते ७४ ही पृष्ठे वाचवीत ) परतु निग्रोंचा पॅरिसमधे आलेल्या लोंढ्याने आर्थिक घडीवर ताण पडलाच. बरेचसे टॅक्सी ड्रायव्हर्स निग्रो आहेत आपानत निग्रो व गोरा फ्रेंच बरोबरीच्या नात्यानें वागतात, पण मनातून ही निग्रो लाट अस्सल पॅरिशियन लोकाना पसत नाही हे अगदी स्पष्ट आहे (मुंबई शहरात बिगर महाराष्ट्रीयाच्या प्रचण्ड लोंढ्याने व प्रतिदिन वाढत जाणाऱ्या त्या लोंढ्याने मुबईची किती दयनीय स्थिती झाली आहे हे आपण पाहातोच !)– मात्र, या फ्रेंच निग्रोंना पॅरिसने समावून घेतले आहे–

पॅरिसमधे आपले भारतीय सुद्धा आहेत भारतीय परदेशात गेले तरी ते कधी एक जुटीने वागत नाहीत- भारतीयाचा हा एक चमत्कारिक स्वभाव आहे. पॅरिस विमानतळावर एयर फ्रान्समधे नोकरीवर असणाऱ्या एका भारतीय तरूणीचे वर्तन इतर भारतीयाशी कसे उद्धट होते ते मी ' लडनची पत्रे ' या पुस्तकात पृ. १ ते ८ मधे वर्णन केले आहे. लडनमधील आपल्या हायकमिशनचा अनुभव सगळ्या भारतीयाना वाईट आहे मी काही कामासाठी तिथे गेलो असता माझे काम झाले नाही, तेव्हा दुसरे दिवशी माझ्या मुलीच्या इग्रज मैत्रिणीला माझे काम करायला मी सागितले व तिने ते चटकन करून आणले- पॅरिसमधे निरनिराळ्या रेस्तॉरॉं, कॅफेत मला भारतीय आढळले, तुरळक, पण होते. पण ते कधी आपणहून माझ्याशी बोलले नाहीत त्याच्या जवळच्याच टेबलापाशी मी बसलो होतो, व एकटा होतो–असो- पण, लडनमधे जसा आशियाई प्रश्न हा इग्लडला डोके दुखीचा प्रश्न आहे, तसा निग्रोंचा (जे फ्रेंच वसाहतीत फ्रेंच प्रजानन होते) प्रश्न किवा समस्या पॅरिसपुढे नाही एका पॅरिशियनने तर मला सागितले, ' हे आफ्रिकन लोक आल्यामुळे आमचे लक्ष ' मृदु खेळापेक्षा जास्त मर्दानी खेळाकडे जाऊ लागले. सॉकर उद फुटबाल आजचे पॅरिसचे तरुण सॉकरमधे अधिक गोडी दाखवितात व भाग घेतात–

प्रिफेक्ट आणि चीफ् ऑफ पोलीस याची नेमणुक फ्रेंच रिपब्लिकनचा प्रेसिडेन्ट करीत असतो आणि ती बेमुदत असते हे विशेष। प्रिफेक्ट आणि पोलीस प्रमुख हे दोन्ही अधिकारी पॅरिसचें प्रशासन चालविण्यात एकमेकाच्या सहकार्याने वागतात-पॅरिसचे प्रशासन गुतागुतीचे

आहे. कोणते काम पोलीस प्रमुखाला करावे लागते ते सांगणे कठिण आहे ! शांतता व सुव्यवस्था हे तर आहेच, शिवाय फाईन डिपार्टमेन्ट आहे, पब्लिक हेल्थ प्रिफेक्ट बरोबर पाहावी लागते, उदा. प्रिफेक्ट हॉस्पिटलकडे पाहातात आणि शासकीय कर्मचाऱ्याकडे तर पोलीस प्रमुखाकडे उदीर पकडणे (संसर्ग रोगापासून बचाव म्हणून पोलिसाकडे हे खाते दिले असावे !) बाजारातील सॅनिटरी इन्स्पेक्शन आणि खाट-काची दुकाने, भ्रष्टाचार हा निम्नस्तरावर दिसून येत नाही ! कारण गुन्हेगार लवकरच पकडले जातात आणि लाच खाऊन आपली नोकरी गमवायला पोलीस तयार नसतात

वर लिहिलेच आहे की वर्णद्वेषावर (रेसरायटस्) दंगे पॅरिसमध्ये होत नाहीत शिवाय 'झोपडपट्टया' ही भारतीय 'व्होट बॅन्क' संस्था तिथे नाही !– 'स्लम्स थोडयाशाच आहेत, व लंडनने स्लम्स जवळ जवळ नाहीशा केल्या आहेत ते पॅरिसकडून घडले नाही आज लंडनला चॉक फार्म, कॅम्‌डेन टाऊन इथे पूर्वीप्रमाणे स्लम्स आढळणार नाहीत– मात्र 'ज्युव्हेनाईल' गुन्हेगार वाढत आहेत. उदा. हॅन्डबॅग्ज् पळविणे इ. परंतु नागपूरला इंगजी माध्यमाच्या 'प्रेस्टीजीयस' शाळेतील (विशप कॉटन) प्रौढ मुलांनी वगैरे चोरल्या (जाने १९८६) तसे इथे होत नाही.

पॅरिसमध्ये पुरुषासाठी दोन (फ्रेस्‌नेस आणि सुप्रसिद्ध सान्ते) व महिलासाठी एक (ला पटिट रोक्वे La Patite Roquette) तुरुंग आहेत मृत्यू दंडाची शिक्षा (फाशीची) अजून अस्तित्वात असली तरी क्वचितच ती दिली जाते फाशी देण्याची पद्धत पूर्वीपारच आहे, गिलोरीन

एक विशेष म्हणजे मेयर, प्रिफेक्ट व पोलीस मुख्य, याच्या ऑफिसात भिंतीवर महान कलाकाराच्या चित्रकृती टांगलेल्या असतात, राजकीय पुढाऱ्याच्या नाही आपल्या 'इंडियात' ही गोष्ट स्वप्नातही कुणा अधिकाऱ्याच्या येणार नाही, आणि एखादा कलाप्रेमी अधिकाऱ्याने राजकीय पुढाऱ्याचे फोटो न लावता कलाकृती टांगल्या तर त्याचे हसे तर होईलच, पण त्याला 'अलिखित' हुकूमही मिळेल ! –

इथे जाता जाता आन्द्रे माल्‌रॉ (Audre' Malraux) चा उल्लेख करायला पाहिजे. साहित्यिकाना आन्द्रे माल्‌रॉचे नाव चांगलेच माहीत

आहे. श्रेष्ठ कादवरीकार, उत्कृष्ठ कलासमीक्षक म्हणून तो जगद्विख्यात होता. आन्द्रे माल्रॉ जनरल द गॉल्चा परममित्र, व त्याच्या आग्रहावरुन आन्द्रे माल्रॉने ' कल्चरल अफेअर्स ' चे मंत्रिपद स्विकारले होते कॅबिनेट मंत्री म्हणजे त्याने सर्व राष्ट्राच्या कल्चरल अफेअर्स कडे लक्ष द्यायला हवे होते, पण आन्द्रेने आपले लक्ष अधिक केन्द्रित केले पॅरिसवर– हल्लीचे पॅरिसचे मनोहारी रुप आहे त्याला आन्द्रेचे परिश्रम कारणीभूत झाले– पहिली गोष्ट त्याने केली म्हणजे पॅरिस स्वच्छ करणे, पॅरिसमधल्या जीर्णशीर्ण घराना उजाळा देणे ! ही गोष्ट सोपी नव्हती मुबईतल्या परळ, भेंडीबाजार, कामाठीपुरा इ भागातील चाळीना ' उजाळा ' द्यायचे ठरविले तर शक्य होईल काय ? कै श्री स. ग. वर्वे (आय. सी एस. मधली कै यशवतराव चव्हाणाच्या आग्रहावरुन सोडली होती ) हे पुण्याचे कमिशनर असताना त्याना किती त्रास पडला हे सर्वश्रूतच आहे, पण त्याच्याच मुळे सभाजी पार्क, पेशवे पार्क,ही उद्याने व जुन्या पुण्यातील रस्ते रुद झाले ! – पॅरिस शहरामधील स्मारकाना उजाळा देणे हे अशक्य आहे असे शासकीय आर्किटेक्टस्नी स्पष्ट सागीतले होते उदा० पॅरिसमधली सुप्रसिध्द आर्क द त्रिऑम्फ (Arc The Triophe), ' विजयी कमान ' ही पूर्वी अगदी जुनाट, कळकट दिसायची, माल्रॉने तिला डेव्हनशायर क्रीम चा रग देऊन चमकदार केले. हे कुणाच्या मदतीने माल्रॉने केले याचा इतिहास मनोवेधक आहे. एक दिवस काही पुस्तकाचा सेट् एका अज्ञात लेखकानें पाठवून प्रत्येक पुस्तकावर स्वाक्षरी करण्याची विनती केली माल्रॉनें स्वाक्षरी केल्या, व पुस्तकाचा सच पाठवून दिला व तो ती गोष्ट विसरुनही गेला असता– पण त्या लेखकाने माल्रॉला पत्र पाठविले– ' आपण अत्यत सज्जन व सभ्य गृहस्थ दिसता– अन्यथा एकही प्रश्न न विचारता किंवा कुठलीही चौकशी न करता आपण स्वाक्षरी केली नसती ! – ' या पत्राने मालरॉचे कुतुहल जागे झाले व त्याने लेखकाचा तपास केला– तो लेखक चक्क एक ठेकेदार निघाला !– मालरॉच्या व त्याच्या गोष्टी झाल्या आणि माल्रॉने त्या ठेकेदाराला ' पॅरिस स्वच्छते ' चे कार्य सोपविले ! – हे कार्य खरोखर फार अवघड होते. अनेक जीर्णशीर्ण स्मारकाचे दगड ठिसूळ झाले होते त्यांना साफ करायला स्पज वापरले, नतर ब्रशेस ! – पाण्याची सतत धार सोडलेली आणि कोणतेही डिटर्जंट

न वापरता हे महत्वाचे !– नॉत्रदाम (Notre Dame) आणि म्युझियम साफ स्वच्छ करणे किती कष्टाचे, धोक्याचे होते !–

सार्वजनिक स्मारके स्वच्छ होत असता, माल्रॉने हुकूम काढला की खाजगी घरेही स्वच्छ झाली पाहिजेत, व त्याचा खर्च घरमालकाने सोसला पाहिजे !

पॅरिसमधे खानदानी उच्चभ्रूचा समाज अजूनही पूर्वीच्याच दिमाखात व अहंकारात राहतात जगात इतके शिष्ट, अहमन्य, एटिकेट्चे कसोशीने व काटेकोरपणे पालन करणारे लोक क्वचितच असतील त्याची दुनियाही वेगळी व ते सामान्यात मिसळत नाहीत. यांच्यात पार्ट्या होत असतात व त्यावेळी केवळ 'वरच्या' थरातील स्त्री पुरुष बोलावले जातात– मात्र एक महत्वाची गोष्ट, एक महत्वाची व श्रेष्ठ फ्रेंच परंपरा, हे अरिस्टोक्रॅट लोक ही पाळतात, ती म्हणजे पार्टीच्या वेळी किंवा कोणत्याही उत्सव समारंभाच्या वेळी, पहिला खुर्चीचा मान अॅकडॅमी फ्रान्सेस्च्या सदस्याला जगप्रसिध्द फ्रेंच साहित्यिकाला, कलावंताला !– बुध्दिवंताचा, कलेचा मान राखणे ही ती सर्व श्रेष्ठ फ्रेंच परंपरा होय– याच्या नंतर परराष्ट्रातले राजदूत किंवा फ्रान्समधले मोठमोठे सन्मानित, ग्रॅन्ड क्रॉस ऑफ् द लीजन ऑफ् हॉनर धारण करणारे !– खुर्चीवर बसविण्याच्या क्रमात यजमानीण बाई कडून जराशी सुध्दा चूक होता कामा नये ! नाहीतर साऱ्या पार्टीचा विचका झालाच म्हणून समजा ! चुकीच्या क्रमांकावर बसविलेला गेला पाहुणा आपली नाराजी पार्टीत, भोजन समारंभात भाग न घेता तसाच निघून जातो किंवा खुर्चीवर बसल्यावर त्याच्यापुढील जेवण्याच्या प्लेटस तो उपड्या करून ठेवतो,व जेवणाला शिवतच नाही !– केवळ पॅरिसमधेच असे घडते असे नव्हे तर परदेशातील फ्रेंच एम्बसीच्या पार्टीच्या वेळी सुध्दा असे प्रसंग घडलेले आहेत

या पार्ट्यांची किंवा 'सोशल मीटस्' ची काही नमुनेदार खास ठेच वैशिष्टे आहेत– पुरूषांना आणि स्त्रियांना भोजनोत्तर वेगवेगळ्या हॉल मधे काही वेळ एकत्र बसण्याची व्यवस्था इतर युरोपियन शहरातून, विशेषत लंडनमधे केली जाते ती प्रथा पॅरिसमधे नाही. भोजनोत्तर सुध्दा स्त्री पुरूष संमिश्र जमावाने मिसळतात आणखी एक अत्यन्त महत्वाचा कडक नियम म्हणजे कुणाही पाहुण्या स्त्रीने वा पुरूषाने

'पावडर रूम' किंवा 'ईजिंग आऊट' 'टॉयलेट' कुठे आहे, असे विचारायचे नसते! असे विचारणे म्हणजे साऱ्या फ्रेंच सभ्यतेचा, संस्कृतीचा, शिष्टाचाराचा खून आहे! दुसरी एक गोष्ट– अत्यन्त घसट असल्याखेरीज नावाने हाक मारायची नाही! केवळ 'मॉसिय्' म्हणून हाक मारायची! फ्रेंच लोकात एक जुना संकेत आहे की तुम्हाला कोणी हाक मारली तर समजावे तो वनिया आहे! (आणि व्यापाऱ्याला अरिस्टोक्रॅटिक पार्टयांना बोलवीत नाहीत!)– आणि, अमेरिकेप्रमाणे पहिल्या (ख्रिश्चन नाव) नावाने हाक मारणे (जॉन, ह्युबर्ट, अलबर्ट किंवा आपल्याकडील नावे सखाराम, जनार्दन, गोविंद, इ.) या सारखे तर शिष्टाचार भंगाचे महत्पाप नाही!– सगळे स्त्री पुरूष एकमेकाकडे पहायला लागतील की हे काय अघोर वागणे!–

मध्यमवर्गापुढे मात्र आर्थिक समस्या बिकट आहे. कदाचित त्यासाठी स्त्रियांनी टॅक्सीड्रायव्हर्सचा धंदा पत्करला असावा. पॅरिस ही अजूनही स्वच्छंद, आनंदी, विलासी नगरी आहे, (जगातील लोकांना पॅरिस अजूनही आकर्षित करते)– पण, महिन्याच्या दोन्ही तारखांचा मेळ कसा बसवावा या विवंचनेत असणाऱ्या मध्यमवर्गास हे विलास परवडत नाहीत. अर्थात पॅरिसचे एक वैशिष्ट हे की प्रवाशाला खिशाला परवडेल अशा स्तरावर तो पॅरिसमधे राहू शकतो लंडनमधे येणाऱ्या प्रवाशाचा खिसा गरम असला तरच त्याला लंडन पाहाता येईल, काही दिवस राहाता येईल

पॅरिसच्या शाळांबद्दल व त्यात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांबद्दल गौरवाने लिहिता येईल मुलांनी आपली जबाबदारी ओळखली पाहिजे, अभ्यास केला पाहिजे हे लहानपणापासून त्यांच्या मनावर बिंबवले जाते.पुष्कळसे विद्यार्थी झटून अभ्यास करीत असतात काबाडकष्ट करून पैसे मिळवितात व सुट्यासाठी साठवितात. लंडनमधे 'पब्लिक स्कूल्स' सोडल्यास अन्य शाळांतून ही जबाबदारीची जाणीव आढळून येत नाही. 'कॉम्प्रिहेन्सिव्ह स्कूल्स' बद्दल तर बोलायलाच नको, कारण त्या शाळा म्हणजे ग्रामर, टेक्निकल व मॉडर्न शाळांची खिचडी आहे. (खाजगी संस्था एक ही कॉम्प्रिहेन्सिव्ह शाळा चालवीत नाहीत. अर्थात् लंडनमधे इंजिनियरिंग, मेडिकल कॉलेजेस संपूर्णपणे सरकारची आहेत, आणि

'कॅपिटेशन फी' हा भारतातला चमत्कार युरोपात अथवा पाश्चिमात्य राष्ट्रात नाही ') शाळातून अध्यापन ही आस्थेने व कळकळीने दिले जाते– कारण शिकवण्या नाहीत. लंडनमधेही 'शिकवण्या' ही संस्था नाही मी 'ट्यूशन' हा शब्द वापरला असता एका इंग्रज हेडमास्तरला तो समजला नाही मी त्याला समजून सांगितले तेव्हा तो म्हणाला, 'ओऽ, यू मीन प्रायव्हेट कोचिंग !–' विद्यार्थ्यांने नापास होणे हे लांछन समजले जाते– मात्र युनिव्हर्सिटीत प्रवेश केला की चित्र पालटते ! अगदी ढिला कारभार ! वर्गात या, नका येऊ ! – भारतातील 'तक्षशीला' विश्वविद्यालय सोडल्यास, पॅरिसमधले सॉर्बॉन ही १२५३ मधे स्थापन झालेली जगातील चौथी जुनी युनिव्हर्सिटी आहे बोलोना १०५० मधे, सालामान्का १२१८ मधे आणि पादुआ १२२२ मधे स्थापन झालेली अन्य जुनी विश्वविद्यालये आहे सॉर्बॉन् मधे हजारोंनी विद्यार्थ्यांची संख्या वाढल्यावर तिचे विकेन्द्रीकरण करण्यात आले फॅकल्टी ऑफ लेटर्स नान्तेरेला हलवली , फॅकल्टी ऑफ सायन्स ऑर्डसेला, बिझिनेस स्कूल (Hauter Etudes Commercials) जॉये-एन-जोसासला आणि पॉलीटेकनिक इन्स्टिटयूट पॅलेसो (Palaiseau) ला– या विभागणीचा एक दुष्परिणाम मात्र असा झाला की सॉर्बॉनची मूळची जागा जगप्रसिध्द लॅटिन क्वार्टर्स, त्याची शान गेली. लॅटिन क्वार्टर आता पूर्वीप्रमाणे विद्यार्थ्यांनी गजबजलेले दिसणार नाही उच्च पांढरपेशा वर्गासाठी ते एक स्वस्तातले शॉपिंग सेंटर बनले आहे.

पॅरिसमधे वर्तमानपत्रे पोस्टाने येतात ; 'वर्तमानपत्राची पोरे' ही संस्था इथे नाही (त्यामुळे पहाटे जरा शांत वाटते.) आणि म्हणून रविवारी पेपर बंद– पॅरिसमधे (Pneumatique) न्यूमॅटिक मेल सर्व्हिस आहे,ही सर्व्हिस शीघ्रातीशीघ्र आहे पॅरिसच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात तास दोन तासात पत्र पोचलेच पाहिजे ! या पार्श्वभूमीवर आमच्या भारताची पोस्टल सर्व्हिस किती केविलवाणी आहे ! भोपाळमधे मी स्थानीय पत्र (लोकल), महावीरनगर या भागात पाठविले– ते पत्र आमच्या मित्राला बरोबर तेराव्या दिवशी मिळाले. तो मित्र ते पत्र घेऊनच माझेकडे आला होता. सुदैवाने त्या पोस्टकार्डावर मालवीयनगरचा (मी राहातो तो भाग)छप्पा व महावीरनगर पोस्टाचा छप्पा होता.

ते पोस्टकार्ड घेऊन मी पोस्ट खात्याच्या मुख्याकडे गेलो– हा अधिकारी आय. ए. एस. केडरचा असतो. मी त्याला सहज विचारले, 'इतक्या उशीरा गावातल्या गावात पत्र मिळते याबद्दल मी पोस्टखात्यावर फिर्याद करू शकतो का ?' त्याला पोस्टल मॅन्युअल दाखविले ! पोस्टखाते कशालाच जबाबदार नाही ! – मात्र भारतात १५ पैशात (१९८६ मे) श्रीनगर ते कन्याकुमारी पत्र जाते ही एक मोठी उपलब्धि आहे ,

पॅरिस हे 'ग्रीन' हिरवेगार शहर आहे. झाडानी समृध्द असे दुसरे शहर जगात नाही ! पेव्हमेन्टवरच केवळ ८५००० झाडे आहेत ! पॅरिस मधली झाडे सरळसोट वर अशोकवृक्षाप्रमाणे किंवा सुरूच्या झाडाप्रमाणे जाणारी असतात फळाची झाडे मात्र लावायची नाहीत , कारण एखादे फळ पडुन पादचाऱ्याला दुखापत व्हायची! पॅरिसमधे वाहतुकीची समस्या जगातल्या अन्य मोठ्या शहराप्रमाणे आहे पण, मुंबई इतकी ती समस्या भीषण नाही. टॅक्सी लवकर मिळतात मला विमानतळावर पधरा मिनिटात टॅक्सी मिळाली , व ड्रायव्हर महिला होती आमच्या बरोबरीच्या अमेरिकन माणसाने धूम्रपान सुरु करताच, टॅक्सी उभी करून करड्या आवाजात धूम्रपान करू नका म्हणून सांगितले, कारण, ती 'अँलजिक् ऑ तॅंबाक' होती

लंडनमधे १० डाऊनिंग स्ट्रीट घरापुढे बघ्याची नेहमी गर्दी असते. डाऊनिंग स्ट्रीट हा एक बोळ आहे, व त्यात केवळ ११ घरे आहेत, उजवीकडले दहाव्या नंबरचे घर इंग्लंडच्या पतप्रधानाचे आहे. ते वालपोलच्या काळापासून (वालपोल सन १७२१ ते १७४२ प्राईम मिनिस्टर, होता.) तशीच कीर्ती (Rue du Faubourg St Honore) (रू दयू फॉबर्ग सेन्त ऑनरे) वर ५५ नंबरचे एलायसी पॅलेस आहे, फ्रान्सच्या अध्यक्षाचे निवासस्थान म्हणून ते प्रसिध्द आहे द गॉल तिथेच राहायचा- त्याच्यापूर्वीचे मार्शल मॅक्मॅहॉन पासून (१८७४ मधे) सोळा राष्ट्राध्यक्ष तिथेच राहात होते. या स्थानाचा इतिहास मनोरंजक आहे. चौदाव्या शतकाच्या प्रारंभी हेन्रीलुई द ला तु ऽ ऽ दॉवरग्ने (Henri Louis de La Tour d' Auvergne) या एव्हरेच्या सरदाराने बांधला असे म्हणतात. त्याच्या मृत्यूनंतर तो राजवाडा सुप्रसिद्ध मादाम द पाम्पादॉर या १४ व्या लुईच्या (रखेलीने) अंगवस्त्राने विकत घेतला. तो प्रासाद चांगला

सुसज्ज करून तिने तो राजाला स्वत च्या मरणोत्तर देऊन टाकला राजाने तावडतोब तो एका व्यापाऱ्याला विकला. व्यापारीच तो ! त्याने काही वर्षांनी भरमसाट फायदा घेऊन राजालाच पुन: विकला प्रिन्स जोआकिम मुरात (ज्याने नेपालियनच्या बहिणीशी, कॅरोलिनशी लग्न केले होते, इथे राहिला होता काही दिवस नेपोलियन पण त्या राजवाड्यात राहिला होता वॉटर्लूनंतर नेपोलियनने राज्यत्याग केला तो इथूनच. राजवाड्यात एक Salle des Fetes (त्याला द स्टेशन असेही म्हणतात) नावाचा प्रचण्ड हॉल आहे दहाहजार माणसे नृत्य करू शकतात. एक खोली अगदी सुरक्षित ठेवली गेली आहे. त्या खोलीला प्रेमाने सॅलॉडार्जा (Salra d' Arjent) म्हणतात. या खोलीतून प्रिन्स लुई नेपोलियनने (जो पुढे तिसरा नेपोलियन म्हणून बादशहा झाला) राजकीय कारस्थान (Coup) रचले होते या राजवाड्यात " मन्कीज् पॅलेस " म्हणून खूप काचा असलेला हॉल होता तो त्या वास्तूचे सौंदर्य बिघडवून टाकी. म्हणून १९४० त अध्यक्ष व्हिन्सेन्ट ऑरिओलने त्याचे रुपातर केले द गॉलने या राजवाड्याचे विलासखान्यातून रुपातर करून कार्यस्थल केले. शेकडोशे अधिकारी इथे काम करतात.

पॅरिस हे जगातले फॅशन्स्‌चे शहर समजले जाते व ती किर्ती योग्यच आहे. जगातल्या फॅशन्सचे उगमस्थान म्हणजे पॅरिस – पॅरिसमधे फॅशन्सना उगम देणारी निरनिराळी सहाशे फॅशनगृहे आहे असे म्हणतात त्यातील सुप्रसिद्ध म्हणजे गिव्हेन्शी.बलान्चिआगा,डियोर, मार्क बोहान, यीव्ह सेन्ट लॉरॉन आणि कौरेगेस (Givenchy, Balenciaga, Dior, Mare Bohan, Yues St, haurent and Oeurrages)– आजची फॅशन उद्या असेलच असे नाही. फॅशन कोणती लोकप्रिय होईल व कोणती नाही हे सागणेही अवघड आहे – पॅरिसच फॅशन केंद्र का व्हावे ? कारण तिथे सौंदर्य व कला याची अभिरुची, जाण असणारे लोक आहेत फॅशन्सना आश्रय देणारे सुसस्कृत सपन्न वर्ग होता, त्यामुळे कारागीराना उत्तेजन मिळाले असावे.

पॅरिसच्या रेस्तॉरॉमधे जेवण घेणे आनद असतो. पाहुण्याना फ्रेंच लोक जेवायला घरी बोलवायचे नाहीत रेस्तॉरॉत घेऊन जातील. पॅरीशियन आपले घर म्हणजे अगदी " प्रायव्हेट " समजतात (पण,

उपनगरातील बायका, पुरूष कामाला गेले म्हणजे चक्क ' बाहेरख्याली ' चा ' कॉलगर्ल ' चा धंदा करतात अशी ओरड आहे.) पॅरिशियन लोक खाना म्हणजे गंभीर गोष्ट समजतात चवीने जेवले पाहिजे, सगळ्या पदार्थांचा आस्वाद घेतला पाहिजे. जेवताना गप्पाष्टके झोडणे त्यांना आवडत नाही. इटालियन्स याच्या उलट. जेवतील भरपूर पण गप्पाही मारतील.

पॅरिसला एक व्यक्तित्व आहे हे टवटवीत आहे, जन्मजात सौंदर्याने नटलेली रमणी असावी असे पॅरिस आहे. अजुनही जगातील सौंदर्याचे कलेचे, विलासाचे ते केंद्र आहे, विद्वत्तेला तिथे मान आहे, कलेची बूज आहे – जगात भारत जसे अध्यात्माचे केन्द्र आहे तसे पॅरिस हे क्रान्ती व सौंदर्य, कला, साहित्य यांचे केंद्र आहे, व हेच त्याचे आकर्षण आहे

# विएल्की

'विएल्की' हे शहराचे नाव नाही. 'विएल्की' चा अर्थ महान — तो एक पोलीश शब्द आहे 'विएल्की या नावाचे एक अतिभव्य ऑपेराहाऊस आहे जगात इतके मोठे ऑपेराहाऊस नाही १९६५ साली त्याचा उद्घाटन समारंभ झाला या ऑपेरा हाऊसला बांधायला त्या काळी १७–१८ कोटी रुपये खर्च आला होता. त्यात अती विशाल तीन कोलोनेड्स (कोरीव स्तंभ) आहेत, कित्येक मैल संगमरवरी आणि सुबक रंगीबेरंगी फ्लोअर आहे वीस एलिव्हेटर्स आहेत, एक अती विस्तृत रंगमंच आहे दर्शनी पडद्याचे वजन १२ टन आहे, तीन तीन टन वजनाची कित्येक झुंबरे आहेत. १३०० लोकांचा नोकरवर्ग आहे, आणि वीज पुरवठा इतका आहे की, साठ हजार वस्तीच्या शहराला पुरेल !—

दुसऱ्या महायुद्धात नाझींनी इथले ऑपेराहाऊस उध्वस्त केले होते; त्याच जागी पोलीशांनी हे नवीन, जगात नाव होईल असे, ऑपेराहाऊस बांधले येवढा मोठा ऑपेराहॉल बांधायची काही जरूरी नव्हती, पण हा हॉल म्हणजे एक प्रतीक. पोलीशांच्या देशभक्तीचे त्यागाचे व श्रमाचे! या विएल्की द्वारा पोलीश लोकांना जगाला आणि पोलीश लोकांना हे सांगायचे आहे, आम्हाला हे दाखवून द्यायचे पोलीश लोक चिरडले जाणार नाहीत, सभ्यता व संस्कृती ही एका वर्गाची मक्तेदारी नाही. त्यात सर्वांचा भाग आहे सर्वांना मुक्त आहे श्रीमंतापासून गरीब शेतकऱ्यापर्यंत !—

खरोखरच 'विएल्की' हे पोलीश लोकांच्या जाज्वल्य देशाभिमानाचे, त्यागाचे, श्रमाचे आपल्या परंपरेच्या व संस्कृतीच्या अभिमानाचे व एकजुटीचे प्रतिक आहे ! कारण 'वॉरसा' ही पोलंडची राजधानी. दुसऱ्या महायुद्धात, जर्मन नाझींनी जमीनदोस्त केली होती, अक्षरश: जमीनदोस्त ! वॉरसाला पाहण्यासारखे काय आहे ? पॅरिसला नात्रदाम, आयफेल, टॉवर इ. लंडनला लंडन टॉवर, व्हेनिसमध्ये सॅन मार्को तसे वॉरसात काय ? वॉरसात पाहाण्यासारखे वारसाच ! फीनीक्स पक्षी

चितेतून अधिक तेजस्वी होवून बाहेर पडतो – वॉरसाचे तसेच ! झाले वॉरसा शहर हे शौर्याची गाथा आहे.

दुसऱ्या महायुद्धाची सुरवात १ सप्टेंबर १९३९ रोजी जर्मन गिधाडांनी वॉरसावर सुरवात केल्यापासून झाली वॉरसावर सर्व शक्तीनिशी हल्ला झाला होता 'म्युनिकपॅक्ट' करून चेंबरलेलेनने हिटलरला उत्तेजनच दिले होते वॉरसा बेसावध होते, गाफील होते. दोन आठवडे पोलीश लढले, नतर त्याना शरण यावे लागले. ५०,००० पोलीश ठार झाले ! जर्मन बॉम्बहल्ले आकाशातून आणि जमिनीवरून रणगाडे – तरी दोन आठवडे वॉरसाच्या लोकानी झुंज दिली हे पाहुन हिटलर चवताळला ! त्याला वाटले होते वॉरसा घेणे म्हणजे "वॉक ओव्हर !" एकेक इमारत जमिनीसपाट करायला सुरवात केली. सुदर आणि प्रचण्ड इमारती कोसळू लागल्या त्यातले कामाचे कागदपत्र, डॉक्युमेन्टस ठेवून बाकीचे जाळून टाकले.

विस्तुला नदीच्या पलीकडे आपली गुलामी करण्यास उपयोगी पडतील अशा दोन लाख पोलीशाना जिवत ठेऊन राहायला लावायचा जर्मनचा बेत बाकी सर्व पोलीशाची कत्तल ! युद्ध सुरू झाले त्यावेळी वॉरसाची लोकसख्या तेरा लाख तीस हजार होती, त्यापैकी पाच लाख ज्यू होते – जर्मन नाझी पुढाऱ्यानी हिटलरला सल्ला दिला, कशाला दोन लाख पोलीश जिवत ठेवायचे? सर्वांनाच कठस्नान! सपूर्ण नि:पात! जनमेजयाच्या सर्पसत्राप्रमाणे पोलीश सत्र ! ऑश्विझ्, टेब्रिल्न्का इ. ठिकाणी मनुष्यहत्याच्या राक्षसी फॅक्टरीज् उघडण्यात आल्या मानवी इतिहासात या सैतानीकृत्याला तोड नाही ! या नरमेद यज्ञात तीन लाखाहून अधिक पोलीश मेले बहुतेक ज्यूच होते

तीन वर्षानतर, जर्मन नाझीचा सतत प्रतिकार करीत अदमासे पन्नास हजार वॉरसातल्या ज्युनी बड उभारले ! असेही मरायचे तर निदान लढून तरी मरु ! जिकलो तर जगता येईल, पण असेच राहिलो तर मरणच ! हा त्याचा विचार – त्या बडाचे नाव सुप्रसिद्ध मे १९४३ तला घेट्टो उठाव ! त्याने इतिहासातली रक्ताची पाने भरली आहेत ज्यूची सरसकट कत्तल करण्यात आली त्याच्याबरोबर बिगर ज्यूचीही कत्तल झाली या कत्तलीतले शेवटले पर्व तर अखिल मानवजातीला काळीमा

आणणारे आहे इतके ते बीभत्स, क्रूर, निर्दयतेची परिसीमा गाठणारे पर्व दुसरे नसेल ! १ ऑगस्ट १९४४ रोजी "वॉरसा इन्सरक्शन" नाझींनी सुरु केले नागरिकाना रेशनमध्ये महिन्याची फक्त दोन किलो धान्य! नाझीनी अतीम हत्यार उपसले होते! जिवत राहिलेली ज्यू अक्षरश. भूमिगत राहात–, आणि भूमिगत गटारीमधून एकमेकाशी सपर्क साधीत- आणि पुन्हा बड पुकारले गेले, ते (६३) त्रेसष्ट दिवस टिकले वॉरसा-मधील पोलीश नागरिक जीवनमरणाचा लढा देत असता याच काळात स्टॅलिनच्या रेडआर्मीच्या 'क्रॅक' डिव्हिजन्स विस्तुला नदीच्या किनारी तळ देऊन होते. त्यानी मनात आणले असते तर एक दोन दिवसातच नाझी सैन्याला त्यानी हुसकून लावले असते परतु, स्टॅलिनची सुप्त इच्छाच होती की युद्धानतर एक दुर्बल, सपूर्ण उध्वस्त झालेले पोलंड शिल्लक राहावे. नाझीनी आपल्या क्रूरतेस जागून बडाळी चिरडून टाकली, आणि मग हिटलरनें ठरविले, वॉरसा पृथ्वीवरुनच नष्ट करायचे! त्याचे हुकूम होते,"वारसा शहर हे नुसती सपाट जमीन दिसायला पाहिजे. एकही ज्यू किंवा नॉन्ज्यू पोल जिवत राहाता कामा नये एकही इमारत उभी असता कामा नये!' अडीच लाख ज्यू व बिगर ज्यूना जागच्या जागीच ठार केले , दोन लाख लोकाना भट्टीत टाकले इमारती पाडल्या म्हणजे वीट न वीट व प्रत्येक दगड काढला ! माणसे राहात असताना घराना आगी लावल्या–या सर्व हकीगतीचे रेकॉर्ड अकराहजार पृष्ठाचे आहे १९४५ साली जर्मनानी शरणागती पत्करली त्यावेळेस ते हस्तगत केले गेले विस्तुला नदीवरचे पुल नष्ट केले, झाडाना मुळापासून उपटून काढले–युध्द सपले तेव्हा वॉरसा भूमीवर फक्त १५ माणसे जिवत आढळली !

युद्धकाळात जे पोल लडन वगैरे ठिकाणी आश्रयाला गेले होते व जे गुप्तपणे पोलडमध्येच राहात होते ते वॉरसाच्या पुनर्वसनाचा सतत विचार करीत–या बहाद्दर वीरानी आशा सोडली नाही. पुष्कळ जण त्याना रोमॅन्टिक-स्वप्नाळू समजत-पोलड मुक्त होताच, पोल पुढाऱ्याना काय आढळले ? गॅस नाही, वीज नाही, कोळसा नाही, वाहन नाही ! आणि ४०-५० हजार प्रेते उघड्यावर पडलेली, त्याना पुरायचे होते ! तेव्हा त्यानी ठरविले, वॉरसाच्या पुनर्बांधणीचा विचारशुध्द वेडेपणाचा आहे.

त्या ऐवजी लॉड्झ किंवा कारकॉऊला राजधानी बनवावी । पण वॉर-साच्या नागरिकानी (जे परत आले होते व जे जिवत होते) ठाम प्रतिज्ञा केली की वॉरसाच राजधानी राहील. आम्ही तिला सपूर्ण पूर्वीसारखी बाधून काढू ! पोलड १९४५ साली मुक्त झाल्यानतर दोनच महिन्यानी वॉरसाचे बाधकाम सुरु करण्यात आले । नवीन बाधणी सुरु करण्यापूर्वी प्रथम त्याना प्रचण्ड पाडापाडीच करावी लागली, कारण काही इमारती ज्या नाझीच्या तडाख्यातून वाचल्या होत्या त्याचे रूप भेसूर झाले होते व त्या राहण्यालायक नव्हत्या

वॉरसाचे बाधकाम सुरू झाले आहे हे कळताच, वॉरसातून नाझी कचाटयातून निसटून देशात ठिकठिकाणी विखुरलेले तीस हजार नागरिक स्वयस्फूर्तीने परत आले आणि विना मोबदला काम सुरू केले. आणखी एक महत्वाचा प्रश्न असा होता की वॉरसाची पुनर्रचना करायची, नव्या पॅटर्नचे शहर बाधायचे की पूर्वी होते तसेच ? यावर पुष्कळ खल झाला; आणि शेवटी स्वाभिमान जिंकला वॉरसा पूर्वी जसे होते तसेच बांधायचे। पूर्वी सिनेमा जिथे होता तिथेच बाधायचा, आणि जसा होता तसाच बाधायचा। ज्या ज्या इमारती पूर्वी ज्या स्थानावर होत्या त्याच स्थानावर त्या बाधायच्या व त्या पूर्वी ज्या पद्धतीच्या आकाराच्या होत्या तशाच बाधायच्या! कोणताही फरक करता कामा नये। वॉरसात येणाण्या जुन्या नागरिकाला वाटले पाहिजे, 'अरे वॉरसा आहे तसेच आहे । काहीसुद्धा बदल झाला नाही ।' तो ज्या रस्त्यावर, ज्या घरात रहात होता तो रस्ता, ते घर त्याला अचूक व जसेच्या तसे सापडले पाहिजे ।

वॉरसाच्या नागरिकानी जो चमत्कार घडवून आणला तो हाच ! वारसाने केलेला चमत्कार तो हाच ।—

पोलंडच्या इतिहासात बळी जाण्याचे प्रसग पोलंडवर तीनदा तरी येवून गेले होते ! १२३ वर्षात विस्मृतीत गाडले गेलेले पोलंड १९१८ साली पुनश्च जगाच्या नकाशावर आले । १९४५ चा सर्वनाश हा चौथा प्रसंग होता — आणि अत्यंत खडतर होता इमारत पूर्ववत बांधली गेल्यानंतर, आत एक फोटो टांगण्यात येई. ज्या जागेवर इमारत बाधली गेली ती बाधण्यापूर्वी कशी होती, म्हणजे पुढील पिढयांना कायमचे स्मरण व सतत स्फूर्ती !—

वॉरसा पूर्ववत बाधायचे खरे पण अत्यन्त बिकट समस्या म्हणजे पूर्वी होते तरी कसे ? शहराचा प्लॅन शिल्लकच नव्हता शहराच्या जागी एक ओसाड भूभाग तेवढा दिसत होता, चर्च कसे होते, दवाखाने कसे होते, कुठे होते हे कळल्याखेरीज वॉरसा पूर्ववत कसे होणार ? कुणाजवळचे जुने प्लॅन्स नव्हते. नाझींनी सर्वच नष्ट केले होते !) शोध चालू झाला सुदैवाने, त्याना वॉरसा शहराची पेन्टिग्ज सापडली कॅनॅलेत्तो या सुप्रसिद्ध इटालियन (यानेच व्हेनिसची अप्रतिम पेन्टिग्ज् केली आहेत) चित्रकाराचा पुतण्या (अठराव्या शतका-तला) बर्नार्दो उत्तम चित्रकार होता वॉरसाला येण्यापूर्वी तो जर्मनीत होता. त्याने सपूर्ण वॉरसा शहराचे चित्रण अनेक पेन्टिग्ज् मधून केली होती राजवाडे, चौक चर्चेस, रस्ते इ इ. खूपशी चित्रे त्याने काढली होती एखाद्या आर्किटेक्टने डिझाईन काढावा इतका बारीकसारीक तपशील त्या चित्रात होता – वॉरसाची पुनश्च उभारणी करणाऱ्या देशभक्तानी ती सगळी चित्रे जमवून त्यावर हुकूम शहराच्या बाधणीला सुरवात केली – कम्युनिस्ट राजवटीने याला प्रोत्साहनच दिले, कारण नागरिकात त्या योगे आपल्या संस्कृतीचा, इतिहासाचा अभिमान वाटतो, व आपल्या सस्कृतीचे, इतिहासाचे उज्वल प्रेम वाटल्याखेरीज वर्तमानाला आणि भविष्याला अर्थ राहात नाही ! रशियासुद्धा 'इव्हान द टेरिबल्' 'पीटर द ग्रेट' ची स्तुतीस्तोत्रे गातोच ! – वॉर-साच्या कारागीरानी ईंजिनियर्सनी कारागीरानी,पेन्टिग्ज् पूढे ठेऊन प्रत्येक वीट, दगड, मोजून मापून बसविला हे प्रचण्ड कार्य करायला 'मजूर' भाडोत्री नव्हते ! वॉरसाचे नागरिक होते आपल्या कामाचा ते पैसाही घेत नव्हते खुद्द मिनिस्टर्स लोक संपूर्ण रविवार मजूरी करायला येत-बॅन्का उघडल्या गेल्या होत्या, पण बॅन्केतला पैसा ठेवायला 'सेफ' नव्हती, आणि इमारतच नव्हती ! लहानशा पडवीत बॅन्केतले कर्मचारी बसलेले असत एक बदूकधारी गार्ड असे. कर्मचाऱ्या (बहुतेक स्त्रियाच) च्या मागे टेबल असे, त्यावर नाण्याच्या चळती व नोटांची पुडकी !

या कठोर परिश्रमातून, देशाभिमानातून वॉरसा निर्माण झाले-- नवे वॉरसा, पण जुनेच !--

वारसाची आजची लोकसंख्या वीस लाख असावी त्यामुळे घराचा प्रश्न इतर राजधान्याप्रमाणे किंवा मोठ्या शहराप्रमाणे आहेच. पण भारताने जसा झुग्गी झोपडीपट्टी निर्माण करून हा प्रश्न सोडविला (राजभवनच्या भिंतीला टेकून झोपड्या आहेत मंत्र्याच्या बंगल्याला लागून झोपड्या आहेत- ना गव्हर्नरवर परिणाम, ना मंत्र्यावर! श्रीमंत व दैन्य दोन्ही एकाच ठिकाणी कसे सुखा-समाधानात नांदतात !)

गेल्या चाळीस वर्षात वॉरसा (आणि पोलंड) बरेच वाढले आहे ; तरीपण त्या मानाने गुन्हे कमी आहेत वाहतुकीची समस्या ज्वलंत नाही; कारण मोटारगाड्या कमी आहेत बसर्सव्हिस अत्यंत स्वस्त आहे पोलंड कम्युनिस्ट देश आहे हे विसरता कामा नये. वॉरसाला बसर्सव्हिस रात्रभर चालते भारतातल्या कोणत्याच शहरात, किंबा लंडनलाही ही सोय नाही.

वॉरसाचा पुष्कळसा पैसा, रेव्हेन्यूच्या ६८ टक्के, शिक्षणावर खर्च होतो हे आणखी एक वैशिष्ट! पन्नास-साठ वर्षापूर्वी पोलंडमधे शिक्षणाची दुर्दशा होती १९३८ मधे शे २५ लोकसंख्या निरक्षर होती आज साक्षरता शतप्रतिशत आहे!

वॉरसामधले रस्ते रुंद आहेत आणि स्वच्छ आहेत , अतीशय स्वच्छ आहेत! जर्मनीची आठवण व्हावी. लंडन-पॅरिसमधे बघायलाच नको !- वॉरसातल्या लोकांना फुलांचे भारी वेड– १९४५ नंतर नव्या वॉरसात पहिले दुकान कोणते उघडले गेले असेल तर फुलवाल्याचे !-- वर्फ वृष्टी प्रचण्ड झाली तर वृष्टी थांबताच रस्ते साफ करायला लोक येतात. पाळीव जनावरे (कुत्री, मांजरे) क्वचितच दिसतात-- एखादे झाड वाळले आणि पडायला आले तर ते उखडून त्याच्या जागी दुसरे मोठे वाढीस लागलेले रोपटे (लहानसे झाडच) तावडतोब लावतात , व हे कार्य म्हाताऱ्या बायका करतात ! वॉरसात एक मोठा रस्ता आहे. त्याचे नाव रुट्कोव्स्कीएगो– त्यावर खूप दुकाने आहेत हा रस्ता वाहतुकीला दुपारी १ ते संध्याकाळी ७ पर्यन्त संपूर्ण बंद असतो! – नागरिकांनी आरामात हिंडावे म्हणून !–

पोलंडला दोन संकटांनी नेहमी ग्रस्त केलेले आहेत हवा आणि शेजारी! – पोलंडचे शेजारी म्हणजे जर्मन आणि रशिया– जर्मनीविषयी पोल लोकांत खोलवर, कधीही नाहीसा न होणारा तिरस्कार (व्देषच

म्हणायला हवे) आहे. पूर्व जर्मनी आणि पश्चिम जर्मनी यात ते फरक करित नाहीत. जर्मनी हा त्याचा शत्रू नं. १, आणि ते रास्तच आहे !– रशिया विषयी पोल लोकाना प्रेम मुळीच नाही, पण वरुन मित्रभाव दाखवावा लागतो– दक्षिण पोलंडमध्ये अजुनही रशियाचे छोटेसे सैन्य आहे !– जर्मनीकडून पुन्हा हल्ला झाला तर रशियाच आपल्या मदतीला धावून येईल (किंवा रशियाला बोलावल्याखेरीज गत्यतर नाही) यामुळे रशियाशी सलोखा दाखवावा लागतो, पण मनातून रशियाबद्दलही तिरस्कारच- एक छोटासा विनोद वाचण्यात आला-वॉरसामधला एक नागरिक दुसऱ्यानागरिकाला म्हणतो, 'अरे बघ, रशियन अतरिक्ष वैमानिक चंद्रावर पोचले !' त्यावर तो दुसरा नागरिक उध्दारतो, काय ? सगळेच्या सगळे! –

पण शौर्याला, देशाभिमानाला, त्यागाला एक लाछनपण आहे पोलंड मुक्त झाल्यानतर, ज्या ज्यूनी लाखोंच्या सख्येने नाझी विरुध्द लढून प्राणार्पण केले होते, त्या ज्यूची पोलंडमधून या ना त्या कारणाने हकालपट्टी ! ज्यूचा छळ 'ज्यू' म्हणून नव्हे तर 'झियोनिस्ट' म्हणून ! 'अॅन्टी सेमिटिझम्' ची भावना हजार वर्षापासून ख्रिश्चन पोलिशांच्या मनात आहे यामुळेच ज्यूचे स्वतत्र राष्ट्र बनल्यामुळे जगातील सर्व ज्यूना हायसे वाटले. आणि दुसरी गोष्ट वॉरसा हे कम्युनिस्ट राष्ट्राची राजधानी आहे व वॉरसात हिंडत असता हे पदोपदी जाणवते. तिथे लोकशाही नाही. कदाचित रशियावर अवलबून राहावे लागत असल्याने पोलंड कम्युनिस्ट राहिले असाव, कारण रशियाची मिठी त्याचे भोवती आहेच.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
९६९
३०/७/८६

# आडिस अबाबा

इथियोपियात शिक्षक पाहिजे अशी जाहिरात टाईम्स ऑफ् इन्डियात वाचताच मी अर्ज तर टाकून दिला होता, पण इथियोपिया जगाच्या पाठीवर आहे तरी कुठे हे माझ्यासारख्या मुबईच्या एम. ए बी टी झालेल्या (त्यावेळी मी लडनचा एम ए नव्हतो. लडनला मी आडिस अबावाहून १९५३ साली गेलो) लेखक म्हणून शेखी मिरविणाऱ्या माझ्या-सारख्यास माहीत नव्हते मला वाटले दक्षिण अमेरिकेत किंवा उत्तर आफ्रिकेत असावे माझ्या एका स्नेह्याने मला सागितले की इथियोपिया म्हणजेच अबीसीनीया आता अबीसीनीया हे नाव चागलेच गाजलेले ! १९३५ साली फॅसिस्ट इटलीने गिळकृत केलेला देश ! ख्रिश्चनाचे माहेर-घर असलेल्या रोमच्या पोपने मुसोलिनीच्या या कृत्यावर पसतीचा शिक्कामोर्बत केलेले ! त्यावेळेच्या लीग ऑफ् नेशन्सपुढे इथियोपियाच्या बादशहाने फिर्याद माडली असता इटलीच्या कृत्याला मूक समती देणारी येशू ख्रिस्ताच्या शिकवणुकीची पालन करणारी राष्ट्रे मूग गिळून स्वस्थ बसली होती ! आश्चर्य असे की अबीसीनीया सुद्धा ख्रिश्चन राष्ट्रच होते! 'रानटी लोकाना सुधरविण्याचे, सुसस्कृत ख्रिश्चन कार्य' मुसोलिनीस करायच होते, हे त्यामुळे लीग ऑफ नेशन्सने मान्य केले होते ! पुढे दुसरे महायुद्ध १९३९ साली सुरु झाले. नाझी हिटलरने पोलड त्यासाली गिळं-कृत केला. १९४० साली फ्रान्स गिळंकृत केला फॅसिस्ट इटलीने हिटलरची दोस्ती केली आणि इटलीने दुसऱ्या महायुद्धात पदार्पण केले त्यामुळे अमेरिका इग्लडला मुसोलिनीवर स्वारी करणे भाग होते, आणि म्हणून १९४१ साली अबीसीनीया 'दोस्त राष्ट्रानी' इटलीच्या कब्जातून सोड-वून स्वतत्र केला (दोस्त राष्ट्रे म्हणजे अमेरिका, इंग्लड व रशिया शत्रू राष्ट्रे म्हणजे जर्मनी, इटली व जपान ही नावे आपण दिलेली नव्हती. 'दोस्तराष्ट्रानीच' स्वतःस तसे म्हणवून घेतले) !

हा इतिहास माझ्या डोळ्यासमोर आला मुबईला ॲम्बॅसॅडर हॉटेलात मुलाखतीला बोलावले होते. एक इथियोपियन आटो (म्हणजे श्रीयुत) ऑगबॉग्झू आणि एक कॅनॉडियन मिस्टर थॉमस हे मुलाखत घेत

होते. माझी निवड होऊन दरमहा ९०० रुपये पगारावर माझ्याशी प्रथम तीन वर्षांचा करार झाला– तो काळ भारताच्या स्वातंत्र्याच्या अरुणोदयाचा होता. इथियोपियात नोकरी मिळून मी जाणार हे कळताच माझ्या वडिलांनी 'जाऊ नको 'म्हणुन सांगितले. मुख्यकारण म्हणजे माझी अशक्त पत्नी व तीन अतीशय लहान मुले माझ्या पत्नीवर दोन वर्षे सतत उपचार होत होते. ॲलोपॅथिक, होमिओपॅथिक, आयुर्वेदिक आणि शेवटी 'जडीबुटी ' – जडीबुटी घेण्यासाठी मे च्या कडक उन्हात नाशिक रोडच्या पाच बंगले सॅनिटोरियम मधल्या प्रशस्त बंगल्यात राहात असलेला मी, भुसावळ जवळील तिबोरे या खेडेगावी, उष्णतामान १२१ फॅरेनहीट, गेलो होतो. त्या जडीबुटीवाल्याने कुठले तरी औषध देऊन माझ्या पत्नीला केवळ गाईच्या दुधावर राहायला सांगितले होते त्याप्रमाणे एक वर्षभर पत्नी केवळ गाईच्या दुधावर राहिली होती, व ती अशक्त झाली होती की सगळी हाडे मोजून घ्यावी– काय करावे ? शेवटी मी ठरविले, जुगार खेळून पाहू या– आणि आजारी पत्नी व तीन लहान मुलाना घेऊन, इथियोपियन सरकारने खास दोन विमाने आणली होती त्यातून आम्ही एकदर ४८ भारतीय शिक्षक गेलो ! दुसऱ्या बॅचमधे आणखी आले. आम्ही गेलो तेव्हा आम्ही तीन महाराष्ट्रीय होतो, काही तामीळ हिंदु, बाकी बहुतेक तामीळ ख्रिश्चन होते.

त्यावेळी इथियोपिया इटलीच्या पंजातून सुटून काही वर्षेच झाली होती, त्यामुळे इटलीच्या अस्तित्वाची स्मारके जागोजाग होती. पहिली गोष्ट म्हणजे इटालियन लोकांनी आडिस अबाबा शहर आधुनिक पद्धतीने बांधले. शेकडोशे घरे बांधलीं, मोठमोठ्या सुंदर इमारती ऑफिसेससाठी, शाळांसाठी, दवाखान्यासाठी बांधल्या. आम्ही " काझा पॉप्युलरे " मधे राहात होतो काझा पॉप्युलारे म्हणजे जनता क्वार्टर्स दोन बेडरूम्स, एक डायनिंग कम सिटींग हॉल, सैंपाकघर व टॉयलेट – बाथरूम – बहुतेक शिक्षक इकडेच राहात. शहरातला सुंदर भाग पियाझा हा चौक होता – तिथेही इटालियन लोकांनी सुंदर चित्रपटगृहे, रेस्तॉरां, बॅन्कांच्या इमारती बांधल्या. आता त्यांची नावे वेगळीच असतील. आडिस अबावा शहरात आम्ही आलो तेव्हा शेकडोशे इटालियन्स होते, फक्त पुरूष, स्त्रिया नाहीत! – मला एकाने सांगितले,

# आडिस अबाबा

इथियोपियात शिक्षक पाहिजे अशी जाहिरात टाईम्स ऑफ् इन्डियात वाचताच मी अर्ज तर टाकून दिला होता, पण इथियोपिया जगाच्या पाठीवर आहे तरी कुठे हे माझ्यासारख्या मुबईच्या एम. ए बी टी झालेल्या (त्यावेळी मी लडनचा एम ए नव्हतो. लडनला मी आडिस अबाबाहून १९५३ साली गेलो) लेखक म्हणून शेखी मिरविणाऱ्या माझ्या-सारख्यास माहीत नव्हते मला वाटले दक्षिण अमेरिकेत किंवा उत्तर आफ्रिकेत असावे माझ्या एका स्नेह्याने मला सांगितले की इथियोपिया म्हणजेच अबीसीनीया आता अबीसीनीया हे नाव चागलेच गाजलेले ! १९३५ साली फॅसिस्ट इटलीने गिळकृत केलेला देश ! ख्रिश्चनाचे माहेर-घर असलेल्या रोमच्या पोपने मुसोलिनीच्या या कृत्यावर पसतीचा शिक्कामोर्तब केलेले ! त्यावेळेच्या लीग ऑफ् नेशन्सपुढे इथियोपियाच्या बादशहाने फिर्याद माडली असता इटलीच्या कृत्याला मूक समती देणारी येशू ख्रिस्ताच्या शिकवणुकीची पालन करणारी राष्ट्रे मूग गिळून स्वस्थ बसली होती ! आश्चर्य असे की अबीसीनीया सुद्धा ख्रिश्चन राष्ट्रच होते! ' रानटी लोकाना सुधरविण्याचे, सुसस्कृत ख्रिश्चन कार्य ' मुसोलिनीस करायच होते, हे त्यामुळे लीग ऑफ नेशन्सने मान्य केले होते ! पुढे दुसरे महायुद्ध १९३९ साली सुरु झाले. नाझी हिटलरने पोलड त्यासाली गिळ-कृत केला १९४० साली फ्रान्स गिळकृत केला फॅसिस्ट इटलीने हिटलरची दोस्ती केली आणि इटलीने दुसऱ्या महायुद्धात पदार्पण केले त्यामुळे अमेरिका इग्लडला मुसोलिनीवर स्वारी करणे भाग होते, आणि म्हणून १९४१ साली अबीसीनीया ' दोस्त राष्ट्रानी ' इटलीच्या कब्जातून सोड-वून स्वतत्र केला (दोस्त राष्ट्रे म्हणजे अमेरिका, इग्लड व रशिया शत्रू राष्ट्रे म्हणजे जर्मनी, इटली व जपान ही नावे आपण दिलेली नव्हती. ' दोस्तराष्ट्रानीच ' स्वत स तसे म्हणवून घेतले) !

हा इतिहास माझ्या डोळ्यासमोर आला. मुबईला अॅम्बॅसॅडर हॉटेलात मुलाखतीला बोलावले होते एक इथियोपियन आटो (म्हणजे श्रीयुत) ऑगबॅग्झू आणि एक कॅनॉडियन मिस्टर थॉमस हे मुलाखत घेत

होते माझी निवड होऊन दरमहा ९०० रुपये पगारावर माझ्याशी प्रथम तीन वर्षांचा करार झाला– तो काळ भारताच्या स्वातंत्र्याच्या अरुणोदयाचा होता इथियोपियात नोकरी मिळून मी जाणार हे कळताच माझ्या वडिलानी ' जाऊ नको 'म्हणुन सागितले. मुख्यकारण म्हणजे माझी अशक्त पत्नी व तीन अतीशय लहान मुले माझ्या पत्नीवर दोन वर्षे सतत उपचार होत होते अॅलोपॅथिक, होमिओपॅथिक, आयुर्वेदिक आणि शेवटी ' जडीबुटी ' – जडीबुटी घेण्यासाठी मे च्या कडक उन्हात नाशिक रोडच्या पाच बगले सॅनिटोरियम मधल्या प्रशस्त बगल्यात राहात असलेला मी, भुसावळ जवळील तिबोरे या खेडेगावी, उष्णतामान १२१ फॅरेनहीट, गेलो होतो. त्या जडीबुटीवाल्याने कुठले तरी औषध देऊन माझ्या पत्नीला केवळ गाईच्या दुधावर राहायला सागितले होते त्याप्रमाणे एक वर्षभर पत्नी केवळ गाईच्या दुधावर राहिली होती, व ती अशक्त झाली होती की सगळी हाडे मोजून घ्यावी– काय करावे ? शेवटी मी ठरविले, जुगार खेळून पाहू या– आणि आजारी पत्नी व तीन लहान मुलाना घेऊन, इथियोपियन सरकारने खास दोन विमाने आणली होती त्यातून आम्ही एकदर ४८ भारतीय शिक्षक गेलो ! दुसऱ्या बॅचमधे आणखी आले. आम्ही गेलो तेव्हा आम्ही तीन महाराष्ट्रीय होतो, काही तामीळ हिंदु, बाकी बहुतेक तामीळ ख्रिश्चन होते.

त्यावेळी इथियोपिया इटलीच्या पजातून सुटून काही वर्षेच झाली होती, त्यामुळे इटलीच्या अस्तित्वाची स्मारके जागोजाग होती पहिली गोष्ट म्हणजे इटालियन लोकानी आडिस अबाबा शहर आधुनिक पद्धतीने बाधले शेकडोशे घरे बाधली, मोठमोठ्या सुदर इमारती ऑफिसेससाठी, शाळासाठी, दवाखान्यासाठी बाधल्या. आम्ही " काझा पॉप्युलरे " मधे राहात होतो काझा पॉप्युलारे म्हणजे जनता क्वार्टर्स दोन बेडरूम्स, एक डायनिग कम सिटीग हॉल, सैपाकघर व टॉयलेट – बाथरूम – बहुतेक शिक्षक इकडेच राहात. शहरातला सुदर भाग पियाझा हा चौक होता – तिथेही इटालियन लोकानी सुदर चित्रपटगृहे, रेस्तॉरा, बॅन्काच्या इमारती बाधल्या. आता त्याची नावे वेगळीच असतील. आडिस अबाबा शहरात आम्ही आलो तेव्हा शेकडोशे इटालियन्स होते, फक्त पुरूष, स्त्रिया नाहीत! – मला एकाने सागितले,

पुरूष इटालियन्सचा राहायला परवानगी देण्यात बादशहाचे अंतस्थ हेतु अनेक होते एकतर कुशल कारागीर, मोटर ड्रायव्हर्स, मेकॅनिक्स खूप मिळाले. काही डॉक्टर्स सुद्धा होते डॉक्टर्सना " प्रोफेसर " म्हणत. हे डॉक्टर्स ४–५ वर्षानंतर निघून गेले, कारण त्यांना बायका इटलीतून आणण्याची परवानगी नव्हती स्थानीय इथियोपियन बायकाशी ते लग्न करू शकत होते ते ज्याना मानवले नाही ते निघून गेले, पण शेकडोशे इटालियन्स इथियोपियातच राहिले. इटलीत बेकारी भरपूर ! – तिथे जाऊन काय करणार ? इथे पगार चागला, खायला भरपूर – या इटालियन लोकानी इथल्या हबशी स्त्रियाशी लग्ने केली बादशहाचा अंतस्थ हेतु हा पण असावा, की इटालियन लोकापासून नेटिव्ह स्त्रियाना मुले झाली तर ती सुद्धा मेकॅनिक, ड्रायव्हर्स इ बनतील, आणि तसे होतच होते इटालियन लोकाना दुसऱ्या नोकऱ्या मात्र मिळत नव्हत्या शाळेत नाही, शासनात नाही ! ते " पराजित " म्हणूनच वागविले जात.

इटालियन लोकानी इथियोपियात चमत्कार घडवून आणले होते त्याना इथे कायमचे राहायचे होते. त्यानी अक्षरश शेकडो मैल लाब सुदर रस्ते बाधले इटालियन लोक बाधकामात हुषार हे त्यावेळी दिसून आले जगलातून रस्ते बाधले व शहर एकमेकाशी जोडली विमानतळ बाधले. हारार, जिम्मा इत्यादी अन्तर्भागात विमानतळ बाधले तेव्हा, पाच वर्षे आपण सिंहासनच्युत होतो याचे दु ख बादशहाला झाले असले तरी देशात झालेली सुधारणा पाहून आनदही झाला असेल.

फक्त रेल्वे मात्र इटालियन लोक बाधू शकले नाहीत १९१७ साली फ्रेंचानी एक रेल्वे लाईन आडिस अबाबा ते फ्रेंच कॉलनीतील लाल-समुद्रावरील बदर जिबूटी इथपर्यन्त बाधली होती. या रेल्वेमार्गाने " लितोरिना " नावाची छोटीसी रेल्वेगाडी चालायची. रात्रीचा प्रवास रेल्वे कधी करीत नसत, कारण धोका असे आता गेल्या ४०–४५ वर्षात पुष्कळच वाढ झाली असावी.

आम्ही गेलो तेव्हा फ्रेंच लोक एक फ्रेंच माध्यमातून शाळा चालवीत. इटालीयन आक्रमणापूर्वीही या फ्रेंच शाळा होत्या, आणि 'अपर इथियोपियन जन्ट्री' फ्रेंचच बोलत. खुद्द बादशहा अत्यंत सफाईदार फ्रेंच

बोलत असे. (इग्रजी पण थोडस बोलत असे) ; आणि कॅबिनेट मिनि-स्टर्स व अन्य अधिकारी उत्कृष्ट फ्रेंच बोलत, हळूहळू ते इग्रजी पण बोलू लागले होते. आणि आमच्याशी ते इंग्रजीतूनच बोलत. फ्रेंच शाळेबरोबर 'जनरल विन्गेट' हे इग्लडने चालविलेले हायस्कूल होते. जनरल वुई-न्गेट हा इग्रज ज्यू–दुसऱ्या महायुद्धात इथियोपिया मुक्त करण्यात इग्लंड तर्फे लढला होता, व धारातीर्थी पडला होता त्याच्या स्मरणार्थ इग्लडने ही शाळा काढली होती बाकी सर्व शाळा सरकारी मालकीच्या. आम्ही गेलो तेव्हा आमच्या प्रमाणेच इग्रज, स्वीडीश, अमेरिकन, कॅनेडियन टीचर्सची भरती झाली होती स्वीडीश फार नव्हते व ते लवकरच निघून गेले. काही इजिप्शीयन आणि सूडानीज् पण होते पाश्चात्य शिक्षकाना भारतीय आणि ईजिप्शियन सूडानीज शिक्षकाच्या दुप्पट तिप्पट पगार असे, भारतीय शिक्षकाला त्याकाळी जास्तीत जास्त ईथियोपियन ५०० डॉलर्स (अदमासे हजार रुपये) दरमहा मिळत. पाश्चात्याना ६०० ते १५००,२००० डॉलर्स पर्यन्त मिळत भारतीय शिक्षक मेहनती, प्रामा-णिक आणि गरजू हे सर्वांना माहित होते.आणि ते तसेच वागविले जात. मी एकदा सिनेमा पहायला गेलो असता, एका मुलाने त्याचे पण तिकिट माझ्या पैशाने काढायला सांगितले मला त्याच्या उद्धटतेचे आश्चर्य वाटले मी विचारले 'तुजजवळ पैसे नाहीत तर पाहू नकोस ! मजजवळ का मागतोस ?' तो मुलगा आणखी औद्धत्याने म्हणाला गेटोच (म्हणजे 'सर' किंवा 'साहेब' 'श्रीयुत'), तुमच्या देशात तुम्हाला खायला मिळत नाही म्हणून आम्ही तुम्हाला आम्ही इथे चागल्या पगारावर नोकरी दिली !– तुम्हाला आमच्यासाठी अर्धा डॉलर खर्च करता येत नाही ?–'

पाश्चात्य लोक सुद्धा भारतीयाकडे तुच्छतेने पाहात एका अमे-रिकेने प्रश्नपत्रिका काढली होती; त्यात "True or "False" मध्ये वाक्ये लिहिली होती. त्यात एक असे होते– "All Indians are not dirty"--

या दुर्दशेला कारण आम्ही पण होतो, आज ज्याप्रमाणे अरब देशात जाण्यासाठी अहमहमिका सुरु आहे (आता ओसरली आहे)त्याप्रमाणे त्या काळात इथियोपिया, केनिया, टांगानिका, इथे जाण्यात अहमहिका असे.

एक भारतीय दुसऱ्या भारतीय विरुद्ध चुगल्या करणार–त्यात साऊथ इंडियन्सचा गट फार प्रबळ–एक ख्रिश्चन केरलाईट वर्गात इथियोपियन मुलाना म्हणाला होता, "तुमचा बादशहा किती चांगला !–आमची भेट घेतली (आम्ही सर्व शिक्षक जेव्हा आडिस अबाबाला प्रथम गेलो तेव्हा आम्हा सर्वांना बादशहाने त्याच्या राजवाड्यात भेटायला बोलावले होते)–आमच्या देशात आमचे प्राईम मिनिस्टर आमच्याकडे पाहात सुद्धा नाहीत !–" भारत स्वतंत्र होऊन केवळ दोन महिनेच झाले होते; हिंदुमुसलमानाचे दंगे त्यावेळी भारतात उसळले होते. व हजारोंची कत्तल होत होती (हे आम्हाला बी बी सी. वरून आडिस अबाबाला कळायचे) नेहरूना श्वास घ्यायला फुरसत नव्हती ! आणि हे माहीत असूनही आमच्या भारतीयाने असे बोलावे !

परदेशात आमच्या भारतीयात एक जूट नाही, देशप्रेम नाही या गोष्टी त्रिखंडात प्रवास करून, अनेक ठिकाणी वास्तव्य करून माझे मत मी बनविले आहे–१९७६ मधे पुन्हा एकदा (पत्नीसह) युरोपच्या दौऱ्यावर गेलो होतो–लंडनमधे १९७७ मध्यापर्यंत राहिलो होतो– माझे मत बदलावे असे मला वाटत नाही-भारतीय एकमेकाना तुच्छ, हीन समजतात आपण दुसऱ्या भारतीयापेक्षा श्रेष्ठ आहोत अशी धारणा त्याची असते.

इथियोपियात मला पहिली गोष्ट कोणती आढळली असेल, अनुभवाला आली असेल तर त्याचे देशप्रेम !– आम्ही आडिस अबाबाला जाऊन एक दोन महिनेच झाले होते. आम्ही काझा पॉप्युलारे भागात राहात होतो आमच्याच शाळेत मिस्टर मार्खम नावाचा एक अगदी तरुण कॅनॅडियन होता त्याचे नुकतेच लग्न झाले होते. आमच्या शेजारीच ते जोडपे राहायचे एक दिवस शाळा सुटल्यानंतर तो मला म्हणाला, "मला नोटीस मिळाली आहे मी २४ तासाचे आत इथियोपिया सोडला पाहिजे असा हुकूम आहे –" त्याप्रमाणे दुसरे दिवशी तो विमानाने गेला ही !–

आम्हा सर्वांना फारच आश्चर्य वाटले होते. तो एक उत्तम शिक्षक होता–काय झाले असावे की तडकाफडकी त्याला शाळेतून काढले, एवढेच नव्हे तर देशातूनच हकालपट्टी केली ? पुष्कळ दिवसांनी एका कॅनॅडियन-

नेच मला सांगितले– मार्खम एक दिवस वर्गात म्हणाला की तुमचा देश तर आमच्यावर अवलंबून आहे. आम्ही तुमच्या बादशहाला लक्षावधी डॉलर्स देतो ! – वर्गातील मुलानी हे सारे चुपचाप ऐकले आणि थेट व्हाईस मिनिस्टर ऑफ् एज्यूकेशन (मिनिस्टर खुद्द बादशहा !) कडे खबर पोचली– मुलाच्या बोलण्यावर विश्वास ठेवून, शहानिशा न करता, मार्खमची उचलबागडी !– तीच गोष्ट डिक्रूझ या गोवॅनीज ख्रिश्चनाची. आमच्या भिंतीला लागूनच त्याचाही फ्लॅट होता. अगण एकच- डिक्रूझ व त्याची बायको, दोघेही फार चागल्या स्वभावाची. डिक्रूझचा स्वभाव निष्कपटी, पण फार स्पष्ट वक्ता– तो जन्माने कॅथोलिक, पण एकदर ख्रिश्चनधर्माविषयी व ख्रिश्चनाविषयी तो खूपच स्पष्ट बोलायचा. त्याचीही उचलबागडी क्षणार्धात झाली (तो मुळीच हताश झाला नाही. विलक्षण आनदाने त्याने इथियोपिया सोडले ही गोष्ट वेगळी)– इथियोपियन लोकाच्या देशभक्तीची अनेक स्मारके आडिस अबाबाला आहेत. इटालियन्सचा अमल पाच सहा वर्षे होता, पण इटालियन्सना त्यानी कधीही चैन पडू दिली नाही. आडिस अबाबाला मोठ्या चौकात इटालियन गव्हर्नर ग्रॅझियानीच्या अध्यक्षतेखाली सभा सुरु असता एका इथियोपियनने ग्रॅझियानीवर बॉम्ब फेकला व ग्रॅझियानी तिथल्या तिथे खतम् झाला. याचा मोबदला फॅसिस्ट इटालियनानी अत्यत क्रूरतेने घेतला अक्षरश हजारो माणसाच्या कत्तली झाल्या, पण इथियोपियन्स डगमगले नाहीत. आणखी एक आमच्यावेळचे उदाहरण गाधी या गुजराथी शिक्षकाचे तो आमच्याही अगोदर आलेला होता तो बी. एस् सी. होता. उत्तम शिक्षक म्हणून त्याची गणना होती पगार ही पाचशे डॉलर्स– स्वभावाने मनमिळाऊ त्याने काय हिकमत लढविली एका फॉरिन कपनीशी सधान बाधून ७५० डॉलर्स (१५०० रुपये) पगारावर नोकरी स्वीकारली, पण परमिट (इथियोपियात राहण्याचे) देणे हे त्या कपनीच्या अधिकारातले नव्हते गांधीने बनियावृत्ती लढवली इथियोपियन सरकारशी, शिक्षणखात्याशी करार केला, व इथियोपियाल यायचे परमिट मिळविले भारतात सुटीमध्ये गेला, परत आला व काही दिवसानी कपनीत गेला. शिक्षणखात्याला हे कळताच, त्यांनी गृहखात्याला कळविले व २४ तासात गाधीला इथियोपिया सोडावा लागला

आम्ही येण्यापुर्वी भारतीयाची वस्ती तशी इथे पुष्कळ होती, पण बहुतेक काठेवाडचे. (सौराष्ट्राचे) हिंदु व जैन बनिये आणि मुसलमान बोहरी– तुरळक चरोतर मधले पटेल (ज्या भागातले सरदार वल्लभभाई होते)– या वनियाचा जम चागला बसलेला होता आमच्या वेळी. जे.प्रेमजी ही फार प्रसिद्ध फर्म होती.

हे बनिये आणि बोहरी, याची बायकामुले उत्कृष्ट भाषा (इथियो-पियातली राष्ट्र आणि राज्यभाषा) बोलत. बनिया मुलासाठी प्रायमरी चौथीपर्यन्त गुजराथी शाळा गुजराथी लोकानी चालविलेली होती. या सर्वांजवळ कायम पर्मिटस् होती, आणि बहुतेक सर्व व्यापारी चांगला पैसा कमवीत– काही दुर्दैवीपण निघत– या गुजराथ्यासाठी तिथें गुजराथी खाणावळ पण होती-भारतीय पध्दतीच्या जेवणास ते पदार्थ व जे मसाले लागत ते सर्व इथे मिळत

काही वर्षानतर भारत सरकारने महात्मा गाधी हॉस्पिटल उघडले आणि काही भारतीय कारखानदाराच्या सहकार्याने डिरेडावा (इथली हवा कमी थड, व पुष्कळ भारतीय व्यापारी इथे राहात.) या शहरी उघडले होते. आणि भारतीयाची पुष्कळ आवक जावक १९७५ पर्यंत होती असे मला १९७७ साली लडनला अडिस अबाबा इथे वर्षोनुवर्ष राहाणारे, पूर्वी जे. प्रेमजीचे मॅनेजर असणारे पण जे. प्रेमजी मेल्यानंतर स्वतत्र धदा सुरुकरणारे श्री. शान्तिलाल शहा (जैन) भेटले होते त्यानी सागितले होते

इथियोपिया हे अत्यंत जुने, प्राचीन राष्ट्र आहे. याचा उल्लेख 'जुन्या करारात' (ओल्ड बायबल) 'जिनीसस' दुसऱ्या प्रकरणात १३ व्या परिच्छेदात आहे. ('And the name of the second river is Gi–hom–, the same is it that cowpasseth the whole land of E - thi - o - pia) या राष्ट्रात पूर्वी ज्यू पुष्कळ असले पाहिजेत, कारण याचा पहिला बादशहा 'पहिला मेनेलिक' हा ज्यूचा सुप्रसिद्ध राजा सालोमन याच्यापासून शीबाच्या राणीला झालेला पुत्र होय (ही शीबाची राणी अत्यत सुदर होती ; व ती कुमारी होती–तिला सालोमनने कसे वश केले इ इ. ची रोमॅन्टिक कथा प्रसिद्ध आहे) तेव्हा तिथे ज्यू असले पाहिजेत.

आजच्या घटकेला इथियोपियात ज्यू लोकसंख्येच्या शे. एक सुद्धा नाहीत. १९८३ चे जे आकडे उपलब्ध आहेत (तेही 'एस्टीमेटेड' म्हणजे अदाजे) त्यानुसार इथियोपियाची लोकसंख्या ३,३६७९,६०० आहे क्षेत्रफळ ४,७२,४०० चौरस मैल उर्फ १२,२३,६०० चौरस कि मी. आहे अडिस अबाबाची १९८२ साली (अदाजे) लोकसख्या १४,०८,१०० होती– आमच्या वेळी ती दोनतीन लाख असावी (खर म्हणजे जनगणना कधी झाली असेल असे वाटत नाही)– इथियोपियात ५७% ऑर्थडॉक्स ख्रिश्चन, ३१% मुसलमान, ११% वन्यजाती (डनाकिल वगैरे–ह्या जाती अगदी आपल्याकडील वन्य जातीप्रमाणे राहातात, स्त्रियांच्या छातीवर वस्त्र नसते-पण या जाती फार क्रूर असतात, परकीयाचा प्रवेश होऊ देत नाहीत– (परक्या पुरुषाची लिंगे कापून कमरेला माळ बाधतात अशी दतकथा आहे पण त्या बहुधा दतकथाच असाव्या) या देशात ख्रिस्ती धर्माचा प्रवेश चौथ्या शतकापासून झाला असला तरी इस्लामची लाट शतकानतर झपाटचाने येथेही पसरली होती, आणि पुष्कळसे इथियो-पियन्स मुस्लीम झाले असले पाहिजेत इस्लामचा प्रसार पूर्व आफ्रिकेतील केनिया, युगाडा, टागानिका, झाझीबार इथे आला होता केनियाची सरहद्द व इथियोपियाची लागूनच आहे, त्याचप्रमाणे सुडान व ईजिप्त इथे तर इस्लामचा प्रभाव जास्त, ते देशद्वोही ईथियोपियाला लागूनच–परतु, पाश्चात्य राष्ट्रे जगभर व्यापारासाठी, साम्राज्यासाठी हिंडू लागले, बरोबर मिशनरी असणारच–त्यानी झपाट्याने ख्रिस्ती धर्माचा प्रसार केला ज्योमो केन्याटाचा विनोद प्रसिद्धच आहे. तो म्हणाला होता, 'हे ख्रिश्चन बायबल घेऊन आमच्या देशात आले बायबल आमच्या हातात राहीले, देश त्याच्या हातात–'

इथियोपिया हे राष्ट्र तसे दळणवळणापासून लाबच, त्यामुळे आधुनिक सस्कृतीचा व सुधारणेचा स्पर्श व प्रभाव बादशहा हैले सेलासी पासूनच जास्त झाला असे म्हणावे लागेल–तत्पूर्वी बादशहा थिओडोरच्या वेळी इग्रज लोक आले होते. ही गोष्ट १९ व्या शतकातली. १९ व्या शतकाच्या अखेरीस बादशहा मेनेलिक दुसरा, गादीवर आला. १८८९ ते १९१३ त्याच्या राणीचे नाव एम्प्रेस तैतू–तिने अडिस अबाबा शहर स्थापन केले व नावही तिनेच दिले. तत्पूर्वी राजधानी गोडर इथे होती.

गोंडर प्रांत जगलाचा आहे आणि इथुनच नाईलला उगम होतो, व हिला व्हिक्टोरीया लेकमधून उगम पावलेली व्हाईट नाईल येऊन मिळते, तेव्हा नाईल नदीचा खरा उगम इथियोपिया देशातूनच आहे असे इथियोपियन समजतात. आपण ज्या प्रमाणे गगानदीवर प्रेम करतो तसेच हबशी लोक नाईल नदीवर प्रेम करतात ते नाईल नदीला 'अब्वय' म्हणतात.

दुसऱ्या मेनेलिक नंतर झौडीती राणी होती, नतर लिज् यासू होता. लिज् यासूच्या स्वारीत हैलेसेलासी अनवाणी पाठीमागे चालत असल्याचे पुष्कळ फोटो मी पाहिले आहेत त्यावेळी हैलेसेलासी हारार प्रान्ताचा 'रास' म्हणजे संस्थानिक होता डॉ. जॉनसन् या सुविख्यात इंग्लिश ज्ञान-सागराला 'रास' ही संज्ञा माहीत होती, कारण त्याने 'रास एलास,' (रासेलस हा मराठी उच्चार) लिहिले होते रासेलस पुस्तक डॉ. जॉनसन्ने, आपल्या आईच्या उत्तर क्रियेला पैसे नव्हते म्हणून दहा दिवसातच लिहिले व केवळ चाळीस पौण्डाना विकले–हैलेसेलासी त्यावेळी रास तफारी माकोनेन म्हणत असत लिज् (लिज् याचा अर्थ मुलगा) यासूचा कल इस्लामकडे वळत होता. कोणी म्हणतात त्याने इस्लाम धर्म स्विकारलाही होता–पण सरदारानी त्याला राज्यत्याग करायला लावले व डावपेच लढवून रासतफारी माकोनेन बादशहा बनला ही घटना १९२८-२९ च्या सुमारास घडली.

राज्यावर बसल्यानतर बादशहाने रास तफारी माकोनेन नावाचा त्याग केला व हैलेसेलासी प्रतापी सूर्य निगुसे निगुस्त (म्हणजे राज्याचा राजा) हे नवीन धारण केले. जगात हैलेसेलासी हा हबाशी राजा, अबीसीनीयाचा राजा म्हणून ओळखू जाऊ लागला–पण इथियोपियन लोकाना अबीसीनीया हे देशाचे नाव व आपल्या 'हबशी' म्हटलेले मुळीच आवडत नाही ते अत्यत संतापतील, चिडतील. कारण 'हवश्' चा अर्थ 'सकर' 'मिश्र' असा होतो, 'हवशी' म्हणजे सकरित लोक व अबीसीनीया म्हणजे सकरित लोकाचा देश. हे नाव अरबानी या देशाला व लोकाना दिलेले होते व अजूनही अरब बोलताना 'हबश्' च म्हणतात.

इथियोपियन लोक निग्रॉईड रक्ताचे यात काहीच सशय नाही या देशात अम्हारा व तिगरी या दोन जाती मुख्य; हैलेसेलासी अम्हारा

जातीचा, त्यामुळे अम्हेरिक ही राष्ट्रभाषा बनली (काहीच्या मते तिगरी लोक संख्येने जास्त होते ) आणि बादशहा कट्टर ख्रिश्चन (ऑर्थडॉक्स) असल्यामुळे देशाचा धर्मही ख्रिश्चन झाला वर्षातून ज्या सुट्या देण्यात येतात, त्या ख्रिश्चन धर्माच्याच आहेत.(फक्त ' ग्रॅझियानीडे, ' ' टिकम्त (बादशहाचा राज्यरोहण दिन) आणि बादशहाचा जन्मदिन या निधर्मी सुट्या त्यावेळी होत्या. आता काही कमी झाल्या असतील आणि काहींची भर पडली असेल

जो ज्या जातीचा असेल त्या जातीचे त्या भाषेला नाव असते, फक्त शेवटी ' इन्ञा ' जोडायचे. उदा अम्हरा–अम्हारिन्ञा, गाला–गालिन्या गुरागी–गुरागीन्ञा. (गुरागी ही फार हलकी जात समजली जाते व कुणाचा अपमान करायचा असला तर ' गुरागी ' त्याला म्हणायचे ! ) अशा एकदर १४ जाती व १४ भाषा आहेत–शिवाय अरबाची अरेबिक निराळीच !–

हैलेसेलासी द फर्स्ट (अॅन्ड द लास्ट ही म्हटला पाहिजे) सिंहासनावर बसला त्यावेळी राज्यरोहणाची वर्णने जी उपलब्ध आहेत व जे फोटो उपलब्ध आहेत त्यावरून इराणच्या शहाने २५०० वर्षे पुरी झाल्यानतर द पीकॉक थ्रोनचा जो समारंभ केला त्याची आठवण येते शिवाजी महाराजांनी आपल्या राज्यरोहण प्रसंगी जो महोत्सव केला त्याची ही आठवण येते

हैलेसेलसीने जग पाहिले होते आपले लोक रानटी आहेत, जगली आहेत, हे त्याने ओळखले होते (लग्नाच्या प्रसगी कच्चे मास अत्यंत आवडीने खात असतात मी एका विद्यार्थिनीच्या लग्नाला गेलो असता मला अत्यंत आग्रहाने कच्चे मास खायला लावले, तत्पूर्वी, मधापासून ' तज् ' नावाची दारु तयार करतात ती प्यायला दिली होती ' तज् ' आणि ' तल्ला ' ही त्या देशात तयार होणारी मद्ये–अर्थात् हे सर्व अचकट खाणे पिणे झाल्यानतर माझी अवस्था कशी झाली असेल ते सांगायला नकोच ! ) शिवाय, आपले राष्ट्र पुढे यावे, मानसन्मानाने नाव कमवावे ही त्याची महत्वाकाक्षा होती शासनासाठी सुशिक्षित लोक पाहिजे होतेच. त्याचे बहुतेक साक्षीदार फ्रेंच शाळा कॉलेजातून शिकलेले होते. हैलेसेलासीने इंग्रजीचे महत्व जाणले आप–

त्याशी एकनिष्ठ राहील असा सुशिक्षित वर्गही त्याला तयार करायचा होता–मेनेलिक द सेकंड ही शाळा खूप जुनी म्हणजे १९०५ पासून उघडली गेली होती तफारी माकोनेन शाळा १९२५ साली, हैलेसेलासी फर्स्ट सेकण्डरी स्कूल २३ जुलै १९४५ रोजी जनरल विन्गेट हायस्कूल १९४६ साली, १९४३ त एक टेक्निकल स्कूल उघडले, तिथे एक भारतीय मुसलमान व एक पारशी नोकरीला होते. कमर्शियल स्कूल १९४५ साली, टीचर ट्रेनिंग १९४६ साली, मधाने अलम् १९२९ साली, आणी ख्रिश्चन ऑर्थडॉक्स धर्माच्या शिक्षणासाठी एक शाळा १९४४ साली. यातील बहुतेक शाळा आडिस अबाबालाच होत्या, १९४६ नतर देशाच्या आतल्या भागातही शाळा उघडल्या गेल्या, गोज्जाम, जिम्मा, इ ठिकाणी भारतीय शिक्षक आलेच होते त्याना तिथे पाठवून दिले भारतात ४० ते ६० रुपये दरमहा मिळणाऱ्या शिक्षकाना ८०० ते १००० रुपये दरमहा मिळायला लागल्यानतर ते कुठेही का जाणार नाहीत ? शिवाय



सुरू असते. भारतात मोगलाचे राज्य, आदिलशाही, इ मुसलमानी राजवटी आणि इग्रजाचे राज्य आम्ही भारतीयानीच अत्यत राजनिष्ठेने चालविले मोगलाकडून ‘किताब’ पदव्या’ मिळविण्यात जसे विलक्षण भूषण तसेच इग्रजाकडून ‘टायटल्स्’ मिळविण्यात आम्हाला केवढा गौरव वाटायचा ! – हे खरे असले तरी इथियोपियाच्या शिक्षण प्रसारात भारतीयाचे कष्ट आहेत हे मान्य करायलाच पाहिजे गोज्जाम तर १२, १५ हजार फुट उचीवर गाव होते तिथे खाण्यापिण्याला फक्त अडी व कोंबड्या आणि मास तादुळ, डाळी, भाज्या क्वचित–अशा ठिकाणी ख्रिश्चन शिक्षकानाच नेमीत ‘इडियन्स आपल्या इतकेच काळे आहेत नव्हे आपल्यापेक्षाही काळे आहेत हे इथियोपियनाना वेदनायकम्, राजमणी, मुथुस्वामी या ख्रिश्चन भारतीय शिक्षकाकडे पाहून त्याना कळले. तेव्हा त्याना खरे वाटले त्याना वाटल होते सगळेच इडियन्स ख्रिश्चन असतात आमच्या बरोबरीच्या बॅचमधे मी, आवटी, सहस्त्रबुद्धे हे तीन महाराष्ट्रीय ब्राम्हण, सुरती नावाचा पारशी, घासवालाही पारशी अंड् अहमद हा मुसलमान परमार हा गुजराथी रजपूत, महालिंगम् हा तामीळ ब्राम्हण, चेरियन हा तामीळ शे. का शर्मा हा पण तामीळ ब्राम्हण, बाकी सर्व ख्रिश्चन होते माझ्या गौरवर्णाकडे पाहून त्याना

आश्चर्य वाटे. मी इंडियन कसा ? कारण इंडियन काळे असतात ! मी त्यांना म्हणालो, इथले बनिये कुठे काळे आहेत ? तर ते खूप आश्चर्याने म्हणायचे, ' पण ते इन्डियन्स नाहीत ! ते बनिये आहेत !–'

बनिये हे इन्डियन्स ही असतात हे सुद्धा त्याना माहीत नव्हते !–

बादशहा हैलेसेलासी अत्यत धुर्त , अतीशय ' धीर ' धरणारा. वयाची (जन्म १८९२) चाळीशी आली असता अत्यंत कष्टाने, डावपेच लढून, खरा वारस लिज्यासू असता त्याला बाजूला सारून सिंहासन पटकावलेले ते १९३५ साली इटलीने खतम् केले व हैलेसैलासमीला विजनवासात पाठविले हैलेसेलासी इंग्लडमधल्या ब्रिस्टल गावी पुष्कळ वर्षे होता आणि १९३९ साली दुसरे महायुद्ध सुरू झाले नसते, इटलीने जर्मनीचा पक्ष घेतला नसता तर इथियोपिया अनेक वर्षे इटलीच्याच ताब्यात राहिला असता व केनिया, युगांडा, टांगानिका. इ. देश स्वतंत्र झाले त्यावेळी स्वतंत्र झाला असता, पण १९४१ साली हैलेसेलासी मोठ्या थाटामाटाने आपल्या सिंहासनावर पुनश्च आरूढ झाला, व ते त्याला गमवायचे नव्हते एकंदर इथियोपियान लोक अत्यत धूर्त, चाणक्ष, आतल्या गाठीचे, मनातले इतराना कधीही कळू न देणारे, वरून अत्यत नम्र, सभ्य, पण केव्हा सफाईने गळा कापतील ते न कळणारे ! ' फराचे' शी मैत्री असंभवनीय. ' फराचे ' म्हणजे परक्या देशातले लोक नोकर लोक, शाळेतील इथियोपियन मास्तर आपल्याजवळ पैसे मागतील, ते परत कधीही मिळायचे नाहीत. एकदा परत मागण्याचा मूर्खपणा माझ्याकडून घडला असता तो इथियोपियन मास्तर मला म्हणाला, ' मी उधार घेतलेच नाहीत !–' ' फराचे ' लोकावर ते सहसा विश्वास टाकणार नाहीत त्यांच्याशी दाट मैत्री असंभवनीय. दुसरी गोष्ट, प्रत्येक इथियोपियन आपल्याला भारतीयापेक्षा श्रेष्ठ समजतो. ते चक्क म्हणत, ' दीडशे वर्षे तुम्ही इंग्रजाचे गुलाम होता !– आणि आताही तुमच्या देशात खायला नाही म्हणून तुम्ही इथे येता–'

प्रत्येक इथियोपियन असे बोलतो असे नव्हे, पण तो आपल्याला इतरापेक्षा कमी मुळीच लेखत नाही, त्याच्यात यत्किंचितही हीन भावना नाही, उलट त्याच्यात विलक्षण स्वाभिमान व देशाभिमान आहे ही गोष्ट मात्र स्पष्ट आहे.

हैलेसेलासीने निरनिराळ्या राष्ट्रातील लोकाना शिक्षक, अॅडव्हायसर्स वगैरे बोलावले. पण त्याचेवर अधिकारी सतत इथियोपियनच असायचा, तसेच न्याय, लष्कर, पोलीस, गृह, इ खात्यात एकही ' फरांचे ' नव्हता–

शिक्षणाचा प्रसार झपाट्याने झाला. १९६१ मधे हैलेसेलासी युनिव्हर्सिटी स्थापन झाली. (तिचे नाव पुढे नॅशनल युनिव्हर्सिटी झाले.) १९८४ च्या सुमाराचे आकडे उपलब्ध आहेत, प्राथमिक शाळेत २१,३० ७१६ विद्यार्थी आहेत, आणि शिक्षक ३३३२९ हायस्कूलमधे ४,२७,५९७ विद्यार्थी व ९९६२ शिक्षक, टीचर ट्रेनिंग स्कूलसमधे ४६१० प्रशिक्षार्थी आणि २४० शिक्षक, उच्च शिक्षणात (१९८० चे आकडे) १४९४९ विद्यार्थी व १०८५ शिक्षक आहेत अदमासे साडेतीन कोटी लोकसंख्येच्या देशात शिक्षणाचे प्रमाण हे असे आहे. म्हणजे खूपच कमी असले तर पुष्कळ प्रगती झाली आहे असे म्हणावे लागेल.

शिवाय प्रगती म्हणजे ' जागृती ' गृहीत धरली तर इथियोपियाने खूपच आघाडी मारली असे दिसते. १९१७ साली 'बार्बेरियन रशिया' क्रान्ति करेल असे कुणास वाटले होते ?

सिंहासनारूढ झाल्यावर, आपले आसन स्थिर करण्यासाठी व विरोधकाना गप्प बसविण्यासाठी हैलेसेलासीने १९३१ साली एक औपचारिक घटना पास केली त्यानतर १९३५ ते १९४१ ईटलीच्या ताब्यात देश गेला १९५५ साली हैलेसेलासीने जुनी घटना रद्द करून नवीन राज्य घटना अमलात आणली त्या घटनेत नमूद केले की बादशहा हैलेसेलासी फर्स्ट, किंग ऑफ ज्यूडा, निगुसे निघुस्त, हा ईस्रायल राजा सालोमन व अक्सूमाईट राज्याची राणी शीबा याच्या सरळ वंशातला आहे.

हैलेसेलासी बादशहाने इथियोपियाला जगाच्या नकाशावर आणले. त्याने निरनिराळ्या राष्ट्राची मदत घेतली. अमेरिका, रशिया, इग्लड, फ्रान्स, स्वीडन, भारत, इ. इ पण कोणत्याही राष्ट्राला डोईजड होऊ दिले नाही. ईथियोपियन अधिकाऱ्याना "फरांचे" लोकानी इमाने इतबारे काम करुन मागासलेला देश पुढे आणण्यासाठी झटावे अशी असे जी

माणसे या कसोटीला उतरत नसत, त्याना हाकलून देण्यात येई. एकदा व्हाईस मिनिस्टर ऑफ एज्यूकेशन विनोदाने एका अमेरिकन अधिकाऱ्याविषयी (हा अधिकारी एज्युकेशनल अॅड्व्हायसर होता) म्हणाला "The only advice the gave me in three years was to repair the ceiling of his quarter"–भारतीय कर्मचारी यासाठीच त्याना पसत असत. पुष्कळ भारतीय शिक्षक अनेक वर्षे तिथे राहिले होते.

हैलेसेलासीने आपले राष्ट्र पुढे आणले हे खरे, पण त्याच्यात हुकूमशाहीचा सचार झाला होता–खर म्हणजे हा त्याचा स्वभाव विशेष पहिल्यापासूनच होता. त्याने आपल्या भोवती एकनिष्ठ सुशिक्षित अधिकाऱ्याची सुरक्षित फळी निर्माण केली होती त्याचे स्वतःचे सैन्य (पॅलेस आर्मी) सुद्धा होते पण वर एके ठिकाणी मी म्हटलेच आहे की ईथियोपियन लोक फार "सिक्रेटिव्ह" आतल्या गाठीचे असतात–आडिस अबावाला बहुतेक प्रमुख राष्ट्राच्या एम्बसीज होत्या. आपल्या भारतातर्फे सरदार सतसिंग हे पहिले राजदूत.सरदार सतसिंगानी आपली 'सरदारकी' चागलीच सिद्ध केली होती. ते मला म्हणाले होते, "मी बादशहाला विमानात प्रवास करीत असता (देशातल्या देशातच) आपली बेसिक शिक्षण पध्दती समजावून सागितली, व बादशहा फार प्रभावित झाले. ते लवकरच या देशात बेसिक शिक्षण पध्दती सुरु करणार आहेत!" याच्यासारखा दुसरा विनोद कोणता असेल ? त्याच्या मते आम्हा भारतीय शिक्षकाना जास्त पगार मिळायला हवा होता, व त्यासाठी पहिला तीन वर्षाचा करार सपून दुसऱ्या तीन वर्षाच्या करारासाठी जेव्हा आम्हा भारतीय शिक्षकांना पत्रे आली तेव्हा सरदार सतसिंगने सागितले, "तुम्ही उत्तर देऊ नका मी बादशहाशी या बाबतीत चर्चा करणार आहे"–मला वाटते मी व आणखी दोन व एक शिक्षकच फक्त या आश्वासना मुळे फसलो व उत्तर दिले नाही. बाकीच्यानी उत्तरे दिली व त्याचे करार 'रिन्यू' झाले, आम्हा दोघातिघाची स्थिती दयनीय झाली, कारण आमचे करार 'रिन्यू' होईनात व इथियोपियात राहाण्याची मुदत संपत आली. आम्ही सरदार सतसिंगना भेटलो तेव्हा त्यानी वाटाण्याच्या अक्षता लावल्या, शेवटी आम्ही शिक्षक ईथियोपियन अधिकाऱ्याना भेटलो, चक्क कबूल केले, की चुकलो, व आमचे करार रिन्यू झाले!

अर्थात पुष्कळ भारतीय शिक्षक पैसे मिळविण्यासाठी नोकरीच्या वेळा-व्यतिरिक्त इतर ठिकाणी कामे करीत असे करणे कराराविरुध्द होते आडिस अबावाला गुजराथी वनियाच्या पुष्कळ फर्म्स होत्या त्याना पत्र-व्यवहार इंग्रजीतून करावा लागे, भारतीय शिक्षक या वनियाकडे सध्याकाळी सहा ते सात काम करित, व एक तासाचे दोनशे रुपये द. म. मिळवीत, ज्या भारतीयाना अशी कामे मिळत नसत त्याच्या पोटात साहाजिकच "जलन" सुरु होई व मोठ्या साधुपणाचा व इमानी नोक-राचा आव आणून इथियोपियन अधिकाऱ्याना खितबातमी पुरवीत. त्या योगेही भारतीय शिक्षकाविषयी अधिकाऱ्याच्या मनात 'कमी' लेखण्याची वृत्ती असावी

हैलेसेलासीच्या विरुध्द काही असतोष आहे याची कुणकुण १९५३ मधेच बादशहाला लागली होती, व १९५५ मधे त्याने घटनेमधे सुधार करुन असंतोष दावण्याचाही प्रयत्न केला,तसे उघड काहीच दिसत नव्हते इथियोपियात प्रकाशित होणारे एकमेव इंग्रजी पत्र आडिस अबाबाहून प्रसिध्द होणारे 'इथियोपियन हेरल्ड' याचा सपादक एक अमेरिकन निग्रो डॉ. डेव्हिड टॅलवट होता मनुष्य फार विद्वान आणि स्वभावाने उमदा. हे पत्र म्हणजे बादशहाची स्तुती स्तोत्रे गाणारे, (जिथे १९८६ साली स्वत ला अत्यत सुसस्कृत व प्रगत आणि डेमोक्रॅटिक समजल्या जाणाऱ्या भारतात सरकारची असलेले 'दूरदर्शन" पतप्रधान राजीव, गाधीची आरती दिवसरात्र म्हणत असतात तिथे अत्यत मागासलेल्या जवळजवळ ४० वर्षापूर्वीच्या ईथियोपिया देशाकडून आपण काय अपेक्षा करावी ?)– त्यामुळे खरोखरच वरवर आत धुमसणाऱ्या स्फोटाची काहीच कल्पना यायची नाही. आडिसअबाबा इथे त्या काळी सोव्हिएट युनियनची लाय-ब्ररी, वाचनालय, इ शहरातल्या मुख्य भागात (पियाझा) इथे होती अमेरिकेची पण होती. रशियन वाचनालयात इथियोपियन लोकाची खूप गर्दी असे. रशियन सिनेमा पहायला तर अलोट गर्दी जमायची, रशियन एम्बसी मधल्या फर्स्ट कॉन्सल्ला (आवदिएन्को) मी इंग्रजी शिकवित असे (फावल्या वेळात), त्यामुळे माझे येणे जाणे (सहपरिवार) रशियन एम्बसीत पुष्कळ असे.आणि मी कम्युनिस्ट असलो पाहिजे असा ग्रह झाला होता वस्तुत आव्दिएन्को व मी राजकारणावर कधीही बोलत नसू–या

रशियन प्रचाराचा कितपत परिणाम झाला असावा ते काही सांगता येत नाही, पण १९७४ साली सप्टें च्या १२ तारखेस, अंतर्गत बंडाळी होऊन ८२ वर्षांच्या हॅलेसेलासी बादशहाला सिंहासनावरून पदच्यूत केले व त्याला एका राजवाड्यात बंदिस्त करुन त्याच्या ज्येष्ठ मुलाला सिंहासनावर बसविले, अर्थात ही व्यवस्था तात्पुरती होती २१ मार्च १९७५ रोजी राजेशाही खतम करण्यात आली आणि देश सोशॅलिस्ट रिपब्लिक जाहीर करण्यात आला ले कर्नल मे गिस्तू हॅले मरीयम हा या लष्करी कटाचा प्रमुख सुत्रधार व तोच हल्ली ईथियोपियात "सर्वेसर्वा" आहे असे म्हणतात मी आडिस अबाबाला असता माझ्या सवयीप्रमाणे रोज डायरी लिहित असे त्यात मेंगिस्तू हॅले मरियम नावाचा माझा विद्यार्थी होता अशी नोंद आहे. कदाचित् हा मेगिस्तू निराळा असेल १९७४-७५ च्या अंतर्गत क्रांतीत बरेचसे राजनिष्ठ मारले गेले त्यात हाप्टेवल्ड घराण्यातील प्रमुख मारले गेले, त्यातील एका माझा स्नेही होता व त्याचा मुलगा माझेकडे रोज यायचा इंग्रजी वगैरे शिकायचा

या रेव्होलयूशनरी गव्हर्मेंटने १२० सदस्यांचे "प्रॉव्हिन्शियल मिलिटरी कौन्सिल" निर्माण केले (अम्हेरिक भाषेत याला "डिर्ग्यू" म्हणतात.)व ५० माणसाचे सिव्हिलियन टेक्निकल अॅडव्हायसरी कौन्सिलही बनविले.

ही लष्करी राजवट आपल्या वचनास जागली. अरेरावी, एक तंत्री सुलतानशाहीचा कारभार खतम करून प्रजाभिमुख राज्यकारभार सुरु केला पूर्वी ईथियोपियात (भारताप्रमाणे) खेडेगावात पंचायत असे, व ही ग्रामपंचायत अनेक प्रश्नांचा निवाडा करी तीच पध्दत नवीन शासनाने अमलात आणण्याचा प्रारंभ करुन गाव, जिल्हा, प्रांत, अशी साखळी जोडली १९७७ साली लंडनला मला काही इथियोपियन्स भेटले होते ते या शासनाची प्रशस्ती करीत होते, भारतीय व्यापारी मात्र टीका करीत होते. त्यांना तिथे "असुरक्षित" वाटते.

इथियोपियात ख्रिश्चन (ऑर्थोडॉक्स) बहुसंख्येने आहेत, भाषा एकमेव अम्हेरीक बोलली जाते , (१४ भाषांपैकी निरनिराळ्या प्रांतात निरनिराळी बोलली जाते, आणि इंग्रजी), शासनात ख्रिश्चन आहेत.

संपूर्ण वर्चस्व ख्रिश्चनाचे आहे. शे. ३१ टक्के मुसलमान असूनही त्याना बहुसंख्याकाच्या प्रवाहात सामील व्हावे लागले आहे आडिसअबाबा ही राजधानी, इटालियन लोकानी फार सुंदर बनविली. ती आता अधिकच सुंदर झाली आहे. हवा थंड असून पाऊस फार नाही—शहरात मोठ-मोठाली चर्चेस आहेत, एखाद दुसरी मशीद फक्त आहे आपल्या संस्कृत प्रमाणे इथियोपियाची आर्ष भाषा 'गीझ' आहे याची लिपी थोडी आर्मेनियम वळणावर वाटते, अरबांशी अनेक शतके संबंध आल्यामुळे अम्हेरिक भाषेत पुष्कळसे अरेबिक शब्दही आहेत.

कोणत्याही आफ्रिकन जमातीप्रमाणे इथियोपियन्स उत्सव प्रिय आहेत. मद्य आणि नृत्य उत्सवात पाहिजेच. अजून अनेक 'रानटी' समजल्या जाणाऱ्या पद्धती आहेत उदा० लग्न झाल्यावर पत्नीशी रात्री संभोग घेतल्यावर ती कुमारी होती हे दाखविण्यासाठी रक्ताळलेला कपडा सकाळी बाहेर दाखविण्यात येतो. (ही प्रथा आता फार कमी झाली आहे) कुणी मेल्यास भाड्याने 'मोर्नर्स' बोलविण्यात येत व बायका मोठ-मोठ्याने छाती बडवीत -- सुशिक्षितात विवाह बंधन साधारणतः कायम स्वरूपाचे गणले गेले तरी बहुतेक लोकात पत्नीशी काही वर्षाचा करार करता येतो. तो करार संपल्यानंतर पत्नी पुनश्च करार करू शकते किंवा जाऊ शकते. याकाळात झालेल्या मुलाच्या संगोपनाची जबाबदारी कुणाची ते करारात ठरलेले असते

सुशिक्षिताचा पोषाख विलायती असला तरी सर्वसामान्य पुरूषाचा पोषाख म्हणजे नेहरूटाईप गुडघ्याला तंग व वरती सैल अशी विजार, लांब सदरा, अंगावर पंचा व डोक्याला रूमाल गुंडाळलेला बायकांचा पोषाख म्हणजे लांब झगा अगदी पायघोळ, आणि वरून एक वस्त्र—

इथियोपियन स्त्री पुरूषाचे केस आखूड व कुरळे. पुष्कळसे स्त्री पुरूष डोक्याला 'किवे' (लोणी) चोपडतात स्त्रिया तर जास्तच. ते 'किवे' केसात सडते व त्याची दुर्गंधी सुटते डोक्यात उवा होतात. पुष्कळ वेळा केसातून डी डी. टी. चे फवारे सोडावे लागत. आता शिक्षणाच्या प्रसाराबरोबर हे पुष्कळच कमी झाले आहे.

इथियोपियन लोकात बहुसंख्य लोक चांगलेच काळे, निग्रोप्रमाणे नाक बसके, ओठ जाड, आणि केस कुरळे, राठ व आखूड, पण काही

लोक उजळ रगाचे पण असतात. विशेषत: अम्हारा जात थोडी उजळ आहे व या जातीतल्या पुष्कळशा स्त्री पुरुषाची नाके टोकदार व ओठ पातळ असतात, केसानी दगा दिला नसता तर याना निग्रॉईड रक्ताचे कोणी म्हणणार नाही

इथियोपिया देश आफ्रिकन राजकारणात महत्वाची भूमिका घेत आहे. या देशातील लोक कडवे आहेत, स्वातन्त्र्यप्रिय आहेत, दुसऱ्याचे वर्चस्व कधीही सहन न करणारे आहेत, (आळशी आहेत म्हणून गरीब आहेत, खूप अशिक्षीत आहेत. त्यामुळे देशातील निसर्गाचा फायदा करून घेत नाहीत, म्हणून दुष्काळ पडतो)- आतरराष्ट्रीय राजकारणात जी आफ्रिकेतील राष्ट्रे झपाट्याने पुढे येत आहे त्यात इथियोपिया महत्वाचे स्थान बाळगून आहे - भारताने हे ओळखले पाहिजे.

***

REFBK-0025221